होता, कसकसी वर्तणूक करावयास कोणीं सांगितली होती, त्याप्रमाणें कोळ्यांत कसा मिळाला होता, तें सविस्तर त्याची जमानी लिहून घेऊन, सत्वर हुजूर पाठवणें. हुजुरून जप्ती आली आहे असें त्यास तूर्त कळों न देणें. युक्तीनें त्याचे घरांत कागदपत्र व त्याची जमानी लिहून घेऊन पाठवणें; आणि हुजुरून आज्ञा होईल तेव्हां रावजीस सोडावयाचा जाहल्यास जामीन घेऊन सोडणें, तूर्त किल्ल्यास नेऊन ठेवणें ह्मणोन, रामराव नारायण तालुके राजमाची यांचे नांवें छ. १७ रजब परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस. सनद १.

मुतालीक ह्यांचे रोजकीर्दीपैकीं.

८७५ (८)—नारो रामाजी कारकून हा बाजी गोविंद बर्वे यांजकडून हैदरखानाचे लष्करांतून बातमीस लष्करांत आला होता. तो सांपडला, सबब तुह्मांकडे किल्ले धारवाड येथें अटकेस ठेवावयास मराठे गाडदी दिंमत रामजी वणजारे वगैरे असामी २० वीस असामीं बराबर पाठविलें आहे, तरी याचे पायांत बिडी घालून किल्ले मजकुरीं पक्कया बंदोबस्तानें ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, त्रिंबकराव गेशवंत यांचे नांवें. सनद १.

समान सबैन मया व अलफ सवाल ३

परवानगी रूबरू.

८७६ (६२२)—मौजे धनगड येथिल लोक रामचंद्र गोविंद, माजी कारखानीस, यांणीं इंग्रजांचे गडबडेंत मालगुदस्तां फिताऊन सखाराम हरी अटकेस होता, त्यास मोकळा करून, किल्ला बदलावा असा मनसबा करून, बाहेरील लोक बीरदींचे रानांत आणून लबाडी करित होता. तो इंग्रजाचा मोड जाहला तेव्हां रानांतील लोक पळून गेले. पुढें फितुराचें वर्तमान तुम्हांस कळल्यावर तुह्मी चौकशी केली. तो आठ आसामी फितुरी, त्यांपैकीं कारखानीस मजकूर व जावजी मापारी

समानीन मया व अलफ जमादिलाखर ४

from him in private full particulars as to how he joined the Kolis, who induced him to do so, and what part he took in their affairs, and to submit his statement to the Huzur.

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(875) Náro Rámji Kárkun who was found to be a spy sent by Báji Govind from Haiderkhan's camp was sent to prison.

A. D. 1777-78.

(876) During the disturbances caused by the English in the preceeding year, Rámchandra Góvind, who formerly held the office of Kárkhánnis, collected a force in the forest of Birandi, and entered into a plot with the men of the fort of

A. D. 1779-80.

बरदेकर हे दोघे लष्करांत जाऊन येऊन बातमी नेत होते, त्यामुळें पळून गेले. बाकी सहा असामी फितुरी तुह्मांस सांपडले, ते हुजूर पाठविले त्याचे अपराध मनास आणून शासनाविशीं. कलमें.

किता.	असामी.
१	तानाजी नाईक बंबर तट सर नौबत याचा अपराध पाहतां भारी शासनास योग्य; परंतु सरकारांत फितुराचें वर्तमान जाहीर केलें, सबब उजवा हात तोडणें.
१	खंडोजी सेजवलकर, सयाजी सुर्वे याचा भाऊ, सयाजी मजकुराचे ऐवजी चाकरीस होता, त्यास सखाराम हरी यास मोकळा करावयाच्या मनसब्यांत तूं आहेस कीं नाहीं असें जैतोजी जांबुळकर, व देवजी महाडीक यांणीं पुशिलें असता तुह्मांस कळविलें नाहीं, सबब शासनास योग्य, परंतु भावाचे मुबदला नव चाकरीस आला, सबब न सांगितलें, परंतु कारखानिसाचे निरोप लोकांस सांगत होता, असा फितुराचा मिलाफी, सबब उजवा हात तोडणें.
२	दोन असामीचे उजवे हात तोडणें. कलम १.

किता.	असामी.
१	देवजी धोंडजी महाडीक.
१	भिवाजी धोंडजी नाईकेणें.
१	मोराजी बहिरजी नाईकगुंड.
१	जैताजी जांबुळकर.
४	चार असामी बहुत अपराधी, सबब त्यांस तोफेच्या तोंडीं बांधून उडवून देणें. कलम. १

Ghangad for the surrender of the fort and the release of Sakhárám Hari. On hearing of the defeat of the English, the force which had assembled dispersed. The plot was then discovered and eight persons were found to have been implicated in it. Two of them, the Kárkhánnis, and Jáwaji Mapari absconded. The rest were arrested and punished as follows:—

(1) Tánáji Náik Sarnobat deserved condign punishment; but as he gave information to Govt. he was allowed to escape with the loss of only his right hand.

एकूण दोन कलमें लिहून सहा अपराधी तुह्मांकडे किल्ले मजकुरीं येसाजी दरवडा खिजमतगार याजबरोबर पाठविले आहेत, तरी खिजमतगाराचे विद्यमानें सदरहू दोन कलमांप्रमाणें पारिपत्य करून हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन, अर्जोजीराव ढमाले हवालदार व कारकून किल्ले मजकूर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

हरिहरराव पांडुरंगराव यांच्या कीर्दीपैकीं.

८७७ (७६३)—परगणे मजकूरपैकीं लोक कितुरकर देसाई याजकडे चाकरीस गेले असतील त्यांचा घरें व चीजबस्त जी असेल, ती चौकशी करून जप्त करावयाकरितां कारकून पाठविले आहेत; तरी हे देसाई मजकूर यांजकडे परगणे मजकूरचे लोक गेले असतील त्यांची चौकशी करून घरें व चीजबस्त जप्त करितील, त्यांस जप्त करूं देणें, अडथळा न करणें ह्मणोन.

इसन्ने समानीन मया व अलफ जमादिलाखर २१

१ अंताजी शंकर कमाविसदार दिंमत परशराम रामचंद्र, परगणे तेरदाळ, यांजकडे कामगिरीस गिरमाजी शिवाजी कारकून दिंमत परशराम रामचंद्र यास पाठविले आहेत, सबब सदरहु अन्वयें.

१ अंताजी विठ्ठल कमाविसदार, परगणे यादवाड, दिंमत परशराम रामचंद्र यांजकडे रामाजी दादाजी कारकून दिंमत परशराम रामचंद्र पाठविले सबब सदरहु अन्वयें.

१ भास्कर सखदेव कमाविसदार परगणे जमखिंडी दिंमत परशराम रामचंद्र यांस पत्र कीं सदरहुप्रमाणें जप्त करून हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन.

३

एकूण तीन पत्रें छ. १९ जमादिलाखर समानीन, परवानगी रूबरू दिल्हीं असेत.

८७८ (९८९)—बळवंतराव काशी यांचे नांवें सनद कीं. तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें

---

(2) One man who was serving as a substitute for his brother received the same punishment.

(3) The rest were ordered to be blown from guns.

FROM HARIHARRAO PÁNDURANG'S DIARY.

(877) The officers of Parganá Terdál and Yádwad &c. were directed to attach the property of persons who had gone over to the Desai of Kitur.

A. D. 1781-82.

(878) Kasba Sinr in Parganá Gándápur belonged to Ahilyábai Holkar. A feud existed between the village officers and the kamávisdar and the parties had been quarrelling] for 4 months. Balwantrao Káshi happened to encamp at the village,

A. D. 1788-89.

तिसा समानीन
मया व अलफ
रमजान २

तें प्रविष्ट जाहलें. कसबे सिउर, परगणे गांडापूर, येथें मुक्कामास आला तो गांव अहिल्याबाई होळकर यांजकडील त्या गांवचे कमाविसदार व पाटील कुळकर्णी याचा कजिया लागोन चार महिने झुंजत होता त्यास लोणारा किल्ला ज्या भिल्लांनीं घेतला ते भिल्ल आंत होते. त्याजला आह्मीं मागों लागलों. त्यांणीं उत्तर केलें कीं तुह्मीं हजारपांचशें रुपये घेऊन जावें. आह्मी भिल्ल देत नाहीं. त्याजवरून होळकराकडील कमाविसदार, व पागे यांच्या विचारें गांवावर हल्ला केला तेसमई आमचे सोळा माणूस जखमी, व तीन ठार जाहले; व भिल्लांचे शंभर माणूस जखमी व कांहीं ठार जाहले. त्यांच्यानें दम न धरवे तेव्हां रघुनाथ धोंडाजी व गोविंद चिमणाजी मातबर गृहस्थ गावांत राहतात, त्यांच्या हवेल्या थोर आहेत, त्यांत भिल्ल व कुळकर्णी शिरोन गोळी वाजविली, इतक्यांत अस्तमान होऊन रात्र पडली. याजवर हरदूजणांनीं मागील दरवाजा उघडोन भिल्ल काढोन दिल्हे. ते भिल्ल सांपडले असते ह्मणजे इतकी मसलत न लांबती त्यांचीं घरें जप्त केल्यास वीस पंचवीस हजारांची सरकारची किफायत होईल ह्मणोन, व रोजमरे याचे ऐवजाकरितां लिहिलें तें विदित जाहलें. ऐशास गांव चार महिने लढत होता, तो तुह्मीं हल्ला करून घेतला, उत्तम केलें. रघुनाथ धोंडाजी व गोविंद चिमणाजी यांणीं सरकारचे हरामखोर सोडून दिले याजकरितां त्यांचे घराची जप्ती करून जे सांपडेल त्याची याद लिहून हुजूर पाठविणें. आणि त्यांस कैद करणें, व कुळकर्णी यांचे वतनाची जप्ती करणें, येविशी अहिल्याबाई होळकर यांस पत्र सादर केलें आहे, तरी तुह्मीं सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन.　　सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे.
कारकून निसबत दप्तर.

---

and learning that the Bhils who had taken the fort of Lonárá were in the village he demanded their surrender. The villagers sent word that they would pay Rs. 500 or 1000 to Balwantrao rather than surrender the Bhils. Balwantrao with the consent of the Kamávisdár attacked the village. Some of the Bhils were killed and wounded, and the rest were taken by the villagers to the houses of Raghunáthrao Dhondoji and Govind Chimnáji two influential men in the village. The Kulkarni also joined them, and they fired on Balwantrao's men. At night-fall, they allowed the Bhils to escape. Balvantrao having reported the facts to Government, Raghunáth and Govind were ordered to be arrested, and their houses were attached. The Kulkarni's watan was also attached. The facts of the case were also communicated to Ahilyábai.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

२ खून व आत्महत्या.

८७९ (९७)—पदमसिंग पिसाळ देशमुख, प्रांत वाई, यांचे नांवें अभयपत्र की कुसाजी भोसला कुणबी रयत मौजे ओझरडें, ममत हवेली, प्रांत मजकूर, यास पाटाचे पाण्याचे कजियामुळें तुह्मी मार दिल्हा. त्या मारानें कुणबी मजकूर त्याच दिवशीं मृत्यु पावला; खून तुह्मांकडे लागला; मबब तुह्मांस सरकारांत आणून अटकेस ठेविलें होतें. त्यास खुनाबाबत सरकारची गुन्हेगारी रुपये १७५० साडेसत्राशें करार करून विठ्ठलराव मोरेश्वर गोळे यांचा निशा सरकारात घेतली असे. या उपरी खुनाचा लांजा सरकारचा तुह्मांकडे नाहीं, सुखरूप राहणें अभय असें ह्मणोन.

खमस सबैन मया व अलफ साबान १९

पत्र १

रसानगी यादी.

मुतालीक याचे रोजनिशीपैकीं.

८८० (२)—संभू पाटील, कसबे धामणगांव, परगणे मलकापूर यास पत्र कीं, तुझा व कसबे मजकूर येथील गांवकरी यांचा वतनसंमंधें कजिया होता, यामुळें तू परागंदा होऊन गांवकरीयासी दावा करावयाकरितां रात्रीस जमाव करून गांवावर आलास तेव्हां मइनाई पाटलीण, मौजे पळसखेडें, तर्फ पिंपरी, परगणे जामनेर, इचा लेक नाईस कसबे मजकूरचे सिवारांत सांपडला तो तूं ठार मारिलास; सबब मइनाइ पाटिलीण हुजूर फीर्याद आली. त्याजवरून तु-

खमस सबैन मया व अलफ साबान २६

(2) Murder & suicide

(879) Padamsing Pisál, Deshmukh of Prant Wái, beat Kusáji Bhosle, a ryot of Ózarde, to death in a dispute relating to canal water. He was arrested & kept in confinement but was afterwards released on his giving security for the payment of a fine of Rs. 1,750.

A. D. 1774-75

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(880) Sambhu Pátil of Dhámangaon in Pargana Malakápur, having a quarrel with the village officer regarding the watan, left the village. He collected some men and came to the village one night to attack his enemies. He found a son of Mainai

A. D. 1774-75.

जला मसाला करून हुजूर आणून मनास आणितां खुनाचा आरोप तुजवर आला, सबब तूं आपला घरवंद व शेत याचा निमे वांटा मइनाईस देऊन दत्तु पाटील मइनाईचा दीर याचे नावें भवरगांवचे पाटील वगैरे यांचे साक्षीनें कागद लिहून दिल्हा; सबब खुनाचा अन्याय माफ करून सरकारांत गुन्हेगारी रुपये १५० दीडशें रुपये घेऊन हें अभयपत्र दिल्हें असे, तरी कसबे मजकुरीं सुखरूप राहणें ह्मणोन. पत्र १.

रसानगी याद.

८८१ (२०९)–बाजीराव आपाजी, तालुके धोडप, यांचे नांवें सनद कीं, हटकरी धणगर याचा चाकर मुदबख्या गुदस्तां गुजराथेंतुन दौलत बाबूराव याचे पथकांतून कंठाळ सुद्धां घेऊन पळोन आपल्या घरास जात होता, तो रात्रीं मौजे महारपाटणें परगणे वांबोरी, येथें येऊन वस्तीस राहिला, दुसरे दिवशीं तेथून निघोन आपल्या घरास जात होता. तो भुता पाटील व बावाजी पाटील व नेऱ्या भिल व महार मौजे मजकूर यांणीं मुदबख्यास वाटेंत गाठून जिवें मारिलें, सबब भुता पाटील व बाबाजी पाटील पळाला. त्याचा भाऊ भिवजी पाटील व नेऱ्या भिल व महार यांस किले धोडप येथें अटकेस ठेविलें आहे. त्याचे पारपत्याचीं वगैरे. कलमें.

सीत सबैन मया व अलफ रविलाखर १५

Pátlin of Palaskhede in the field and killed him. Mainái complained to the Huzur, and the charge of murder was proved. Sambhu therefore granted to Mainái half a share in his houses and fields and executed a document to that effect in favour of Datto Pátil, Mainábái's brother-in-law. A pardon was consequently given to him for his offence, Rs. 150 being levied from him as fine.

(881) Mudbakhya, a servant of a Hatkari Dhangar, ran away with his master's property from the camp of Daulatráo Báburao on his way home halted one night at Mahárpatne in Parganá Wákhári. The next morning while proceeding to his destination, he was way-laid and murdered by Bhuta Pátil, Báwáji Patil, Neryá Bhil and a Mahár. These persons were therefore imprisoned in fort Dhodap. Orders were now issued for the disposal of the prisoners as follows.—

A. D. 1775-76.

(1) The murderers Bhutá and Néryá should be taken to the village where the murder took place and beheaded;

(2) One of the murderers, Bávaji Pátil, having absconded, his brother

भुता पाटील, भिवजी पाटील याचा भाऊ बावाजी पाटील, व नेऱ्या भिल यांणीं खून केला, त्याणें भिवजीचा भाऊ बावाजी पळाला सबब खुनी असामींचे पारिपत्य.

१ भुता पाटील.
१ नेऱ्या भिल.

२

दोन असामी यांणीं ज्या गांवीं खून केला त्या गांवीं हरदू जणांस नेऊन छाटून टाकणें. कलम १.

किता.	असामी.

१ भिवजी पाटील बावाजी यानें खून करोन पळोन गेला, सबब त्याचा भाऊ.
१ महारानें मुदबख्याची पितळी घेतली सबब.

२

दोन असामी जामीन घेऊन सोडून देणें. कलम १.

मौजे मजकूरची पाटिलकी जफ्त करावयाविशीं सरसुभाहून सनद तुम्हांस सादर जाहली आहे. त्याप्रमाणें पाटिलकी जप्त करणें. कलम १.

तीन कलमें लिहिलीं आहेत. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें म्हणोन. सनद १.

रसानगी यादी.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

८८२ (२९५)—बाळसेट बिन गोंदसेट सोनार देवरुखकर याचे नांवें चिटणिसी पत्र कीं, गोंदसेट सोनार मुराडकर याच्या लेकास रामा दसपुऱ्या व राघोबा विश्या या दोघांनीं जिवें मारिला, त्याचे सोबतीस गोपाळा गुहागरकर सोनार व तुझा लेक सदाशिव होता असें म्हणून गोंदसेट मजकूर पेशजीं हुजुर फिर्याद जाहला होता, त्याजवरून येविशींचा शोध करतां सदाशिवाकडे सदरहूविशींचा लांझ्या नाहीं, असें जाहलें; परंतु चौकशीबद्दल कांहीं दिवस अटकेस होता. आरोप आला, सबब पंचगव्य देववून हें आज्ञापत्र सादर केलें असे; तरी सदरहू खुनाचा लांझ्या तुझा लेक सदाशिव याजकडे नाहीं. पूर्ववत्प्रमाणें आपले सोनाराचे जातींत

सीत सबैन मया व अलफ रबिलाखर १५

---

was arrested. He and the Mahár who had taken a pot belonging to Mudbakhyá were ordered to be released on furnishing security.

(3) The Páṭilki watan of the village was confiscated.

FROM JANÂRDAN ÂPÂJIS DIARY.

(882) Two persons murdered a son of Gondshet Sonár. Balshet Sonár's son, Sadashiv, was their accomplice, but at the inquiry he proved his innocence. Orders were therefore

A. D. 1775-76.

वर्तत जाणें. तुझे लेकाकडे हरकी रुपये १५० दीडशें करार करून हुजूरांत पागा हिंमत बाजी मोरेश्वर यासीं छ. २९ सवाली देविले ते सरकारांत सदरहूप्रमाणें जमा जाले असत ह्मणोन. छ. २३ मोहरम. पत्र १.

८८३ (४७५)—यादो पांडुरंग आवटी कसबे बारागांव नांदुर, परगणे मजकूर, व कुळकर्णी मौजे चिंचोलें, परगणे मजकूर याच्या दोन स्त्रिया होत्या, त्यांस कण्हेरीच्या मुळ्या चारल्या, एक स्त्री मृत्यु पावली, एक आजारी आहे. यादो पांडुरंग कसबे मजकूरहून पळोन गेला, ह्मणोन तुह्मांकडील कारकुनांनीं हुजूर विदित केलें, त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी कसबे मजकूरचे आवटीपण. व मौजे मजकूरचें कुळकर्ण, येणेंप्रमाणें जप्त करून उत्पन्न होईल तें परगणे मजकूरचे हिशेबीं जमा करणें; व यादो पांडुरंग याचा शोध करून त्यास धरून हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, निळकंठराव रामचंद्र पागा, यांचे नांवें. छ. २ जमादिलावल.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

सनद १.

रसानगी यादी.

मुतालिक ह्याचे रोजनिशीपैकीं.

८८४ (७)—सटवाजी लाड खिजमतगार याणें आपला चाकर पोर्गा ठार मारिला; सबब मशारनिल्हेस किल्ले गदग येथें अटकेंत ठेवावयास पाठविला असे, तरी यास बेडी घालून किल्लेमजकुरी पक्या बंदोबस्तानें ठेऊन शिरस्तेप्रमाणें पोटास शेर सनद—पैवस्तगिरीपासून किल्ले मजकूर पैकीं देत जाणें ह्मणोन, रामचंद्र नारायण यांचे नांवें. सनद १.

समान सबैन मया व अलफ. साबान १४

परवानगी रूबरू. राजश्री बाळाजी महादेव कारकून शिलेदार.

---

issued that cow's urine should be given to purify him as he had been for some time in jail, and Rs. 150 were levied from him as a present.

(883) Yádo Pándurang, kulkarni of Chincholi in Parganá Nándur, gave roots of the *kanher* plant to his two wives to eat. One of them died, and the other sufferd from the effects of the poison. Yádav absconded. His watan was attached, and orders were issued for his apprehension.

A. D. 1777-78

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(884) Satwáji Lád khismatgár having murdered his servant-boy was sent to prison in fort Gadag.

A. D. 1777-78.

८८५ (६१५)—नरहर लक्ष्मणराव कमाविसदार, परगणे शेवगांव, यांचे नांवें सनद कीं, रामाजी येल्हो ब्राह्मण यास कसबे तीसगांव, परगणे मजकूर एथें जिवें मारिलें. ते मारेकरी ब्राह्मण वगैरे तेरा असामी कैद करून हुजूर आणिले होते, त्याचा करार येणेंप्रमाणें. कलमें.

तिसा सबैन मया व अलफ जमादिलावल

मारेकरी असामी १३ पैकीं शूद्र चार व मुसलमान एक, एकूण असामी ५ पांच किल्यावर अटकेस ठेविले. बाकी. असामी.

१ जनार्दन बापूजी.
१ हरी रामगिरधर.
१ भवानी यशवंत.
२ मल्हार त्रिंबक, व मुक्ताजी त्रिंबक.
१ विठ्ठल गोपाळ.
१ मल्हारी ब्राह्मण.
१ गोविंदा ब्राह्मणभाई निसबत हरी रामगिरिधर.

८

एकूण आठ असामी किल्यावर अटकेस ठेवावयाचे केले होते, ते मना करून त्याजकडे ऐवज करार १०००१ रुपये.

यासि तपशील.

१५०० रामाजी येल्हो यांचे पुत्रास खुनाबद्दल द्यावे.
८५०१ सरकारचे खंडाबद्दल सरकारात घ्यावे.

१०००१

आठ असामी बेड्यासुद्धां सरकारचे प्यादे हुजूर हशमाकडील बरोबर देऊन तुह्मांकडे पाठविले आहेत तेथें पोंहचलियावर जामीन चांगले पक्के घेऊन जामीनकतबे हुजूर पाठवणें; आणि सदरहू असामींच्या बेड्या तोडून जातीबाहेर ठेवणें. पुढें यांणीं राहावें, पुढें वर्तणूक कशी करावी याची आज्ञा हुजुरून होईल त्याप्रमाणें करवणें. कुटुंबसुद्धां जातीबाहेर ठेवणें. कलम १.

रामाजी येल्हो यांचें कर्ज या असामी पैकीं ज्याजकडे येणें असेल तें त्याजपासून व्याजसुद्धां सरकारचे ऐवजाबरोबर एका महिन्यांत वसूल करून रामाजीचे पुत्रास पावतें करून. पावती घेऊन हुजूर पाठवणें. कलम १.

सदरहू असामी तुह्मीं आपलेजवळ पुढें चाकरीस कधींही ठेऊं नये. ऐसें केलें असे, तरी न ठेवणें. कलम १.

परगणे मजकूर येथील फडणिसी नारो रघुनाथ याजकडे आहे, त्याचे तर्फेनें गा-

(885) Thirteen men murdered, Rámaji Yelló who held the appointment of Fadnis at Tisgaum in Pargana Shevgaum. Five of them, one a musalman and four Shudrás were sent to prison. The rest who were Brahmins were first ordered to be imprisoned but that order was revoked and they were fined Rs. 10,001, out of which Rs. 1500 were ordered to be given to the son of the deceased. It

A. D. 1778-79.

एकूण दहा हजार एक रुपया सात असामी ब्राह्मण व एक ब्राह्मणभाई मिळोन आठ असामींकडे सदरहूप्रमाणें करार केला असे, तरी याची निशा एक महिन्याचे मुदतीची घेऊन ऐवज वसूल करणें; आणि यापैकीं दीड हजार रुपये रामाजीचे पुत्रास देऊन बाकी सरकारचे खंडाचे पंच्यायेसीशें एक रुपयाची हुंडी करून एक महिन्याचे आंत ऐवज हुजूर पुण्यास पावता करणें. कलम १.

माजी येल्हो कामकाज करित होते. हल्लीं त्यांचे पुत्र गोविंद राम यांस मशारनिल्हेनीं आपले तर्फेनें फडणिसीचें कामकाज सांगितलें आहे, तरी त्यांचे हातें घेत जाणें. कलम १.

येणेंप्रमाणें पांच कलमें करार केलीं असत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन छ. २४ रविलावल. सनद १.

रसानगी यादी.

८८६ (६४५)—गंगी परदेशिण इणें आपला दादला सोमल घालून जिवें मारिला. सबब अटकेंत ठेवावयास किल्ले सिंहगड येथें पाठविली आहे, तरी किल्ले मजकुरीं अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देऊन काम करवीत जाणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें. सनद १.

समानीन मया व अलफ जिल्काद ५

रसानगी यादी.

८८७ (७०७)—त्रिंबक मनाजी दिंमत तुकोजी होळकर यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपलें घर कसबे आकोलें एथें आहे, त्यास गांवांत दादो जयराम यांची स्त्री शामाबाई इची अप्रतिष्ठा शिमग्यांत गांवकरी यांणीं केली, सबब तिणें जीव दिल्हा, त्याचे चौकशीस सरकारांतून विसाजी हरी

इसन्ने समानीन मया व अलफ सवान ११

---

was directed that security should be taken from these Brahmins and that they should be excommunicated. Further orders were to be issued regarding their future residence. The officer of Shewagaum was told never to employ them under him. The son of the deceased was given the appointment of his father.

(886) Gangi, a Pardéshi woman murdered her husband by administering arsenic to him. She was therefore sent to prison.

A. D. 1779-80.

(887) The villagers of Akola outraged the modesty of Shàmá, wife of Dàdo Jayràm, during the Shimga holidays. She therefore committed suicide. Visàji Hari was sent

A. D. 1781-82.

कारकून पाठविले, त्यांणीं चौकशी करून अन्यायी यांजपासून गुन्हेगारी घेतली. हल्लीं विसाजी हरी सर्व गांवास पंचगव्य देऊन असामी पाहून पट्टी घेतात. येविशीं आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे, तरी त्रिंबक मनाजी यास सर्वांबरोबर पंचगव्य देणें, पट्टी मना केली असे, तरी यास पट्टीचा तगादा न करणें ह्मणोन, विसाजी हरी यांस चिटणिसी. पत्र १.

८८८ (७६६)–कृष्णाजी उतेकर याणें कृष्णाजी महाडीक शिंपी, वस्ती कसबे पाली, याच्या कुणबिणी दोन, मौजे रतबगांव, तर्फ पाल हवेली, येथील नदीवर जिवें मारून आपण महाडास घरीं गेला, त्याचा पत्ता तुह्मीं लाऊन धरून आणून, किल्ले सरसगड येथें अटकेंत ठेविला आहे, त्यास हल्लीं तोफेचे तोंडीं द्यावयाची आज्ञा केली असे, तरी तोफेच्या तोंडीं देऊन उडवून टाकणें ह्मणोन, बाजी गोविंद यांचे नांवें. सनद १.

सलास समानीन मया व अलफ जमादिलाखर ३०

रसानगी यादी.

८८९ (८४०)–सदाशिव गणेश केळकर वस्ती वाडा फणसें, मौजे वाडें तर्फ खारेपाटण, तालुके विजेदुर्ग, याणें गोविंदभट पैठण, वस्ती वाडा मजकूर यांची कन्या गुणाजी गणेश केळकर, वस्ती मौजे वानिवडें, तर्फ मजकूर यास दिल्ही होती, ती जिवें मारली ह्मणून हुजूर विदित जाहलें; त्याजवरून येविशींची चौकशी करितां गुणाजी गणेश याची बायको मारल्याचा मुद्दा सदाशिव गणेश याजकडे लागू होतो; सबब यास कैद करून बराबर गाडदी निसबत राघो विश्वनाथ गोडबोले असामी ४ चार देऊन बिडीमुद्दा किल्ले वंदन एथें अटकेस ठेवावयाकरितां पाठविला असे, तरी किल्ले मजकुरी पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, नारो शिवदेव याचे नांवें. सनद १.

अर्बा समानीन मया व अलफ जमादिलाखर २०

रसानगी यादी.

---

from the Huzur to inquire into the matter. He fined the offenders and ordered that all the villagers should drink cow's urine to purify themselves and pay a cess imposed by him. Trimbak Mánáji complained to the Huzur. The cess was remitted but he was ordered to drink cow's urine to purify himself.

(888) Krishnáji Utekar killed two female servants of a tailor of Páli. He was ordered to be blown from a gun.

A. D. 1782-83

(889) Sadáshiva Ganesh Kelkar of Wádá Fanase in Mouze Wáde of Turf Khárе Patan in Taluká Vijedurg having murdered his brother's wife was sent to prison.

A. D. 1783-84

८९० (९०८)–बळवंतराव नरसी याचें घर कसबे खटाव, प्रांत मजकूर येथें आहे,
सीत समानीन मया व अलफ मोहरम १९
त्यास त्याचे भाऊबंद वगैरे शें दीडशें लोक जमा होऊन मशारनिल्हे-चा वाडा वेढून त्यास बाहेर काढिलें; व त्याचीं माणसें तोडिलीं, त्या जमावांत किल्ले वर्धनगड येथील लोक होते, ह्मणून कळोन आलें; त्याजवरून हें पत्र लिहिलें असे, तरी मशारनिल्हेचे वाडियावर लोक चालोन गेले. त्याची चौकशी मनास आणावी लागती. यास्तव त्या जमावांत किल्ले मजकूरचे लोक असतील त्यांस पाठवून द्यावें ह्मणून, परशराम श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांचे नांवें चिटणिसी.
पत्र १.

८९१ (९६१)–रखमी साळोखी इचा दादला लक्ष्मण साळोखा, वस्ती कसबे पुणें,
समान समानीन मया व अलफ मोहरम १८
हा गुणी कुणबीण किंमत बच्याजी रामाजी कारकून निसबत चिटणीस इचा खून हडपसरचे रानांत करून खुन्यें पळोन गेले; त्यांत साळोखा मजकूर होता तोही पळोन गेला, त्याचें ठिकाण न लागे, याजकरितां रखमी मजकूर इजला सरकारांत धरून आणून हजीर जामीन घेणे, ह्मणोन तगादा केला असतां जामीन न मिळे, सबब किल्ले सिंहीगड येथें रखमीमजकूर इजला अटकेंत ठेवाव-याकरितां गाडदी असामी सहा निसबत राघो विश्वनाथ याजबराबर पाठविली आहे, तरी किल्लेमजकुरीं बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणे ह्मणोन, केशवराव जगन्नाथ यांचे नांवें.
सनद १.
परवानगी रूबरू.

८९२ (१०५८)–सदाशिव गणेश केळकर, वाडा फणसें मौजे वाडें, तर्फ खारा-
सलास तिसैन मया व अलफ सफर १९
पाटण, तालुके विजयदुर्ग यांणीं हुजूर विनंती केली कीं गुणाजी गणेश तिवरेकर मौजे वानिवडे, तालुके मजकूर यांची स्त्री मारल्याचा आरोप मजकडे आला, सबब किल्ले वंदन येथें सरकारांतून मजला अटकेस

(890) The Bháubands of Balwantrao Narsi of Khatáv numbering about a hundred and fifty, surrounded the house of Balwantrao, took him out and killed his men.
A. D. 1785-86.
Some men from the Wardhangad fort were alleged to be implicated in the matter. The Pratinidhi was asked to send them to Poona for inquiry.

(891) Laxman Sálokhá of Poona being concerned in the murder of a female servant absconded, and could not be found. His wife Rakhmi was therefore ordered to furnish security for her appearance when required but she was unable to do so. She was therefore sent to prison in Sinhgad.
A. D. 1787-88

(892) Gunaji Ganesh Tiwrekar of Wániwade in Táluká Khára-

दहा वर्षे ठेविलें होतें, त्यास हल्लीं मोकळें केलें; परंतु प्रायश्चित्त देऊन शुद्ध केलें नाहीं. याजकरितां स्वामींनीं कृपाळू होऊन जीवनमाफक राजदंड घेऊन, प्रायश्चित्त द्यावयाची आज्ञा करून, मजला दोषापासून मुक्त केलें पाहिजे ह्मणोन; ऐशीयास गुणाजी गणेश तिवरेकर याची स्त्री मारल्याचा आरोप केळकर मजकूर याजकडे आला होता, सबब याजपासून राजदंड व ब्रह्मदंड घेऊन सर्व शिष्ट सभेंत विध्युक्त प्रायश्चित्त देववून शुद्ध करून, हे पत्र सादर केलें असे, तरी तुह्मीं तालुके मजकूरचे ब्राह्मणांस ताकीद करून सदाशिव गणेश यांशीं अन्न व्यवहार करीत ते करणें, ह्मणोन चिटणिसी. पत्रें.

१ गंगाधर गोविंद तालुके विजयदुर्ग यांस.

१ समस्त ब्राह्मण तालुके मजकूर यांस.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

३ डाके.

८९३ (२३०)—आनंदराव त्रिंबक सुभेदार परगणे सुपें यांस सनद कीं, काळ्या वलद गंगाजी गोळा, वस्ती कसबे सुपें, हा बेरडांकडे चाकरीस राहून दरवड्यांत जात होता ह्मणोन तुह्मीं लिहिलें, ऐशास काळ्या मजकूर हा बेरडांमध्यें चाकर होता, सबब याचा शिरच्छेद करावयाची तुह्मांस आज्ञा केली असे, तरी काळ्या गोळ्याचा शिरच्छेद करणें ह्मणोन. सनद १.

सीत सबैन मया व अलफ. रजब २४

रसानगी, मल्हारजी कामथा खिजमतगार दिमत सखाराम भगवंत.

८९४ (२३१)—महादाजी नीलकंठ याचे गोटांतील बेलदार व पेंढारी यांणीं साल-

A. D. 1792-93.

pátan had his wife murdered by Sadáshiv Ganesh Kelkar of Wade in Táluka Vijayadurga who was imprisoned for the same for ten years. The latter was then released without being purified. He prayed Government to purify him, offering to pay a reasonable sum as fine. His prayer was granted, two fines (one to be paid to Government and the other to Bráhmans) being levied.

(3) Dacoity.

(893) Kalyá walad Gangáji Gola of Supe was found to have served under Berads, joined Berads and to have accompanied them on their expedition for committing dacoity. He was therefore ordered to be beheaded.

A. D. 1775-76.

(894) The Beldárs and Pendháris in the camp of Mahádáji Nilkant

सीत सबैन मया व अलफ रजब ७

गुदस्तां नवाबाचे लष्करांत लूट केली, सबब शहर बऱ्हाणपूर येथें मुलेंमाणसें सुद्धां अटकेस ठेविले आहेत. त्यांपैकीं दहा असामी जमातदार वगैरे मुख्य असतील ते ठेऊन बाकी सोडून देणें ह्मणोन, नारो कृष्ण यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

८९५ (२३५)—महिपत्या मांग, मौजे उंदीरगांव, परगणे संगमनेर, येथें राहून मुलकांत दरवडे घालीत होता. त्याणें विठ्ठल शिवाजी याचें कापड जालनापुराहून जात होतें, तें लुटून नेलें. त्याचा मुद्दा मांग मजकुराकडे लागला, सबब त्यास धरून आणावयास लोक पाठविले, तो महिपत्या पळोन गेला. त्याचीं माणसें व जमावाचे लोक सांपडले ते आणून नेवाशाचे गढींत अटकेस तुह्मीं ठेविले आहेत त्यांचीं. कलमें.

सीत सबैन मया व अलफ साबान १०

१ डोचकीं मारणें. असामी.

१ संत्या महिपत्याचा भाऊ.

८ चाकर दरवड्याचे.

२ मौजे उंदीरगांव येथील.

१ महिम्या.

१ नवशा.

२

१ अर्जुन्या, मौजे आलेगांव, परगणे टेंबुरणी.

१ सोन्या, मौजे रोठेगांव तर्फ कडवलीत.

२ मौजे आंघूर, परगणे वैजापूर.

१ गोप्या.

१ येशा.

२

A. D. 1775-76. having plundered the camp of the Nawab in the preceeding year had been sent to prison. They were now ordered to be released with the exception of 10 principal persons, Jamādārs &c.

(895) Mahipatyā Māng used to reside at Undirgaum in Pargana Sangamner and to commit dacoities in the country. On one occasion he committed robbery of some cloth be-

A. D. 1775-76.

१ विठ्या, मौजे बिलवणी, परगणे वैजापूर.

१ उद्या, कसबे वैजापूर.

―――

८

१ खंड्या, मिलाफी वाटेकरी, मौजे बहिरवाडी, परगणे नेवासें.

―――

१०

कलम.

१ सोडून देणें, महिपत्याचीं माणसें.

असामी.

१ हरकी, त्याची बायको.

१ येशा पोर, उमर वर्षे १॥

―――

२

कलम.

―――

२

एकूण कलमें दोन लिहिलीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन, रामचंद्र नारायण, परगणे नेवासें वगैरे महाल. यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

८९६ (२५३)–बाजीराव आपाजी. तालुके घोडप यांचे नांवें. सनद.

सीत सबैन मया व अलफ सवाल ११ — १ तुह्मीं हुजूर विनंति केली कीं, गावज्या भिल वस्ती मौजे कसाबखेड, परगणा माणिकपुंज, यार्णे डोंगरहटीचे भिलासीं मिळोन परगणे मजकुरीं गांवगन्ना दंगा करून लुटलें, सबब

---

longing to Vithal Siváji, which was being brought from Jálnàpur. The robbery was traced to him and he was arrested. He however absconded. His men and confederates were then seized and the following orders were passed:—

(1) Mahipatyá's brother and Mahipatya's eight servants who assisted him in his dacoities, and one person who was Mahipatyá's confederate and a sharer in his spoil were ordered to be beheaded.

(2) Mahipatyá's wife and child were ordered to be set at liberty.

(896) Gáwajyá Bhil of Kasábkhed in Parganá Mánikpunja, hav-

भिल मजकुरास धरून किल्ले धोडप येथें अटकेस ठेविला आहे ह्मणोन, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी गांव लुटले त्यांत हा होता ऐसा पत्ता पुर्ता मनास आणून भिल मजकूर त्यांत होता ऐसें असल्यास मारून टाकणें ह्मणोन सनद.

८९७ (५०७)—येशवंतराव बिन संताजी संकपाळ पाटील, व बहिरो गणेश वगैरे कुळकर्णी मौजे चांदक, प्रांत वाई, याणें लक्ष्मण कान्हेर याच्या वाडियावर चाळीस पन्नास माणूस घेऊन येऊन, दंगा करून, बेकैदी केली; सबब पाटील मजकूर याचा हक्क व मळे व मिराशीचीं शेतें वगैरे असतील व कुळकर्णी यांचें कुळकर्ण व ज्योतिषपण सरकारांत जफ्त करून जफ्तीची कमावीस तुह्मांस सांगितली असे, तरी पाटीलकीचा हक्क व शेतें व मळे, वगैरे व कुळकर्णी यांचें कुळकर्ण व ज्योतिषपणाची जफ्ती करून, जफ्तीचा आकार इमानें इतबारें करून, आकारा पैकीं तुह्मांस सालीना रुपये ७५ पाउणसे करार केले असेत, ते घेऊन बाकी ऐवज राहील तो सरकारांत पावता करून पावलीयाचा जाब घेत जाणें ह्मणोन, गोपाळ आपाजी कारकून, मार्फत मोरो हरी, यांचे नांवें. सनद १.

समान सबैन मया व अलफ सवाल १७

सदरीलप्रमाणें लक्ष्मण कान्हेर याचे नांवें सनद कीं, मशारनिल्हे अंमल करितील, तुह्मीं अडथळा न करणें ह्मणोन. सनद १.

२

परवानगी राजश्री सखाराम भगवंत.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

८९८ (५१२)—बापूजी रघुनाथ कुळकर्णी, मौजे ब्राह्मणी. तर्फ राहूरी, परगणे

A. D. 1775-76. ing attacked and plundered some villages in the Pargana, was arrested by the Kamávisdár and kept in the fort of Dhódap. It was ordered that if Gáwajyá's complicity in the crime was proved beyond doubt he should be beheaded.

(897) Yeshwantrao bin Santáji Sankpál Pátil and Bahiró Ganesh Kulkarni and others of Chádak in Piánt Wái led an attack on the house of Laxman Kánher with the assistance of 40 or 50 persons. Their watans were therefore ordered to be attached.

A. D. 1777-78.

FROM JANÁRDAN APÁJI'S DIARY.

(898) Bápuji Raghunáth Kulkarni of Bráhmani, Tarf Ráhuri in

समान सबैन मया व अलफ सवाल ३० — संगमनेर, हा मांगास मिळोन दरवडे घालीत होता. त्याचे मुद्दे कुळकर्णी मजकूर याचे घरीं निघाले, सबब त्याचें कुळकर्ण हिशाचें सरकारांत जफ्त करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी मौजे मजकूर येथील मशारनिल्हेचे हिशाचें कुळकर्ण जफ्त करून सदरहूचे उत्पन्नाचा आकार होईल तो प्रांत गंगथडी येथील हिशेबीं जमा करणें ह्मणोन, नरसिंगराव बल्लाळ यांचे नांवें छ. २० साबान. सनद १.

सदरील अन्वयें मोकदम मौजे मजकूर यांस. सनद १.

२.

रसानगी यादी.

८९९ (७१४)–कसबे बावधन, प्रांत वाई, येथें रामाजी गोविंद वाळंबेकर यांचे घरीं दरवडा पडला, सबब कसबे मजकूरचे रखवालीचे वगैरे बेरड असामी ७ सात असामी धरून किल्ले परळी येथें अटकेंत ठेवावयास पाठविले आहेत. यांचे पायांत बेड्या घालून किल्ले मजकुरीं पक्के बंदोबस्तानें अटकेंत ठेवणें; आणि पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, बाळाजी नारायण यांचे नांवें. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ रमजान १२

रसानगी यादी.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

४ चोऱ्या व दरवडे.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९०० (२४७)–येश्या व जावज्या बेरड तुह्मीं चोरीवर धरिले होते. त्यास बाजपूस

A. D. 1777-78. Pargana Sangamner used to commit dacoities with the assistance of Mángs, and stolen property was found in his house. His watan was therefore attached.

(899) A dacoity having taken place at Báwdhan in Prant Wái, seven Rakhwáldárs of the village, of the Berad caste, were arrested and sent to prison.

A. D 1781-82

(4) Theft and robberies.

FROM JANÁRDAN APAJIS DIARY.

(900) Two Berads arrested for theft died of the beating they

सीत सबैन
मया व अलफ
रमजान ३०

करितां न सांगत, ह्मणोन मार दिला याजमुळें मयत झाले, त्यास बेरडाची वस्तवानी त्याचे रुपये तुह्मांकडे येणें आहेत, ते याद तुह्मांपाशीं आहे, त्याप्रमाणें वसूल करून हुजूर पाठविणें ह्मणोन, भिकाजी आपाजी कारकून दिंमत पागा हुजूर यांचे नांवें. छ. ३ साबान. सनद १.

रसानगी यादी.

९०१ (२८५)-विश्वनाथभट पाटणकर वस्ती मौजे खेड, कसबे नेवरें, तालुके रत्नागिरी हा चोऱ्या करीत होता, ह्मणोन अटकेंत ठेविला. त्यास जामीन घेऊन सोडून द्यावा, तरी जामीन मिळेना, सबब तालुके मजकुराहून तुह्मीं हुजुर पाठविला, तो येऊन पोहोंचला, त्यास हल्लीं येथें वेदमूर्ती जनार्दनभट भिडे वस्ती मौजे महाबळ, तर्फ संगमेश्वर, तालुके मजकूर यांस विश्वनाथ भटांनीं फिरोन चोरी करूं नये, व कांहीं बदफैली करूं नये, काशीस जावें, याप्रमाणें जामीन घेऊन सोडून दिला असे ह्मणोन, महिपतराव कृष्ण तालुके मजकूर यांस. जाब १. सदरहूचा जामीन कतबा दप्तरीं असे छ. ४ सफर.

सीत सबैन
मया व अलफ
रबिलाखर १५

परवानगी रूबरू.

९०२ (३४६)-विसो दातार हा पुण्यांत लोकांचे घरीं चोऱ्या करीत होता त्यास धरून कैद करून तुह्मांकडे अटकेंत ठेवावयासी पाठविला आहे. यास किल्ले सोलापूर येथें पक्के बंदोबस्तानें ठेऊन पोटास शेर मध्यम प्रतीचा देत जाणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी. तालुके मजकूर यांचे नांवें परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस. रसानगी, पांडुरंग कृष्ण कारकून दिंमत अनंदराव काशी कोतवाल शहर पुणें छ. २८ रजब. सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २९

A. D. 1775-76

received at the hands of a kárkun in the Huzur Págá for not confessing their guilt. The kàrkun was ordered to send their property to Government.

(901) Vishvanath Bhat Pátankar of Khed in Táluká Ratnágiri being given to committing thefts was arrested and being unable to furnish security was sent by the District officer to the Huzur. Janárdan Bhat Bhide stood surety for him, promising that he would not again commit theft or any other offence and that he would repair to Benáres.

A. D. 1775-76.

(902) Viso Dátár being given to committing thefts in Poona was sent to prison in fort Sholápur. The order was given by Bàláji Janárdan and communicated to the writer of the order by a clerk of the Kotwál of Poona.

A. D. 1776-77.

९०३ (४२५)—गोपाळजी आंगरे यांजकडील चोरट्यांनीं लांजे महालांत उपद्रव केला आहे, यास्तव लोकांस बक्षीस द्यावयास करून स्वारी पाठविली आहे, ह्मणोन लिहिलें, त्यास चोरांचा पत्ता पाडून पारिपत्य करणें. जो चोर धरून आणील त्यास कार्याकारण पाहून बक्षीस देणें ह्मणोन.

सबा सबैन मया व अलफ सफर २

कलम १.

९०४ (६३६) कमावीस जमी बरहुकुम मुकुंदा भाट याणें श्रावण मासचे दक्षणेसमई रमण्यांत ब्राह्मणांचे वस्तभाव चोरली, सबब कैद करून त्याजवळ सनगें सांपडलीं ते गुदस्तां त्रिंबक मोरेश्वर कारकून दिंमत हशम, सनगें एकूण. आंख.

समानीन मया व अलफ शाबान २३

५	दुपट्टे धुवट फाटके	२
।·	टोपी डोईची छिटी	१
५।		३

९०५ (६८५)—गळी गुजर वगैरे वस्ती कसबे बारामती याचे घरचे चाकरांनीं भाईचंद गुजर वस्ती कसबे मजकूर याचे घरीं चोरी केली ते. असामी.

इहिदे समानीन मया व अलफ रमजान ६

१ खेत्र्या पवार.
१ राणु गावडा.
१ जोगु मचाला.

३

एकूण तीन असामी वस्तवानीसुद्धां सांपडले. ते तुह्मीं धरून गुजराची वस्तवानी माघारी देऊन कैद करून ठेविले आहेत; त्यांचीं शासनें करावयाची आज्ञा जाली पाहिजे. ह्मणोन

(903) Mahál Lánje being infested by robbers, order was issued to trace and punish them, and permission was given to grant suitable rewards to those who might assist in arresting the offenders.

A. D. 1776-77.

(904) Mukundá Bhát stole articles belonging to Brahmins who were assembled at Ramná for the purpose of receiving the Daxiná disbursed during the month of Shrávan. He was imprisoned, and clothes worth Rs. 5-4 found on him were confiscated.

A. D. 1779-80.

(905) Three persons committed theft at the house of Bháichand Gujar of Bárámati and were arrested with the property stolen. Pándurang Báburao returned the property to

A. D. 1780-81.

तुह्मांकडील आपाजी बाबाजी यांणीं हुजूर विनंती केली; त्याजवरून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहू तीन असामींचीं शासनें एकेक हात तोडून सोडून देणें; आणि हुजूर लिहून पाठवणें ह्मणोन, पांडुरंग बाबूराव यांस. सनद १.

रसानगी, आपाजी बाबाजी दिंमत पांडुरंग बाबूराव.

९०६ (८४४)—तालुके रत्नागिरी येथें शामल जंजीरकर याजकडील चोरांचा उपद्रव जाहला होता, याजकरितां लोक स्वारीस पाठविले, त्यास लोकांनीं चोर धरून आणिल्यास पन्नास रुपये बक्षीस द्यावयाचा करार केला, त्याप्रमाणें लोकांनीं चोर धरून आणिले, सबब सरकारांतून पन्नास रुपये बक्षीस द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणून तुह्मीं हुजूर विनंती केली; ऐशास शामलाकडील चोरटे धरावयाची मेहेनत लोकांनीं चांगली करून चोरटे धरिले, सबब बक्षीस एक साला रुपये पन्नास ५० रुपये द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे. तरी सदरील पन्नास रुपयांची नांवनिशीवार लोकांस वांटणी करून. तालुके मजकूर येथील हिशेबीं खर्च लिहिणें ह्मणोन, महिपतराव कृष्ण यांचे नांवें. सनद १.

अर्बा समानीन
मया व अलफ
जमादिलाखर १६

रसानगी यादी.

९०७ (९०४)—कोंकणप्रांतीं चोरटे चोऱ्या करीत होते, त्यांस तुह्मीं धरून आणून चौकशी करून त्यांचे अपराध हुजूर लेहून पाठविले; त्याजवरून चोरांचीं पारिपत्यें करावयाचीं. बीतपशील.

सीत समानीन
मया व अलफ
मोहरम ८

२० डोकीं मारावयाचे. असामी.

१ माना म्हार वारूळकर वस्ती हाय तर्फ मरल माहाल.
१ सोना बिन गणोजी शेलार, वस्ती ढोकवलें, तर्फ हेळवाक.
१ कृष्णशेट बिन पांडशेट सोनार चिपळुणकर, हल्लीं वस्ती कसबे बामणोली, तर्फ मजकूर.

---

the owner and solicited orders for the disposal of the thieves. He was directed to cut off one hand of each of the offenders and to set them at liberty.

(906) A reward of Rs. 50 was offered for the capture of robbers residing in the territory of the Janjirkar who used to commit robberies in the Táluká of Ratnágiri. The robbers having been captured, the rewards were ordered to be paid.

A. D. 1783-84.

(907) The following sentences were passed on 58 persons (Mahárs, Sonárs &c.) who were concerned in thefts committed in the Konkan and whose cases were reported for orders:—

A. D. 1785-86.

१ लक्ष्मण बिन धोंडशेट सोनार, वस्ती येलें, प्रांत सातारा. संभशेट, व जानशेट सोनार तांबीकर, यांचे घरचा पोर्गा.
१ बाळू बिन माहादजी पाकडा, वस्ती मौजे भेडसगांव. प्रांत पनाळा.
१ देवा बिन बहिरू महार, वस्ती मौजे पांचगणी, तर्फ मरळी महाल.
१ गणा म्हार बिन हिरा काजुरलीकर हल्लीं वस्ती पाटण.
१ नाना म्हार बिन खंडा म्हार तळेकर हल्लीं वस्ती मौजे उमरडें तर्फ मरळी.
१ रघा बिन दुलबा म्हार वस्ती मौजे पाली तर्फ तांब तालुके व्याघ्रगड.
१ राया बिन धारा म्हार वस्ती मौजे उमेरडें तर्फ परळी.
१ जान्या बिन धारोजी हेमण वस्ती मौजे कुलकवाडी.
१ लख्या बिन देवजी राणिक, वस्ती मौजे कुलकवाडी.
१ भिका बिन कृष्णाजी बुटर्या, वस्ती कुलकवाडी.
१ सोना बिन ताना भोवड, वस्ती कुलकवाडी.
१ लक्ष्मण बिन बाळकोजी बुटर्या, वस्ती चिपळूण.
१ लक्ष्मण बिन बाळकोजी मोन्या. वस्ती मौजे कुलकवाडी.
१ गोपाळ सावंत देसाई, वस्ती मौजे मेढें. तर्फ फुणगुस.
१ कृष्णाजीराव खानवीलकर वस्ती मौजे बुडीयें. तर्फ फुणगुस.
१ लख्या काबल्या, वस्ती मौजे नारसिंगें तर्फ फुणगुस.
१ मादु रायकर वस्ती मौजे मेढें तर्फ फुणगुस.

२०

१३ उजवा हात व डावा पाय तोडावयाचे. असामी.

१ तान शेट सोनार वस्ती मौजे कुसवडें तर्फ पाटण.
१ होना लव्हार वस्ती मौजे ढोकवलें, तर्फ हेळवांकला.
१ महादजी बिन रुपाजी पाकडा, वस्ती मौजे भेडसगांव.
१ येसू बिन रुपाजी पाकडा वस्ती मौजे भेडसगांव.
१ गोदा बिन येसू पाकडा वस्ती मौजे भेडसगांव.
१ ताना म्हार बिन रामा म्हार पालकर. हल्लीं वस्ती मौजे मरळी.
१ धाका बिन भिका म्हार वस्ती मौजे बिचोर्डी तर्फ हेलवाक.
१ जिवाजी विचारा वस्ती मौजे हसोल हल्लीं वस्ती कुलकवाडी.
१ रघोजी पोर्गा निसबत वाजोजी शिंदे वस्ती कुलकवाडी.

20 Persons to be behead d,
13 ,, to have the right hand and left leg cut off,

१ अंतशेट बिन बाळशेट सोनार वस्ती मौजे खडपवली तालुके चिपळूण.
१ रत्नोजी बिन रामजी कदम वस्ती मौजे कुलकवाडी.
१ नारशेट बिन दादशेट सोनार मुरुडकर, हल्लीं वस्ती कसबे पुणें.
१ लक्ष्मण बिन आपाजीराव सुर्वे, कुंभारखाणकर.

१३

१८ उजवा हात तोडावयाचे. असामी.

१ गोरखोजीराव इंदुलकर वस्ती मौजे कुसवडें तर्फ पाटण.
१ हणमंता इंदुलकर, वस्ती मौजे कुसवडें. तर्फ पाटण.
१ हिरोजी इंदुलकर, वस्ती मौजे कुसवडें, तर्फ पाटण.
१ बाळोजीराव इंदुलकर वस्ती मौजे कुसवडें, तर्फ पाटण.
१ गणसालवी वस्ती मौजे कुसवडें तर्फ पाटण.
१ लक्ष्मण बिन विठोजी शेलार ढोकवलकर वस्ती मौजे रासाटी. तर्फ पाटण.
१ सेका बिन भानजी भांगड्या वस्ती मौजे कुसवडें तर्फ पाटण.
१ सेका बिन आपाजी सेड्या, वस्ती मौजे धावडें, तर्फ मरळी.
१ रता बिन सोना म्हार, वस्ती मौजे सावरट, तालुके व्याघ्रगड.
१ माला बिन विठा म्हार, वस्ती मौजे उंबरणें, तर्फ मरळी.
१ संता बिन हरनाक म्हार, वस्ती मौजे उंबरणें, तर्फ मरळी.
१ भाना बिन मामल, हल्लीं वस्ती मौजे हाय. तर्फ मरळी.
१ वाकू बिन नागोजी धावडा. वस्ती मौजे कुलकवाडी.
१ चिमा बिन उदाजी पाटील, वस्ती मौजे खडपवली, तर्फ चिपळूण.
१ कृष्णशेट बिन बाळशेट वस्ती. मौजे खडपवली. तर्फ चिपळूण.
१ लक्ष्मण बिन माणकोजी सालवी, वस्ती लवलें, तर्फ खेड.
१ हरी गुरव, वस्ती मौजे तिवरें. घेरा प्रचितगड.
१ रखा गुरव, वस्ती मौजे राई, तर्फ फुणगुस.

१८

४ उजवा हात व कान एक कापावयाचे असामी.

१ वहिरू शेलार, वस्ती मौजे कुसवडें, तर्फ पाटण.
१ भागा बिन भिका म्हार, दरेकर, हल्लीं वस्ती मौजे सावरठ, तर्फ तांब
१ सनू बिन धारोजी धामशा. वस्ती मौजे कुलकवाडी.

18 Persons to have the right hand cut off,

१ राजू बिन हिरोजी राणीक, वस्ती कुलकवाडी.

४

१ सोना बिन संता म्हार, वस्ती मौजे पापरडें, तर्फ मरळी, याचा उजवा हात व पाय तोडावा.

१ साना बिन ताना म्हार, वस्ती त्र्यांबंबली, तर्फ (देव)रुख, याचा एक कान कापावा.

१ संभाजी बिन हरजी दुगणकर, वस्ती मौजे कुलकवाडी, तर्फ चिपळूण, विशोभित करून फिरऊन मक देऊन मागवा.

५८

एकूण अठ्ठावन असामींची सदरहू लिहिल्याप्रमाणें पारिपत्य करणें ह्मणून. महिपतराव कृष्ण मामलेदार तालुके रत्नागिरी यांस. सनद १.

रसानगी यादी.

९०८ (९३१)-तालुके अंजणवेल येथें वर्दीवान आहेत. त्यांचे पारपत्याची आज्ञा, जाहली पाहिजे ह्मणोन तुह्मी विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें त्यास. कलमें.

सबा समानीन मया व अलफ सवाल २३

मल्हार आपाजी व त्याचा पोरगा हुजूरून किल्ले बहिरवगड येथें अटकेस ठेवावयासी पेशजीं पाठविला, त्यास मल्हार आपाजी सर्दीमुळे आजार होऊन मृत्यु पावला; पोरगा अटकेस आहे ह्मणोन लिहिलें. त्यास पोर्ग्यास जामीन घेऊन सोडून देणें. कलम १.

येसा गुलाम निस्बत रामचंद्रभट गद्रे, वस्ती मौजे पालशेत, तर्फ गुहागर, हा भटजींचे घरी मनस्वी वर्तणूक करून कामकाज न करी, यास्तव त्यांणी सोड दिल्ही, त्याणें मुलकांत ब्राह्मणांचे घरी दोन तीन वेळां चोऱ्या केल्या; सबब अटकेस ठेविला आहे, ह्मणोन लिहिलें. त्या चोऱ्या कोण

---

4 Persons to have the right hand and one ear cut off.
3 " " * * *

(908) A slave, named Yesa, belonging to Rámchandrabhat Gadre of Palset in Tarf Guhagar shirked work, and behaved impudently Rámchandrabhat therefore discharged him. The slave then began to commit thefts. He was arrested and orders were solicited by the Mámlatdár of Anjanwel as to his disposal. Full details as to the places of thefts and the amount stolen in each case were called for, and the Mámlatdár was informed that on

A. D. 1786-87.

ताना देवळ्या कुणबी, वस्ती मौजे आडुर, तर्फ गुहागर, याणें मौजे वलणेश्वर, तर्फ मजकूर, येथें फिरस्ती महारीण होती तिजबराबर बदकर्म केलें; सबब अटकेस ठेविला आहे ह्मणोन लिहिलें, त्यास याचें घर जफ्त करून वस्तभाव तालुके मजकूरचे हिशेबीं जमा करणें; आणि यास पोटास शिरस्तेप्रमाणें शेर देऊन इमारतीवर काम घेत जाणें. कलम १.

कोणते जागा, किती ऐवजपर्यंत केल्या, तें तपशीलवार लेहून पाठवणें. समजोन आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें; तोंपर्यंत पोटास शेरशिरस्तेप्रमाणें देत जाणें; इमारतीचें काम घेणें. कलम १.

एकूण तीन कलमें सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन, त्रिंबक कृष्ण यांचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

५ फसवणूक.

सुमान सबैन मया व अलफ सफर २६

९०९ (५४१)—शहर पुणें येथील कोतवाली पेशजीं घासीराम सावळदास याजकडे होतीं, तेव्हां त्यांणीं रमाबाई ब्राह्मणीण बायको, चांभारगोंदेंकरीण, इजपासून सवाष्ण जेवावयासी गेली ह्मणोन निमित्य ठेऊन पन्नास रुपये घेतले आहेत. त्यास रमाबाईकडे सवाष्ण जेवावयास गेली असें लागत नाहीं. याजकरितां हल्लीं रुपये ५० पन्नास माघारे द्यावयाचे केले असत; तरी मशार निल्हेचे फाजील कोतवाली संबंधें सरकारांत आहे, त्यांपैकीं सदरहू पन्नास रुपये रद्द कर्ज लिहून रमाबाईस देविले असे, तरी देणें; आणि पावलीयाचें कबज घेणें. ह्मणोन आनंदराव कासी कोतवाल यांचे नांवें. छ. १२ जिल्हेज. सनद १.

---

receipt of the information, final orders would be passed. A prisoner died of cold in the fort of Bahiravgad; his son who was also in prison was ordered to be released.

(5) Cheating.

A. D. 1777-78.

(909) Ghásirám Sáwaldás who was formerly a Kotwal of Poona, fined a Brahmin widow Rs. 50 for going to dine at another Brahmin's house under the pretence that her husband was alive. The Huzur considered that the charge was not proved and ordered the money to be refunded to her.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

६ चोरीचा माल घेणें.

९१० (७२४)–अबदुल रहिमान जमादार, निसबत हुजूर हशम, यांणीं हुजूर विदित केलें कीं, लाड महमद व शेख चांद यांजपासून मीं चोरीचे दागिने विकत घेतले, सबब कसबे जुन्नर येथें माझें घर आहे त्याची जफ्ती बाळाजी महादेव यांणीं करून वस्तभाव वगैरे बीतपशील.

इसन्ने समानीन मया व अलफ सवाल १८

नक्त रुपये १७

सनगें एकूण किंमत अजमासें रुपये.

१९। महंमुद्या ४

४ तिवट १

१७॥ शेले ४

९ लुगडें चंद्रकळा.

४९॥

कापड

दागिनें.

१ जामा बुट्टेदार.

२ वासनें छिटी.

१ रुमाल.

१ वळी.

१ मूठ.

१ कंठाळ.

७

बैल सर २

एकूण सत्रा रुपये नक्त व पावणेपन्नास रुपयांचीं सनगें, व सुमारें दागिने सात, व बैल दोन येणेंप्रमाणें किले शिवनेरीस नेलें आहे; येविशीं आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून येविशींची चौकशी हुजूर मनास आणिता जमादार मजकूर याणें एकशेंवीस रुपयांचे दागिने चौघांस दाखऊन घेतले, चोरीचे असे टावकें नाहीं. याप्रमाणें जालें, सबब याची जफ्ती केली आहे ते मोकळी करून हें पत्र सादर केलें असे. तरी सदरहूप्रमाणें वस्तभाव व घर कागदपत्र जफ्तीस ठेविलें आहे तें याचे हवाली करणें; व अबदुल रहिमान यास जामीन सदरीलविशीं हुजूर घेतला. याजकरितां शिवनेरीस तुह्मी जामीन घेतला आहे त्याचा कतबा माघारा देणें ह्मणोन. बाळाजी महादेव यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

(6) Receiving stolen property.

(910) Abdul Rahuman's property was attached by Bálájí Mahadeo (officer of Junnar) on the ground that he has purchased stolen ornaments. Abdul applied to the Peshwá. It was found that Abdul purchased the ornaments publicly and in good faith. His property was therefore ordered to be released from attachment

A. D. 1781-82.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

७ बनावट दस्तऐवज.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९११ (४८६)—बाळाजी केशव करडेले. दिंमत गणपतराव विष्णु गद्रे, याणीं हुजूर विदित केलें कीं. कृष्णाजी सदाशिव, वस्ती मलगांव, परगणे निंबाईत, याणीं खोटी हुंडी भगवंत बहिरव थथे औरंगाबादकर, याचें नांवची राखले रावजी दामोदर, नामें जोग बाळकृष्ण हरी गद्रे निसबत त्रिंबकराव विश्वनाथ यास द्यावें, अशी लिहिली. त्याचा ऐवज हुंडीप्रमाणें आपण दिल्हा. पुढें थथ्यांची रुजवात होतेसमयीं बोलले कीं. हुंडी खोटी; आमचे दुकानची नव्हे; ऐवज घेतला नाहीं. तेव्हां त्याचा शोध करितां, कृष्णाजी सदाशिव यानें खोटी हुंडी लिहिली; त्याजवरून सरकारांतून ताकीदपत्रें दिल्हीं की, खोटी हुंडी लिहिली त्याणीं ऐवज द्यावा. असें असतां, कृष्णाजी सदाशिव ऐवजाचा निकाल करून देत नाहीं ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं कृष्णाजी सदाशिव यास पागा असीउमरी येथें आणून त्याजपासून व्याजसुद्धां ऐवज घेऊन, त्यापैकीं सरकारची चौथाई घेऊन, हुजूर पागेचा हिशेबीं जमा करून बाकी ऐवज बाळाजी केशव याचा देणें. याशिवाय कृष्णाजी सदाशिव याजपासून साधेल ते गुन्हेगारी घेऊन. हिशेबीं जमा करून, हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन, गंगाधर शंकर यांचे नांवें. छ. २६ जमादिलाखर, चिटणिसी. पत्र १.

समान सबैन मया व अलफ रजब ३०

९१२ (६५५) चिंतो रामचंद्र भोपटकर याणें कृत्रिमीं पत्रें हातानें शिक्के करून.

(7) Forgery.

FROM JANÁRDAN ÁPÁJI'S DIARY.

(911) Krishnáji Sadáshiv of Malgám in Parganá Nimbáyet forged a hundi and cashed it. He was ordered to pay back the amount fraudulently received of which one fourth was to be credited to Government, and to pay as large a fine as possible.

A. D. 1777-78.

(912) Chinto Ramchandra Bhopatkar, forged false documents and seals. He was therefore imprisoned in fort Sinhgad and orders were issued not to allow him access to pen paper and ink.

A. D. 1779 80.

समानीन मया व अलफ जिल्हेज २

साधकांचीं खोटीं पत्रें लोकांस करून दिल्हीं, सबब त्यास किल्ले सिंहीगड येथें अटकेंत ठेवावयास पाठविला आहे, तरी शाई व लेखणी व कागद त्याजवळ न जाई असा पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें किल्ले मजकूरपैकीं देत जाणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

७ न्यायखातें.

(ब) फौजदारी.

(अ) गुन्हे.

८ जबरीचीं लग्नें.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

सीत मबैन मया व अलफ रमजान ३०

९१३ (२४१)—बापूजी आपाजी केळकर यांची कन्या दोहो सवा दोहो वर्षांची सदाशिवभट करमरकर, वस्ती सातारा, यांणीं जबरदस्तीनें धरून नेऊन गोपाळ कृष्ण कानिटकर याचा पुत्र मुका, यास देऊन लग्न करविलें; आणि मुबदला गोपाळ कृष्ण कानिटकर यांची कन्या सदाशिवभटानीं आपल्या बंधूस केली. केळकराची कन्या दुसरी नवरी थोर असतां धाकटी कन्या धरून जबरदस्तीनें नेऊन लग्न लाविलें. सबब करमरकर व कानिटकर या उभयतांचे घरांस बहिष्कार घालणें, व त्यांची घरें वस्तभावमुद्धां जप्त करणें; दोघाचे घरास बहिष्कार घालून जप्ती केल्याचें सविस्तर हुजूर लेहून पाठविणें ह्मणोन. सनदा.

१ कृष्णराव अनंत, मुक्काम सातारा. यास कीं, सदाशिवभट करमरकर, याचे घरास बहिष्कार घालणें; आणि घर वस्तभावमुद्धां जप्त करणें, व ज्या गांवीं मुलीचें लग्न लागलें तेथील जोशी उपाध्ये यास आणून हुजूर पाठविणें ह्मणोन.

---

(8) Forced marriage.

FROM JANARDAN ÁPAJI'S DIARY

A. D. 1775-76

(913) Sadáshiv Bhat Karmarkar of Satára forcibly took away a daughter of Bápuji Apáji Kelkar, aged two years or two years and a quarter, and married her to Gopál Krishna Kanitkar's dumb son, and in return for this service, Gopál Krishna's daughter was married to Sadáshiv's brother. Bápuji Apáji had another elder unmarried daughter and the marriage of the younger daughter was therefore improper. Sadáshiv's and Gopál's families were

१ श्रीनिवास शामराव कमाविसदार, प्रांत कराड यास कीं. गोपाळ कृष्ण कानिटकरास, धाकटी कन्या धरून आणली, असें कळलें असून तिचें लग्न आपल्या पुत्राशीं केलें, सबब कानिटकराचें घरास बहिष्कार घालणें; आणि घर वस्तभाव देखील मौजे टेंबू, प्रांत मजकूर येथें इनाम जमीन आहे, ते वगैरे जें कानिटकराचें असेल त्यासुद्धां जफ्त करणें ह्मणोन.

२

रसानगी यादी, छ. १४ साबान.

९१४ (५६४)-हरी महादेव करमरकर, वस्ती कसबे बीरवाडी, तर्फ मजकूर, यांचे बंधूची कन्या नवरी आहे, तीस त्रिंबक धारप याणें धरून रानांत नेली, त्याजबद्दल येस जोशी उपाध्ये तर्फ मजकूर, व आबाजी बाबाजी धारप हे उभयतां रानांत जाऊन तिशीं त्रिंबक धारप याचें लग्न लाविलें, ऐसें येस जोशी व आबाजी बावाजी ह्मणतात ह्मणोन हुजूर विदित जालें. त्याजवरून मनास आणतां मूल धरून नेली, तिचें लग्न येस जोशी यांणीं रानांत लाविलें, हा महद् अन्याय केला, सबब त्यांचें वतन जप्त करावयाविशीं हे सनद सादर केली असे, तरी मशारनिल्हेचें तर्फ मजकूरचें ज्योतिष व उपाध्येपण सरकारांत जप्त करणें; आणि सरकारढलाईत पाठविले आहेत. यांजबराबर त्रिवर्गास हुजूर पाठऊन देणें म्हणोन, कृष्णाजी रामचंद्र तर्फ बीरवाडी यांचे नावें. छ. २४ रविलाखर. सनद १.

समान सबैन मया व अलफ जमादिलावल ८

रसानगी यादी.

९१५ (६८०)-सदाशिव नागनाथ यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपण मौजे

---

therefore excommunicated and their property was ordered to be attached. The Joshis and priests officiating at the marriage were also summoned to the Huzur.

(914) Government was informed that Trimbak Dhárap of Birwádi in Taluká Birwádi forcibly took away Hari Mahádev Karmarkar's daughter outside the village and there married her. A certain Joshi officiated as priest and Abáji Bàbáji Dhàrap was with him. The officer of Birwádi was informed, that the offence was very serious, and was directed to attach the Joshi's watan and to send the three offenders to the Huzur.

A. D. 1777-78.

(915) Sadáshiv Nágnáth, an inhabitant of Anantgaum in Pargana Ambe Jogái went on a pilgrimage to the Godávari, leaving his wife and daughter at home. Náro Báwáji

A. D. 1779-80.

समानीन मया व अलफ जमादिलावल ५.

अनंतगांव, परगणे आंबेजोगाई, येथें वस्तीस गहतों. त्यास गुदस्तां जेष्ठ- मासीं आपण सिंहस्थास गोदास्नानास गेलों, घरीं कुटुंब होतें; व आ- पली कन्या लग्न करावयाची मूल होती. त्यास नारो बावाजी व केसो बावाजी कुळकर्णी आंबेकर, यांणीं आपण घरीं नाहीं ऐसी संधी पाहून जेष्ठ शुद्ध सप्तमीस अस्तमानीं दहा प्यादे व शेषभट आंबेकर ऐसे आणून आमचे घरीं मारामार करून मुली- स धरून शेजारी सटवाजी पाटील मौजे मजकूर, यांचे आंगणांत नेली. तेंच दिवशीं त्या पाटिलाची भावजई मेली होती, तशीच मुलीस त्याचे आंगणांत उभी करून नारो बावाजी यांणीं आपले आंगावरील पांगरूण मधीं धरून केसो बावाजी एकीकडे उभा राहिला, व एकीकडे मुलीस उभी केली, आणि शेषभटानें मंगलाष्टकें म्हणोन. मुलीचे गळ्यांत मंगळ- सूत्र बांधोन, नाक टोंचोन, नथ घालून, मुलीस सोडून दिल्ही, आणि ते निघोन गेले. त्यास ब्राह्मणाचें लग्न नांदी श्राद्ध, सप्तपदी इत्यादिक कोणताही विधी केला नाहीं, ह्मणोन. ऐसी- यास केसो बावाजी कुळकर्णी यांणीं सदाशिव नागनाथ यांचे कन्येस धरून नेऊन शेषभ- टास नेऊन लग्नाचा विधी पुर्ता न करिता मंगळाष्टकें मात्र ह्मणोन मंगळसूत्र बांधोन ना- कांत नथ घालून सोडून दिल्ही, याप्रमाणें अविधिकर्म जाहालें, तर्‍हां तुह्मीं कुळकर्णी मज- कुरास व शेषभटास व आणीक या कर्मांत होते त्यांस बहिष्कार घालून, जाहालें वर्तमान हुजूर लेहून पाठवावें तें न केलें, हे कोण गोष्ट ? हलीं हें पत्र लिहिलें असे, तरी याउपरी त्यांणीं सदरहूप्रमाणें केलें त्यांस बहिष्कार घालून घडला प्रकार चौकशी करून हुजूर लिहून पाठवणें ह्मणोन, समस्त ब्राह्मण क्षेत्र आंबेजोगाई, यांचे नांवें. पत्र १.

मुतालिक ह्यांचे रोजनिशीपैकीं.

९५६ (३) श्रीसिद्धेश्वर महादेव, वास्तव्य कसबे पैठण, येथें देवालयांत श्रीचे पुजेचीं उपकर्णे, व वस्त्रें, व पूजेचें साहित्य नेहेमीं असतें, व देवालयांत रात्रीं गरीब वाटसरू वगैरे राहतात; याजकरितां देवालयाजवळ रात्रीस चौकी पाहारा नेहमीं ठेवावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी परगणे मजकूरचे नेमणुकचे प्याद्यांपैकीं दोन मराठे व दोन महार एकूण चार असामी श्रीचे देवालयाजवळ चौकीस रात्रीं दररोज देऊन चौकी पाहारा करवीत जाणें म्हणोन, कमाविसदार वर्तमान, व भावी परगणे पैठण यांस.

खमस सबैन मया व अलफ रमजान २२

सनद १.

रसानगी यादी.

९५७ (२१९) क्षेत्र पंढरपूर येथें चोरांचा उपद्रव होतो, सबब तेथील रखवालीस सनदी प्यादे असामी २५ पंचवीस ठेवावयाची तुम्हांस आज्ञा केली असे, तरी पंचवीस प्यादे चांगले पाहून दीड महिना ठेऊन क्षेत्र मजकूर येथील चोरांचा बंदोबस्त करणें. क्षेत्र मजकूर येथील ऐवजीं तुम्हांस मजुरा पडेल म्हणोन, चिंतो रामचंद्र कमाविसदार, क्षेत्र मजकूर, दिंमत परशराम रामचंद्र यांचे नांवें.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २८

सनद १.

परवानगी रूबरू.

९५८ (४९५)–कृष्णराव अनंत यांचे नांवें पत्र कीं, शहर सातारा येथील रखवा-

---

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(956) The Kamávisdár of Paithan was directed to keep a guard consisting of 2 Maráthá peons and 2 Mahárs at night at the temple of Siddheshwar Mahádeo at Paithan to protect the property belonging to the deity as also the poor travellers who stopped at the temple.

A. D. 1774-75

(957) There being many thieves at Pandharpur, the Kamávisdár was directed to entertain 25 additional peons and to put down the thefts.

A. D. 1774-75.

(958) Krishnarao Anant engaged 33 Mángs and Berads to keep watch in the town of Satárá on a salary of Rs. 263 per month and a half. He was directed to levy the amount, which came to Rs. 2104 a year, from merchants and traders and well-to-do people in the town. No contribution was to be levied from the poor. It was ordered that a security bond should be taken from the

A. D. 1777-78.

समान सबैन मया व अलफ रमजान ८ — लीस मांग, व बेरड असामी ३३ तेहतीस यांस रोजमरा दीड माही रुपये दोनशेंत्रेसष्ट करून तुह्मीं ठेविले आहेत, त्यास एक रोजमरा शहरांत पटी करून दिल्हात. पुढें रोजमरीयास ऐवज पाहिजे त्याचा आकार सरसालचे रोजमरे आठ एकूण रुपये २१०४ एकविसशें चार होतात, त्यास शहरांत मातबर सावकार, व ग्रहस्थ, व वाणीउदमी मातबर पाहून सदरहू ऐवजाची पटी ठरावून ऐवज वसूल करून बेरडांस देत जाणें. गोरगरीबांवर पटी न करणें ह्मणोन. पत्र. १

शहरांत अगर भवरगावीं चोरी जाल्यास बेरडांनी भरून द्यावी याप्रमाणें त्यांचा कागद लिहून घेऊन पक्का जामीन घ्यावा. याप्रमाणें करून मग पटी करून रोजमरियाचा ऐवज देणें म्हणोन पत्रांत लिहिलें असे.

९५९ (५१८)–बाळाजी गणेश यांस सनद कीं, पिलाजी, व तानाजी ताकपीर, शिलेदार यांस पथकसुद्धां चोरांच्या पारपत्यास तालुके देवगड येथें पाठविले आहेत. स्वार असामी.

समान सबैन मया व अलफ जिल्काद ३०

७ खासे.
२ कारकून.
११६ स्वार.

१२५

एकूण सवाशें असामी रवाना केले आहेत, तरी यांजपासून चाकरी घेत जाणें, यांचे रोजमरीयाची बेगमी हुजूर जिल्हेज अखेरपर्यंत जाली आहे, तुह्मी त्यांची गणती घेऊन हुजूर पाठवणें, आणि गणतीप्रमाणें चाकरी घेत जाणें. पुढें रोजमरा यांस हुजरून पावत जाईल, ह्मणोन, छ. २७ सवाल. सनद १.

परवानगी रूबरू.

९६० (७७२)–पांडुरंग भोंडजी कमाविसदार परगणे नाशिक यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जालें. नाशिकांत चोऱ्या होतात, व दरवडे पडतात यांचे बंदोबस्तास हुजरून लोक पाठवावे ह्मणोन लिहिलें; त्याजवरून गाडदी राहिले दिंमतहाय. असामी.

सलास समानीन मया व अलफ साबान २७

३१ दिंमत रणबाजखान.
३० दिंमत मीर अबास.

Berads promising to make good all property stolen in the town or in its neighbourhood.

(959) Piláji and Tanáji Tákpir Silledár were sent with their detachment of 116 horse to punish robbers in Táluká Dewgad, and their expenses were paid from the Huzur.

A. D. 1777-78.

(960) Thefts and dacoities having occurred in Násik, the Kamávis-

२० दिंमत अबदुलसतार.

२० दिंमत सेरजमालखान.

१०१

एकशेंएक असामी पाठविले असत, तरी यांस नाशिकांत ठेऊन चोऱ्यांचा, व दरवड्यांचा बंदोबस्त चांगला करणें. गाडद्यांस पर्जन्य काळानिमित्य राहावयास निवारा करून देणें ह्मणोन, मशारनिल्हेचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू.

९६१ (८२२)–मौजे करंजगांव, तर्फ नाणेंमावळ, येथें वेदमूर्ती हरभट उपाध्ये यांचे घरीं दरवडा पडला, सबब मौजे मजकुरीं रखवालीस शिपाई देविले असेत, तरी नेमून देऊन रुजू दोन महिनेंपर्यंत तेथें ठेवणें म्हणोन. सनदा.

अर्बा समानीन मया व अलफ. सवाल ५

१ तालुके राजमाची, निसबत रामराव नारायण यांजकडून राजमाचीपैकीं कर्णेकरीसुद्धां असामी ६ सहा देविले त्याविशीं.

१ किल्ले विसापूर निसबत भिकाजी गोविंद यांजकडून किल्ले मजकूरपैकीं असामी ५ पांच देविले त्याविशी.

२

रसानगी, सदाशिवभट नानल.

९६२ (८२३)–तालुके चास येथें सटवाजी हजारी वगैरे कोळी यांणीं दंगा करून, रयतीपासून खंड घेऊन, घरें जाळलीं, यांजकरितां पेशजीं हुजुरून कोळ्यांचे बंदोबस्तास पन्नास लोक हशमी पाठविले आहेत, त्या शिवाय तालुके मजकूरचे माहितगार लोक जदीद छ. २० रजबपासून असामी ३० तीस एकूण दरमहा दर असामीस तैनात रुपये ५ पांच निवळ आकरमाही

अर्बा समानीन मया व अलफ. सवाल १४

A. D. 1782-83. dár asked for assistance from the Huzur. A force of 101 Rohilá Gárdis was sent to him for the purpose.

(961) A dacoity having occurred at Karanjgaum in Turf Nánc-Máwal at the house of a priest, Harbhaṭ Karve. 11 peons were sent for two months to protect the village.

A. D. 1783-84.

(962) Saṭwáji Hajári Koḷi was making attacks on the village of Táluká Chás, levying black-mail and burning houses. Fifty soldiers were therefore sent from the Huzur to

A. D. 1783-84.

शिरस्तेप्रमाणें करून ठेविले आहेत, त्याप्रमाणें हुजुरून लोक करार करून दिल्हे पाहिजेत, ह्मणोन तुह्मीं विनंती केली; त्याजवरून तुमचे ठेवणुकेप्रमाणें तीस असामी सदरहू तारखेपासून करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी चोरांचा बंदोबस्त होईतोंपर्यंत लोक ठेवणें. बंदोबस्त जाल्यावर लोक दूर करणें; आणि सदरहू लोकांचा आकार होईल तो तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें, मजुरा पडेल ह्मणोन, नीळकंठराव रामचंद्र यांचे नावें.

सनद १.

रसानगी यादी.

९६३ (८८१)–शहर अमदानगर येथें चोरांचा उपद्रव होऊन दरवडे पडतात, याजकरितां शहर मजकूरचे रखवालीस माणसें ठेवावयाकरितां शहरात बाहेरील बिछाइती वाणी किराणा, भुसार वगैरे जिन्नस आणून विक्री करितात, त्यांस बिछाइतीची अडत शहर मजकूर येथील जो उदमी करील त्यास त्यांणीं पोटास द्यावें, याप्रमाणें पेशजीं पासून चालत आहे, त्यास बिछाइतीयाची अडत एकाचे जिमेस लाविल्यास हजार बाराशें रुपये पर्यंत दरसाल उत्पन्न होतील. यास्तव बिछाइतीयांची अडत एकाचे जिमेस लाऊन देऊन, आकार होईल तो शिबंदीखर्चास नेमून द्यावा. ह्मणजे शहर मजकूरचे दरवड्यांचा वगैरे बंदोबस्त होईल. ह्मणोन तुम्हांकडील कारकुनांनीं विनंति केली; त्याजवरून शहर मजकुरीं बिछाइती वाणी येतात, त्यांची अडत एकाचे जिमेस लाऊन, त्यास काम सांगून आकार होईल त्याची शिबंदी ठेऊन, दरवड्यांचा वगैरे शहरचा बंदोबस्त करणें, एक हजार निदान बाराशें रुपयांवर जाजती आकार जाल्यास सरकारांत जमा करीत जाणें ह्मणोन, विठ्ठल नारायण मामलदार, तालुके अमदानगर यांचे नावें.

खमस समानीन मया व अलफ जमादिलावल २४

सनद १.

रसानगी यादी.

९६४ (९९३)–श्रीत्रिंबकेश्वरीं सिंहस्थाकरितां गोसावी वगैरे जमा होतात.

---

put down the Kolis, and sanction was accorded to ~~the entertainment~~ of 30 additional men at Rs. 5 each for the same purpose.

(963) Owing to the prevalance of dacoities at Ahmednagar, the employment of Rakhwáldars was sanctioned and provision was made for their pay out of the revenue realized by the sale of the brokerage monopoly of goods brought for sale from outside the town.

A. D. 1784-85.

(964) It being the Sinhastha year, it was expected that Gosávis would flock in large numbers to Trimbakeshwar, and that quarrels and disputes would take place. Two

A. D. 1788-89.

तिसैन समानीन मया व अलफ सवाल ८

त्यांत कजेकफावती करतील, याजकरितां त्यांचे बंदोबस्तास सरकारांतून गाडदी, निसबत राघो विश्वनाथ वगैरे यांजकडील असामी २०० तुह्मांकडे पाठविले आहेत, यांस तेथें चौक्या नेमून देऊन बंदोबस्त राखून गोसावी यांचा वगैरे परस्परें कज्या होऊं न देणें ह्मणोन, धोंडो महादेव यांचे नांवें. सनद १.

रसानगी, राघो विश्वनाथ कारकून शिलेदार.

९६५ (९९४)–कसबे नाशिक येथें सिंहस्थाचे यात्रेचा वगैरे बंदोबस्त जाला

तिसैन समानीन मया व अलफ जिल्काद २

पाहिजे, याकरितां गाडदी निसबत राघो विश्वनाथ असामी १०० शंभर पाठविले आहेत, तरी कसबे मजकुरीं यांजपासून चाकरी घेऊन, यात्रा गावांत व गांवाबाहेर राहील तिचा बंदोबस्त चांगला करणें ह्मणोन, कृष्णराव गंगाधर कमाविसदार परगणा नाशिक यांचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून निसबत दफ्तर.

९६६ (११२१)–धोंडो केशव यांजकडे मौजे पाडळी, संमत कोरेगांव, प्रांत वाई,

खमस तिसैन मया व अलफ. रजब २६

हा गांव सरकारांतून आहे. तेथें पेंढारी वगैरे यांचा उपद्रव जाहला आहे, याजकरितां किल्ले चंदनपैकीं लोक असामी १० दहा उपद्रव मोडेतोंपर्यंत गांवचे रखवालीस नेमून देणें ह्मणोन, पांडुरंग त्रिंबक दिंमत विठ्ठलराव मल्हार यांचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

७ न्यायखातें.

(एफ) तुरुंग.

९६७ (४७)–हरी सखोजी, व त्याची स्त्री हीं उभयतां किल्ले सिंहीगड येथें अट-

---

hundred soldiers were therefore sent to the place to assist the Kamávisdár, who was directed to see that no disturbance took place.

(965) 100 Gárdis were sent to Násik for keeping order among the pilgrims coming to Násik during the Sinhastha year.

A. D. 1788-89.

(966) The village of Pádali in Samat Koregaum being infested by Pendháris, 10 sepoys from fort Chandan were sent to protect the village.

A. D. 1794-95.

(F) Prisons.

(967) Hari Sakhoji and his wife who were in prison at fort

अर्बा सबैन मया व अलफ. रबिलावल २२

केस आहेत, त्यास हरी सखोजीस समाधान नाहीं, मूत्रावरोध जाहला, व त्याचे स्त्रीस संग्रहणीची वेथा जाहली. दोघांचीही अवस्था भारी आहे, ह्मणोन विदित जाहलें; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी हरी सखोजी व त्याची स्त्री ऐसी मौजे उरवडें येथें पोहोंचऊन देणें, मौजे मजकुरीं विठ्ठल येशवंतराव खासनीस, दिंमत हुजुरात, यांची मातोश्रीचे स्वाधीन करून पावती घेणें ह्मणोन, आनंदराव जिवाजी यांचे नांवें चिटणिसी छ. १४ जिल्हेज. पत्र १.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९६८ (६५)—भवानीदास बलराम जेजालंदाज, किले रामगड, तालुके विजयेदुर्ग, याजकडे पितृतीथ होती, याजकरितां किले मजकूर येथील दरवाज्यास कोठीनजीक जातीचे चार लोक बोलाऊन, तटावर अग्नींत आउती देऊन विन्हाडास आला, तों वाऱ्यानें किटाळ कोठीवर उडोन कोठींतील जिन्नस जळाला.

खमस सबैन मया व अलफ. जमादिलाखर २९.

बीतपसील.

गल्ला कैली साडेतिसेरी.		वजन.	
४॥३॥१॥≈	नागली.	॥·॥४८१॥	दारू.
।·॥१॥≈	वरी.	८॥७॥	काथागबाळ.
॥·॥१।≡	मीठ.	८८६।	ताग.
५॥·८१॥≡		·॥१॥७॥१॥	

फचे.

सुमारी. सुमार.

४२ कले, चर्मी.
३ बुधले.
३ अधवडी.
३ गोळ्या शिसें.

५१

A. D. 1773-74 Sinhgad being seriously ill, it was ordered that they should be released and sent to the village of Urawade.

FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

(968) Bhawánidás Balrám Jejálandáj of fort Rámgad in Táluká Vijayadurga on the anniversary of his father's death made a fire on the rampart and threw offerings on it. A spark was blown by the wind to the store-room which took fire and a considerable quantity of grain, gunpowder &c. was burnt. Bhawánidás

A. D. 1774-75

एकूण गल्ला केली पावणें सहा खंडी, पावणें दोन पायली, तीन सीपें वजन कचे साडे-अकरा मण, पावणें आठ शेर दीड टांक. व सुमारी एकावन याप्रमाणें कोठींतील जिन्नस जळाला, त्याजवरून जेजालंदाजास अटकेंत ठेविला आहे, त्यास चार वर्षे जाहालीं. त्याज पासून सदरहू जिनसांची किंमत घ्यावी, तरी बायको व माणसें कोणी नाहींत, जरजर जाहला आहे, अडसेरी मात्र द्यावी लागते, कांही उत्पन्न व्हावयाचें नाहीं, यास्तव सोडून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे ह्मणोन तुह्मी विनंतीपत्र पाठविलें; त्याजवरून मनास आणितां जेजालंदाज मजकूर याचें कोणी नाहीं, व तोही मरावयासी जाहला आहे, सबब सदरहू जिन्नस नुकसान जळित खर्च लिहून, जेजालंदाजास सोडून देणें ह्मणोन, महादाजी रघुनाथ यास छ. १ रबिलाखर. सनद १.

९६९ (१२९)—धोंडभट गाडगीळ, वस्ती रेवदंडा, यांणीं हुजूर विदित केलें कीं, जंजीरें मजकूरचे चोरांनीं दोन चोऱ्या केल्या, ते चोर सांपडले, त्यास एक चोरी खत्री याचे घरची चोरानें झाडून भरून दिली. दुसरी चोरी आमचे घरीं केली ते कबूल जाले, परंतु त्यास द्यावयास अवकात नाहीं. तिघे ब्राह्मण चोर सहा महिने अटकेंत आहेत, बहुत श्रमी होतात, याज-करितां ब्राह्मणांस सोडावें, आह्मीं चोरी भरून पावलों, मागत नाहीं, वाईट बरें यांस जालें तर दुर्निमित्य येईल, असें रेवदंड्याचे अंमलदारास ह्मटलें, परंतु ते ऐकत नाहींत, व सर-कारांत चोरीची तिजाई द्या ह्मणतांत, येविशीं आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन, ऐशास धोंड-

खमस सबैन मया व अलफ मोहरम २०

was therefore thrown into prison and kept there for 4 years. At the end of that period, it was reported that the man had no wife or other relations, that there were no means of recovering the value of the property from him, that he was much emaciated, and that his daily ration was a useless charge on Government. He was therefore ordered to be released.

(969) Three Brahmins of Janjire had committed two thefts, one at the house of a Khátri and the other at the house of Dhond Bhat Gádgil of Revadandá. They produced the property of the first theft, but were unable to produce that of the second, though they confessed that they had committed the theft. They were therefore imprisoned and remained in confinement for 6 months. At the end of the period Dhond Bhat waived his claim to the property stolen and applied for the release of the prisoner on the ground that should they die, he would incur the odium of causing their death. The Officer of Rewadandá refused to comply with the request unless the value of a third share of the stolen property was paid to Government as usual. The matter was taken to the Peshwa by Dhond Bhat. The Officer

A. D. 1774-75.

भटाकडे चोरी जाली सबब त्याणें चोरांस अटकेंत ठेवविलें; हल्लीं चोरांपासून ऐवज येत नाहीं, चोर ब्राह्मण उपास करितात यास्तव चोरी भरून पावली, यांस सोडावें असें ह्मण-नात हेंच खरें किंवा अंतस्थ चोरीचा ऐवज भरून घेतला, आणि सोडावयाविषई रदबदली करितात, येविशींची चौकशी करून, उगेंच सोडावें हेंच खरें असल्यास चोरांस सोडून देणें. भटास तिजाईचा तगादा न लावणें. खंड गुन्हेगारी घेतली असेल ती सरकारांत जमा करणें ह्मणोन आनंदराव शिंदे, जंजीरे रेवदंडा यांचे नांवें. पत्र १.

९७० (१६७)—कसबे नारायणगांव येथें जंगमाचे घरीं दरवडा पडला होता, त्यास

खमस सबैन मया व अलफ मोहरम ६

मौजे आरवी, कसबे मजकूर, येथें बेरड वस्तीस राहिले होते, त्यांस नारायणगांवकरी यानीं धरून हुजूर पाठविले. असामी १० दहा ते जुन्या कोटांतील बंदीखान्यांत बिड्या घालून ठेविले आहेत; त्यांचें वर्तमान मनास आणतां त्यांजकडे कांहीं मुद्दा लागूं होत नाहीं, सबब जामीनकतबा घेऊन बेरड सोडविले असत; तरी सदरहू दहा असामींच्या बेड्या तोडून सोडून देणें ह्मणोन, शिवराम रघुनाथ निसबत खासगी यांस छ. ११ जिल्काद. सनद १.

रसानगी. गोंदजी गाड्या प्यादा, दिंमत बहिरजी मोरे.

९७१ (२०१)—किल्ले सिंहगड येथें रामचंद्र विठ्ठल याचीं मुलें माणसें. असामी.

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

२ तीर्थरूप व मातुश्री.
२ भावजया.
३ मुलें.
२ कुणबीण व पोरगा.
—
९

---

of Rewadandá was ordered to ascertain whether the Bráhmins were really unable to restore the stolen property and were starving themselves or whether they had privately restored the stolen property to Dhond Bhat who was now interceding on their behalf. In the former case, the prisoners were directed to be set at liberty.

(970) A dacoity having occurred at Náráyangaon, 10 Berads

A. D. 1774-75.

living in Âravi, a neighbouring village had been arrested and kept in the prison at Junákot. As nothing could be proved against them, they were ordered to be set at liberty.

(971) The parents and other relations of Rámchandra Vithal were

A. D. 1774-75.

imprisoned at fort Sinhgad. The parents being old and unable to stand the cold climate of the place were

एकूण नऊ असामी किल्ले मजकुरीं अटकेंत आहेत, त्यास मशारनिल्हेचे तीर्थरूप व मातुश्री यांचा वृद्धापकाळ, किल्याची हवा सर्द, मानत नाहीं, याजमुळें बहुतेक हैराण आहेत, ह्मणोन विदित जालें; त्याजवरून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे, तरी सदरहू नऊ असामी किल्लयाखालीं उतरणें. हीं आपले घरीं, मौजे उरवडें येथें, येऊन राहतील, त्यांचे मुबदला रामचंद्र विठ्ठल याचे बंधु व्यंकोजी विठ्ठल यास किल्ल्यावर ठेवणें; व मशारनिल्हेची बहीण पेशजी भेटावयास गेली आहे तिजलाही जाऊं देणें ह्मणोन, आनंदराव निंबाजी किल्ले सिंहगड यांचे नांवें चिटणिसी छ. १८ रजब. पत्र. चिटणिसी पत्र येऊन सदरहू-प्रमाणें सनद लिहून दिल्ही.

परवानगी रूबरू.

९७२ (३७४)—हरी आपाजी काणे, यांणीं हुजूर विदित केलें कीं, आपला भाऊ गदाधर आपाजी, वस्ती कसबे खेड, तालुके सुवर्णदुर्ग, हा तोतयाकडे गेला होता, याजमुळें त्यास कैद सरकारांत केलें होतें, तेथून भयेंकरून पळोन गेला यास्तव सुभां आपल्यास नेऊन गुन्हेगारी पन्नास रुपये घेतले, परंतु आपला भाऊ आलाहिदा, त्याचे कन्येचें लग्न होणें, याकरितां सरकारांतून कौल देववावयाची आज्ञा जाली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी याचा भाऊ भयेंकरून गेला आहे, घरीं कन्येचें लग्न व्हावयाचें आहे, सबब यास कौल देऊन घरीं आणवणें; कन्येचें लग्न होऊं देणें; मग जीवन पाहून भावापासून गुन्हेगारी घेतली आहे, त्याअन्वयें याचें जीवन पाहून गुन्हेगारी घेणें ह्मणोन, मोरो बापूजी यांस. पत्र १.

सबा सबैन मया व अलफ जिल्हेज १२

चिटणिसी.

९७३ (४१७)—बाजीराव गोविंद बर्वे हैदरअली यांजकडे गेले, सबब त्याच्या

---

permitted to reside in their house in Urawade and Rámchandra's brother was ordered to be imprisoned in their stead.

(972) Gadádhar Appáji Káne of Khed, in Táluká Suwarnadurga, having joined the Pretender was arrested and imprisoned. He escaped from prison and his brother Hari was fined Rs. 50 by the Subhá. Hari Appáji represented that Gadádhar had to perform his daughter's marriage and prayed that a pass might be given permitting him to return home for this purpose. Moro Bápuji was instructed to give the safe-pass as requested and to levy a reasonable fine from Hari after the celebration of the marriage.

A. D. 1776-77.

(973) Bájirao Govind having gone over to Haidar Ali, his two wives were kept in custody at Mangalwedhe. Bájirao's father Govind Gopál represented that Bájirao's daughter

A. D. 1776-77.

स्त्रिया दोन किल्ले मंगळवेढें येथें अटकेंत ठेविल्या आहेत, त्यास मशारनिल्हेची कन्या उपवर जाली, लग्न कर्तव्य, ह्मणोन गोविंद गोपाळ, मशारनिल्हेचे तीर्थरूप यांणीं हुजूर विनंती केली, त्याजवरून मशारनिल्हे यास सरकारांत जामीन घेऊन, हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी दोघी स्त्रिया कन्येसहवर्तमान पुण्यास पावते करणें ह्मणोन, मेघःशामराव यांचे नांवें. सनद १.

सबा सबैन
मया व अलफ
मोहरम ६

रसानगी यादी.

९७४ (४२३)—त्रिंबक गणेश भट याची बायको, व लेक अटकेस आहे, त्यास मूल आठ वर्षांचा जाला, त्याचा व्रतबंध जाहला पाहिजे, ह्मणोन लिहिलें त्यास त्याचे सोइरे आप्त कोणी जामीन देऊन मुंज करतील, तरी बायको व मुलास पक्का जामीन घेऊन त्यांचे हवाला करणें, मुंज जाहल्यावर पुन्हां पूर्ववतप्रमाणें अटकेस ठेवणें.

सबा सबैन
मया व अलफ
सफर २

९७५ (४२९)—रघ सावंत भोसले, व केसो बाबाजी यांस सनद कीं, अंताजी केशव जोशी निसबत रामराव नारायण यांस किल्ले विसापूर येथें अटकेस ठेवावयास पाठविले आहेत, तरी त्यास बेडी घालून पक्क्या बंदोबस्तानें किल्ले मजकुरीं अटकेस ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें सनद पैवस्तगिरीपासून देत जाणें. किल्ले मजकूर नाजूक जागा; अंताजी केशवचा लेक फार लबाड आहे; फितवाफांदास व निघोन जाण्यास चुकणार नाहीं. यास्तव चौकीचे लोक मजबूत चांगले नेमून देणें; आणि बेडी रोज तुम्ही आपले रूबरू पाहात जाणें; लोहारास

सबा सबैन
मया व अलफ
सफर १६

---

had attained the marriageable age and that she must therefore be married. He was asked to stand security for the ladies and orders were issued that the ladies and the girl should be sent to Poona.

(974) Trimbak Bhat's wife and son were imprisoned in the fort of Ratnagiri. The boy having attained the age of 8 years, permission was given to release both him and his mother in order that his thread-ceremony might be performed. It was further ordered that security should be taken from them before their release and that after the ceremony they should again be imprisoned.

A. D. 1776-77.

(975) Antáji Keshav Joshi, in the employ of Rámrao Náráyan, was sent to prison in the fort of Visápur. Ragh Sáwant Bhosle and Keso Bábáji were informed that he was an intriguing person, that he was sure to attempt to escape, that a trusty guard should therefore be kept over him, that his fetters should every day be inspected by them in person, that the blacksmith should be strictly warned to be careful in rivetting the fetters, that Antáji should

A. D. 1776-77.

चांगली ताकीद करून ठेवणें; चौकीचे लोकांजवळ त्यांचें भाषण न व्हावें, त्यांजवळ यांचें भाषण न व्हावें, चौकीचे लोकांशिवाय दुसऱ्यानें कोणीं जाऊं नये, असा पक्का बंदोबस्त करून ठेवणें ह्मणोन. सनद १.

परवानगी रूबरू.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९७६ (४४५)–धोंडो गोपाळ केळकर किल्ले घनगड येथें अटकेंत आहे, त्याचे पाय सुजले आहेत, उठवत बसवत नाहीं, ह्मणोन तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. ऐशीयास मशारनिल्हेस फार बरें वाटत नाहीं, याजकरितां पायांतील बिडी तोडून औषधउपाय करणें; आणि चौकीचा बंदोबस्त चांगला करून, लोकांचे फेरफार वरचेवर करून बरा जाहाला ह्मणजे फिरोन पायांत बिडी पूर्ववतप्रमाणें घालणें ह्मणोन, गोविंद रघुनाथ किल्ले मजकूर यांचे नांवें. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रविलावल २९

९७७ (४५५)–धोंडो गोपाळ केळकर, तोतयाचे फितुरांतील, किल्ले घनगड येथें अटकेस होता, तो मृत्यू पावला, त्याची क्रिया जाहली पाहिजे, याजकरितां त्याची बायको तालुके रत्नागिरी येथें अटकेंत आहे; तीस जामीन घेऊन क्रिया करण्याबद्दल मोकळीक करणें, क्रिया जाहालीयावर पोटीं संतान असल्यास अटकेस ठेवणें, संतान नसेल तर जामीन पक्का घेऊन मोकळीच असों देणें ह्मणोन, सदाशिव केशव यांचे नांवें. छ. ८ रविलाखर. सनद १.

सबा सबैन मया व अलफ रविलाखर २६

परवानगी, राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

---

be prevented from speaking to the guard, and that no other persons should be allowed to approach him.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(976) Dhondo Gopál Kelkar, a prisoner in the fort of Ghangad, having swollen feet was unable to move. The officer of the fort represented the matter to Government, and orders were issued to remove the fetters and to keep Dhondo under medical treatment. It was further ordered that after his recovery fetters should be put on again.

A. D. 1776-77.

(977) Dhondo Gopál Kelkar, who was confined in the fort of Ghangad for conspiring with the Pretender died. Orders were therefore issued to release his wife from custody at Ratnágiri in order that she might perform the funeral rites of the deceased. It was further ordered that she might be allowed to remain at large if she had no issue, that otherwise she should be sent back to prison after the performance of the obsequies.

A. D. 1776-77.

९७८ (४९७)—अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड यांस सनद कीं, सखाराम हरी हे किल्ले पुरंदर येथें अटकेस होते, ते हल्लीं येथून तुझांकडे बेडीसुद्धां पाठविले आहेत, तरी किल्ले मजकुरीं बेडीसुद्धां पक्क्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन, पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. याची बेडी तुह्मीं आपले दृष्टीनें रोजचे रोज पाहत जाणें. याचे चौकीस लोक ठेवाल ते एका दो रोजीं हेरफेर करून दुसरे लोक चौकीस नेमीत जाणें; आणि याची रखवाली बहुत खबरदारीनें करणें. सखाराम हरी याचे रखवालीस लोक राहातील त्यांणीं त्याशीं बोलूं नये, याप्रमाणें लोकांस चांगली ताकीद करणें, याजबरोबर रखवालीस स्वार दिंमत सदाशिव धोंडदेव, व गाडदी दिल्हे आहेत, हे किल्ले मजकुरीं पोहोंचऊन हुजूर येतील ह्मणोन.

समान सबैन
मया व अलफ
रमजान १५

सनद १.

परवानगी रूबरू.

९७९ (५३१)—महादाजी गणेश फडके किल्ले चंदनगड येथें अटकेंत आहेत, त्यास बरें वाटत नाहीं, याजकरितां मशारनिल्हेची स्त्री, व कुणबीण त्यांजकडे जात आहे, त्यांस किल्यावर घेऊन, स्त्रीस सिधा मध्यम प्रतीचा, व कुणबिणीस अडशेरी देत जाणें ह्मणोन, शामराव जगजीवन यांचे नांवें. छ. ७ जिल्काद.

समान सबैन
मया व अलफ
सफर २६

सनद १.

रसानगी याद्री.

९८० (५४४)—नरसिंगराव गोविंद किल्ले पाली येथें अटकेस आहे, त्याची मातुश्री पुणियांत होती, ते मृत्यु पावली, तिची क्रिया करण्याबद्दल ब्राह्मण तेथें अस्थी घेऊन येईल. अस्थी आलियावर नरसिंगराव याचे पायांतील बेडी काढून. चौकी चांगली बंदोबस्तानें ठेऊन क्रियेस ब्राह्मण

समान सबैन
मया व अलफ
सफर २६

---

(978) Sakhárám Hari was sent in custody from fort Purandhar to fort Ghangad. The officer of the fort was directed to see personally every day that Sakhárám was properly fettered and to allow no communication with him and to see that he was very carefully guarded.

A. D. 1777-78.

(979) Mahádáji Ganesh Phadke, a prisoner at fort Chandangad being indisposed, his wife with her female attendant was permitted to come and reside with him. She was given the usual ration.

A. D. 1777-78.

(980) Narsingrao Govind, a prisoner at fort Páli, lost his mother residing in Poona. Her bones were sent to him with a Brahmin, in order that he might perform the obsequies

A. D. 1777-78.

मेळऊन वीस रुपयेपर्यंत क्रिया करण्यासी देऊन क्रिया करवणें. क्रिया जाहलीयावर पूर्ववतप्रमाणें बेडी घालून ठेवणें ह्मणोन, बाजी गोविंद यांचे नांवें. छ. ८ जिल्हेज. सनद १.

परवानगी रूबरू. राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

९८१ (५७२)—मोरो बाबूराव यांस किल्ले अमदानगर येथें ठेवावयास पाठविले आहेत, समागमें विसाजी आपाजी फौज सुद्धां दिल्हे आहेत, तुम्हांजवळ येऊन पोहचल्यावर हवालीं करून घेऊन किल्यांत ठेवणें; घर चांगलें असेल त्याचा बंदोबस्त करून राहावयास देणें; समागमें खिजमतगार, ब्राह्मण वगैरे विसाजी आपाजी सांगतील त्याप्रमाणें ठेवणें; तेथें पोहचाऊन विसाजी आपाजी माघारे हुजूर येतील. तुह्मीं बंदोबस्त चांगला करणें. मोरो बाबूराव यांजकडील हत्यारेंबंद माणूस जवळ नसावें, तुह्मी आपल्या कडील एक शाहाणा इतबारी मर्द माणूस जवळ ठेवणें; त्याणें रात्रंदिवस जपत जावें. बाहेरील माणूस किल्यांत जाईल त्याची चौकशी करीत जाणें, किल्याचा बंदोबस्त चांगला करावा. किल्याबाहेर शहरांत बेकार लोक राहात असतील, त्यांचा बंदोबस्त करणें. सारांश गोष्ट तुह्मी इतबारी यास्तव तेथें रवानगी केली आहे. सावधपणें राहून बंदोबस्त चांगला राखणें, वर्तमान लिहीत जाणें. मोरो बाबूराव खासा, व दोन भिक्षुक ब्राह्मण, व एक आचारी, व एक ब्राह्मण, व एक शागीर्द, व दोन खिजमतगार बिन हत्यारी, याप्रमाणें असामी ठेऊन, भोजनाचें साहित्य वगैरे उत्तम करून देत जाणें, व न्हावी एक लागेल तेव्हां तुह्मीं आपणांकडील विश्वासू पाठवित जाणें; वरकड बंदोबस्ती चांगली वरचेवर करीत जाणें ह्मणोन महादाजी नारायण यांचे नांवें. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ. जमादिलाखर २९

परवानगी रूबरू.

९८२ (५७३)—बाबूराव हरी, व सखाराम हरी अटकेस आहेत. त्यास त्यांचे मातुश्रीचें वर्षश्राद्ध श्रावण शु॥ अष्टमीस आहे, त्यास श्राद्धांबद्दल खर्चास दर असामीस रुपये ५ पांच प्रमाणें देविले असेत. ते देऊन, श्राद्धाचें दिवशीं पायांतील बिर्डी काढून श्राद्ध करवणें. श्राद्धाचे दिवशीं एक दोन ब्राह्मण, व एक ग्रहस्थ, व दोन माणसें येतील त्यांस किल्ल्यावर घेऊन,

तिसा सबैन मया व अलफ. जमादिलाखर ३०

---

of the deceased. His fetters were ordered to be removed while performing the ceremony.

(981) Moro Báburao was sent with his attendants to prison in fort Ahmednagar. The officer of the fort to give him first class diet and to keep a very careful watch over him: if a barber was required, a trustworthy man must be sent.

A. D. 1778-79

(982) Baburao and Sakhárám Hari were imprisoned at fort

श्राद्ध जालीयावर दुसरे दिवशीं खालीं उतरून देणें; आणि पूर्ववत्प्रमाणें उभयतांस बंदोबस्तानें ठेवणें ह्मणोन. सनदा.

किल्ले प्रतापगड.

१ जयराम कृष्ण यांस सनद कीं, बाबूराव हरी यांस श्राद्धास पांच रुपये खर्चास देणें ह्मणोन.

१ अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड यांस सनद कीं, सखाराम हरी यांस श्राद्धाबद्दल खर्चास रुपये पांच देणें ह्मणोन.

२

परवानगी रूबरू.

९८३ (५८९)—मामले कोहोज येथें बंदीवान अटकेस आहेत, त्यांपैकीं डोकीं मारावयाचीं, व शास्नें करावयाचीं वगैरे. कलमें.

तिसा सबैन मया व अलफ सफर २३

डोकीं मारावयाच्या असामी.

२ खंड्या बेरड याचे पोरें आहेत ते.

१ फाजीलखान नूरमहमद याचा भाऊ यास, भिवराव येशवंत यांणीं तारापूरचे मुक्कामींहून पाठविला आहे तो, एकूण तीन असामींचीं डोकीं मारणें. कलम १.

शिवराम ब्राह्मण भिवराव येशवंत यांणीं तारापूरचे मुक्कामींहून पाठविला त्याचा जामीन घेऊन सोडणें. कलम १.

मोराजी भोई याणें भुतें घालून काळोजी भोई यास मारिलें. तो मामले मजकुरीं आहे, त्याचा एक हात तोडून सोडणें. कलम १.

कडेलोट करावयाचे.

भिवराव येशवंत याणें तारापूरचे मुक्कामींहून पाठविले ते.

१ बहादरसिंग.

A. D. 1778-79. Pratápgad and Ghangad. Orders were issued to give them Rs. 5 each to enable them to perform the usual ceremonies on the anniversary of their mother's death, to remove their fetters on that day and to admit one or two priests into the forts for the occasion.

(983) Sentences were passed on some of the prisoners at fort Kohoj, three were ordered to be beheaded, two to be thrown down the precipice. One prisoner, Moráji Bhoi, who had been convicted of murdering another man through the agency of spirits was sentenced to have one hand cut off. Another prisoner, Rámá Kánaḍá,

A. D. 1778-79

नारायणजी शितोळा हुजुरून सन सलास सबैनांत अटकेंत ठेवण्यास पाठविला, त्याची सबब काय आहे ती लिहून पाठविणें.

१ देवसिंग खरकसिंगाचा कारभारी.

——

२

एकूण दोन असामींस कडेलोट करणें.

कलम १.

रामा कानडा ब्राह्मण ह्मणवितो, परंतु पुण्यांत गाईचीं पुच्छें कापीत होता; तो मामले मजकुरीं अटकेस आहे; त्यास कुजक्या नागली पोटास देत जाणें. कलम १.

एकूण सहा कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें. व यांखेरीज आणखी बंदीवान असतील त्यांचा झाडा हुजूर पाठवून देणें. सदरहू लिहिल्याप्रमाणें सरकारचे खिजमतगार भिवजी जगताप, व संताजी टिळेकर दोन असामी पाठविले आहेत, यांचे गुजारतीनें पारपत्य करून लिहून पाठविणें ह्मणोन, महादाजी रघुनाथ, मामले कोहोज यांस. सनद १.

रसानगी बरहुकूम पट.

९८४ (५९०) किल्ले सिंहीगड येथें बंदीवान अटकेस आहेत, त्यांपैकीं हुजूर आणावयाचे वगैरे येविशीं.

तिसा सबैन
मया व अलफ
सफर २९

सुभाना ब्राह्मण. व मर्या जासूद हैदर नाईक यांजकडील फितुरी किल्ले मजकुरीं आहेत, त्यांचे पायांत विडी घालून पक्क्या बंदोबस्तानें हुजूर पाठवून देणें. कलम १.

रामजी भागवत याची बायको, व सासू, किल्ले मजकुरीं अटकेस आहेत. त्या काय निमित्य ठेविल्या तें लिहून पाठविणें. कलम १.

एकूण दोन कलमें करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें, याखेरीज बंदीवान किल्ले मजकुरीं असतील त्यांची सबब लाऊन, नांव-

who though professing to be a Brahmin was caught cutting the tails of cows in Poona, was sentenced to be fed on rotten Nágli. The sentences were ordered to be carried out in the presence of two Khismatgárs sent from the Huzur. A complete list of the remaining prisoners was at the same time asked for.

(984) A similar list of prisoners, with details of their offences,

निशीवार झाडा हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन, नारो महादेव किल्ले मजकूर यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

९८५ (५९३) बंदीवान तालुके, व किल्ले हाये येथें वगैरे जागीं अटकेस ठेविले आहेत, त्यांचे पारिपत्य करण्याविशीं. सनदा.

तिसा सबैन
मया व अलफ
रबिलावल ८

१ रघुनाथ सदाशिव. तालुके रायगड यांस कीं, गोपाळ सोनार ग्वाहागरकर हा सोनाराचे मुलास राघोबा विंझ्या याणें जिवें मारिला त्यांत होता, सबब किल्ले रायगड येथें ठेविला आहे, त्यास दादजी कंडारा, व मोराजी ञ्न्या खिजमतगार, दिंमत तानाजी पडवळ यांस पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें सोनार मजकुराचा उजवा हात तोडून सोडून देणें ह्मणोन. कलम १.

१ अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले धनगड यांस कीं, ज... मारवाडी नागरगांवकर भुताल्या, सबब किल्ले मजकुरीं ठेविला आहे. त्यास दादजी लांडगा, व मोराजी ञ्न्या, दिंमत तानाजी पडवळ, खिजमतगार यांस पाठविले आहेत, यांचे गुजारतीनें एक बोट कापून, त्यास सोडून देणें ह्मणोन.

१ बाबाजी भिकाजी, तालुके अमदाबाद यांस कीं, तालुके मजकुरीं हरी बल्लाळ यांणीं स्वारींतून बंदीवान पाठविले ते. असामी.

१ बाबाजी कदम.
१ संताजी भोडवा.
१ रामजी सिस्ता.
१ भवानी बिचफरा.
१ साबाजी पाडेकर.

५

A. D. 1778-79. was also called from fort Sinhgad. Two prisoners were ordered to be sent in fetters to the Huzur.

(985) The following sentences were passed on certain prisoners confined in various forts:—
A. D. 1778-79.

(1) Nagyá Márwádi who practised witchcraft to have one of his fingers cut off;

एकूण पांच असामी यांचे, राणोजी शेलार, व संभाजी मोकाला खिजमतगार, दिंमत संभाजी धायरीकर, पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें एकेक हात तोडून त्यांस सोडून देणें ह्मणोन.

१ बाजी गोविंद तालुके सरसगड यांस कीं, संतू पवार कोळ्याचे मळईत होता, सबब किल्ले पीरगड, तालुके मजकूर येथें अटकेंत ठेविला आहे, त्यास दादजी लांडगा, व मोराजी झुन्या खिजमतगार, दिंमत तानाजी पडवळ, यांस पाठविले आहेत, यांचे गुजारतीनें पवार मजकुराचें डोकें मारून हुजूर लेहून पाठवणें ह्मणोन.

१ नारायणराव कृष्ण, किल्ले चाकण यांस कीं, बहिरजी पवार, तुळाजी पवाराचा भाऊ. किल्ले मजकुरीं आहे, त्यास गोपाळजी शिंदा खिजमतगार, दिंमत तानाजी पडवळ, यास पाठविला आहे, त्याचे गुजारतीनें पवार मजकुराचा एक पाय तोडून त्यास सोडून देणें ह्मणोन. सनद १.

१ रामचंद्र कृष्ण, तालुके मुल्हेर यांस कीं, हरी बल्लाळ यांणीं स्वारींतून बंदीवान तालुके मजकुरीं सन सीत सबैनांत पाठविले ते. असामी.

१ अलाबकस वलद शेख सादन गाडदी.

१ भिवजी बिन बापूजी ज्ञांडा.

३ मांग.

१ गोट्या.

१ निंब्या.

१ सेटी.

३

५

एकूण पांच असामींचा अनाजी राजगुरू, व कबाजी नलवडा खिजमतगार, दिंमत संभाजी धायरीकर, यांस पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें एकेक हात तोडून त्यांस सोडून देणें ह्मणोन. सनद.

१ माधवराव कृष्ण यांचे नांवें कीं, तोफखान्यांत बंदीवान आहेत, त्यांपैकीं शासन करावयाचे असामी.

(2) Bápou Bhái who was caught robbing a Brahmin woman of her ornaments to have one hand and one foot cut off;

२ एक हात व एक पाय तोडावयाचे.

१ रामा बेरड, मालजी नाईक बेरड आळंदीकर याजकडे चाकर होता तो.

१ बदली भोई ब्राम्हणाचे बायकोच्या आंगावरील वस्त्र चोरून नेत होता तो.

२

२ एकेक हात तोडावयाचे.

१ मल्हारी कुणबी खानापूरकर याणें चोरी केली सबब.

१ याकुबखान झारेकरी चोर म्हणोन ठेविला आहे तो.

२

१ भिमा मांग जागेवाडीकर याणें खंडोजी भोसला आगेवाडीकर याची घोडी चोरली, सबब त्याचा एक पाय तोडावा.

५

पांच असामी यांस, देवजी शिंदा, दिंमत संभाजी धायरीकर, व म्हसाजी निसवण, दिंमत रायाजी संकपाल, खिजमतगार पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें सदरहूप्रमाणें शासन करणें म्हणोन. सनद.

७

सात सनदा रसानगी जाबता. याखेरीज बंदीवान असतील त्यांची सबब लाऊन नांवनिशीवार झाडे लिहून हुजूर पाठविणें, म्हणोन सनदांत लिहिलें असे.

९८६ (६०४) किल्ले गजकुरी सखाराम हरी अटकेस आहेत, त्यांस पोटास शिधा पावत आहे तो मना करून, जुन्या नागलीचें पीठ दररोज वजन पक्के ८८१ एक शेर प्रमाणें देत जाणें. पिठाशिवाय आणखी कांहीं न देणें. उपास करूं लागल्यास करूं देणें. मनास न आणणें. नवी बेडी येथून पाठविली आहे ही सखाराम हरी यांचे पायांत घालून, पक्के बंदोबस्तानें ठेवणें. वि-

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर २१

(3) Malhári kunbi who committed theft to have one hand cut off;

(4) Other prisoners (named) were to be beheaded, or have hands or feet, or both cut off as ordered in each case.

(986) The officers of fort Ghangad were directed to give prisoner Sakhárám Hari one seer of old Nágli flour and nothing else, in lieu of the ration previously given to him, to let

A. D. 1778-79.

डीचा खिळा दररोज तुम्हीं पाहत जाणें, ह्मणोन, अर्जोजीराव ढमाले, हवालदार व कारकून, किल्ले घनगड यांचे नांवें. सनद १.

परवानगी रूबरू.

९८७ (६०५)—बाबूराव हरी किल्ले प्रतापगड येथें अटकेस आहेत. ते किल्ले सुयारगड, तालुके सुवर्णदुर्ग, येथें अटकेस ठेवावयाचे करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी तुह्मीं तालुके मजकुरींहून पन्नास माणूस, व शाहाणा कारकून प्रतापगडास पाठऊन, बाबूराव हरी यास घेऊन जाऊन किल्ले सुयारगड येथें पक्के बंदोबस्तानें अटकेस ठेवणें; आणि पोटास शेर देत जाणें. जयराम कृष्ण यास सरकारचें पत्र अलाहिदा सादर केलें असे, तरी पत्र पावतांच तुह्मीं त्यांजकडे लोक, व कारकून पाठऊन, सदरहू लिहिल्याप्रमाणें मशारनिल्हेस घेऊन जाऊन किल्ले मजकुरीं पक्या बंदोबस्तानें बेडीसुद्धां ठेवणें ह्मणून, मोरो बापूजी यांस. सनद १.

तिसा सबैन मया व अलफ रबिलाखर २३

येविशीं जयराम कृष्ण किल्ले प्रतापगड यांस कीं, मशारनिल्हेकडून लोक, व कारकून तालुके सुवर्णदुर्गाहून तुह्मांकडे येतील त्यांचे हवालीं बाबूराव हरी यांस करून कबज घेणें ह्मणून. सनद १.

२

रसानगी, बाजी बल्लाळ कारकून, दिंमत जयराम कृष्ण.

मशारनिल्हेची स्त्री प्रतापगडास आहे, ते त्याजबरोबर आल्यास घेऊन जाऊन दोघांस एक जागा ठेवणें ह्मणून मोरो बापूजी यांचे सनदेंत लिहिलें असे; व जयराम कृष्ण यांचे सनदेंत मशारनिल्हेची स्त्री किल्ले मजकुरीं आहे, ते त्याजबरोबर जात असल्यास सुयारगडास रवाना करणें, जात नसल्यास तिचे घरास पोहोंचाऊन देणें ह्मणोन लिहिलें असे.

९८८ (६४१)—सखाराम हरी किल्ले मजकुरीं अटकेस आहेत. त्यांचे पायांत बिडी थोर आहे ती काढून, लहान बिडी घालणें, व महिना पंधरा दिवशीं हजामत करवीत जाणें; बायको, व लहान पुत्र, व कुणबीण एक लहान पोरगी, अशीं तिघें पुण्याहून जातील. त्यास किल्ल्यावर घेऊन

समानीन मया व अलफ मबाल १३

---

him starve himself if he chose to do so, and to put on his legs the new fetters sent from the Huzur.

(987) Báburao Hari a prisoner at Pratápgad was ordered to be sent to fort Suryágad. His wife who was with him was allowed to accompany him if she chose, otherwise she was ordered to be sent home.

A. D. 1778-79

(988) Orders were issued to the officer of fort Ghangad to remove

मशारनिल्हेजवळ ठेवणें; आणि मशारनिल्हेस, व बायकोस शिधा मध्यम प्रत, व कुणबीणीस शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें. औषधें वगैरे लागल्यास तुम्हांजवळ सांगतील, त्याप्रमाणें चौकशीनें आणून देत जाणें म्हणोन, अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

९८९ (७४८)–चिमणाजी दलपतराव, संस्थान पेठ, हे किल्ले त्रिंबक, तालुके मजकूर, येथें अटकेस आहेत. त्यांस त्रिंबक अनंत गोडबोले यांचे विद्यमानें गंगापुरांत ठेवावयाचा करार करून दरमहा खर्चास रुपये २५० अडीचशें देविले असेत, तरी तालुके मजकूरपैकीं देत जाणें. मशारनिल्हेनीं फंदफितूर करूं नये येविशीं पक्का जामीन त्रिंबक अनंत यांचे विद्यमानें घेणें म्हणोन, धोंडो महादेव यांचे नांवें. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ सफर १२

रसानगी यादी.

९९० (८१९)–अर्जोजीराव ढमाले हवालदार, व कारकून किल्ले घनगड यांचे नांवें सनद कीं, ब्राह्मण बायका किल्ले मजकुरी अटकेस आहेत, त्यांस लुगडीं, व चोळ्या व पांघरावयास कांबळी, सरदीची जागा याजकरितां देविली पाहिजेत म्हणोन लिहिलें, त्याजवरून बायका असामी.

अर्बा समानीन मया व अलफ रमजान १४

१ कृष्णी.

१ कोंडी.

१ दारकी कायस्तीण.

१ कृष्णी पैठणकरीण.

४

A. D. 1779-80. the heavy fetters put on Sakhârâm Hari and to substitute lighter ones in their place and to have him shaved every month or fortnight. Permission was also given to admit into the fort his wife, an infant son and a female servant and to allow them to stay with him. The officer was directed to supply him with such medicines as might be required.

(989) Chimnâji Dalpatrao of Sansthân Peth who was a prisoner at fort Trimbak was allowed to reside at Gangâpur on furnishing sufficient security.

A. D. 1781-82.

(990) Clothes consisting of 2 sâris worth Rs. 2 each and 4

एकूण चार असामींस लुगडीं वगैरे द्यावयाचीं त्यांची किंमत. रुपये.

१६ लुगडीं, दर असामीस २ प्रमाणें लुगडीं सुमार ८ दर २ प्रमाणें. रुपये.
२ चोळ्या, दर असामीस ४ प्रमाणें सुमार १६ दर ८= प्रमाणें. रुपये.
२ कांबळ्याबद्दल दर असामीस रुपया ·॥· प्रमाणें. रुपये.

२०

एकूण वीस रुपयांचीं सदरहू लिहिल्याप्रमाणें सनगें देविलीं असेत. तरी खरेदी करून देणें. मजुरा पडतील ह्मणोन. सनद १.

परवानगी रूबरू.

९९१ (८८६)—अर्जोजीराव ढमाले हवालदार, कारकून किल्ले घनगड यांचे नांवें

खमस समानीन मया व अलफ जमादिलाखर २८

सनद कीं, रामचंद्र गोविंद, माजी कारखानीस किल्ले मजकूर, हा अपराधी. सबब किल्ले विसापूर येथें अटकेस आहे. त्याचा लेक गोविंद रामचंद्र बारा वर्षांचा किल्ले मजकुरीं तुह्मांजवळ अटकेंत आहे. त्यास सोडावयाविशीं त्याचे आईनें हुजूर रदबदली केली, सबब सोडावयाचा करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी गोविंद रामचंद्र यास पोटखर्च रुपये २७।≡- सवा सत्तावीस तीन आणे जाहला आहे ह्मणोन तुह्मीं लिहून पाठविलें, त्यास पोटखर्चाचे सदरहू रुपये, व जामीन घेऊन सोडून देणें ह्मणोन. सनद १.

रसानगी याद.

९९२ (९०३)—माधवराव कृष्ण भिंगारकर हे किल्ले चावंद, तालुके शिवनेर येथें

A. D. 1783-84. boddices worth Rs. 0-2 each and one blanket worth Rs. 0-8-0 were ordered to be supplied to each of the 4 female prisoners at fort Ghangad.

(991) Rámchandra Govind Kárkhánnis of fort Ghanagad having been accused of some offence was imprisoned himself at fort Visápur, and his son Govind, aged 12 years, at fort Ghanagad. At the intercession of the boy's mother Govind was released. It was ordered that diet expenses should be recovered and that a surety should be taken.

A. D. 1784-85.

(992) Mádhavrao Krishna, a prisoner in fort Chawand, being old

सीत समानीन मया व अलफ जिल्काद ३० — अटकेंत आहेत, त्यास मशारनिल्हे वृद्ध, व अशक्त, सबब त्यांची स्त्री त्यांजवळ राहणार, त्यास किल्ले मजकुरीं मशारनिल्हेजवळ ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणून, बाळाजी महादेव यांचे नांवें.

सनद १.

रसानगी याद.

९९३ (१०८४)-मंडाजी गांड्या, मौजे टाकळी, तर्फ माहूर, व हरी पारगांवकर यांणीं मौजे मजकुरीं दावे करून जळेत केली, सबब किल्ले नारायणगड येथें अटकेंस ठेविले आहेत. त्यास पोटगीचा ऐवज द्यावयास ताकत नाहीं म्हणोन तुह्मीं हुजूर विदित केलें, त्यास त्याजपासून जीवन पाहोन ऐवज उत्पन्न होईल तो घेऊन, सरकारहिशेबीं जमा करणें; आणि हरदूजणांस जामीन घेऊन सोडून देणें ह्मणोन, रामचंद्र शिवाजी यांचे नांवें.

अर्बा तिसैन मया व अलफ मोहरम २१

सनद १.

रसानगी याद.

९९४ (११११)—मोरो बापूजी यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं छ. २५ जिल्हेजचें विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. पाद्री वैद्य पुण्यांत होता त्याचा भाऊ, मुशाबुरूज फिरंगी, परशराम रामचंद्र याजवळ लष्करांत चाकरीस होता, त्याची व दुसरे जमातदार यांची कटकट जाहाली, तेव्हां दोघे पाहारेयांत ठेविले. नंतर एक सोडला. फिरंगी मजकूर यास किल्ले धारवाड येथें लष्करांतून अटकेंत ठेविला, त्यास चौकशीकरितां सरकारी अपराध विशेष नाहीं; पोटास शेर, व चौकीस दहा बारा असामी आहेत, खर्च होऊन उपयोग नाहीं, त्याची

खमस तिसैन मया व अलफ मोहरम १३

A. D. 1785-86. and infirm, his wife asked permission to reside with him in the fort. The permission was granted and the fort officer was directed to arrange for her diet.

(993) Mandáji Gàndya of Tàkli in Máhur and Hari Párgaonkar, two incendiaries who were imprisoned in fort Náráyangad were unable to pay for their maintenance and the charge therefore fell on Government. Orders were issued to levy from them such amount as could be recovered and to set them at liberty after taking security.

A. D. 1793-94.

(994) A Portuguese serving in the army under Parashrám Rámchandra, who was the brother of a Christan Doctor in Poona, having quarrelled with another officer, both were imprisoned. One of them was subsequently released but the other, viz. the Portuguese, remained in custody at Dhárwár. Moro Bápuji

A. D. 1794-95.

ज़बानी सेवेशीं पाठविली आहे, जामीन मिळत नाहीं, त्यास सोडावयाची आज्ञा व्हावी; व आणखी एक दोन असामी अटकेंत आहेत, आज्ञा जाहल्यास अन्याय पाहून फडशा करीन ह्मणोन लिहिलें, त्यास अपराधाची चौकशी चांगली करून फिरंगी मजकूर यास सोडून देणें, व आणखी एक दोन बंदीवान असतील त्यांचा अपराध असेल तसें पारपत्य करून, गुन्हेगारी घेऊन सरसुभांचे हिशेबीं जमा करणें; आणि जामीन घ्यावयाजोगे असतील त्याचा जामीन घेऊन अपराधी अटकेंत आहेत त्यांस सोडून देणें ह्मणोन. सनद १.

रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे कारकून निसबत दफ्तर.

८. सरकारी कामगार, व जहागिरदार यांचें गैरवर्तन.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९९५ (६२)—तालुके कल्याणभिंवडी, व तालुके नेरळ देखील परगणे नसरापूर, व तर्फ चोण, येथील पेशजीं रामाजी महादेव यांचे कारकीर्दींत सुटी पडल्या आहेत, त्यांची चवकशी माजी मामलेदारांनीं करून फडशा केला नाहीं, त्यास हल्लीं सुटीची चवकशी झाली पाहिजे, यास्तव याचा एक्तीयार तुह्मांवर आहे, तरी तुह्मीं बहुत रीतीनें चवकशी करून, कोणाची रुयात न धरितां, रयतीस सूट पडोन दरम्यान ऐवज राहिला असेल, त्याचा बारीक शोध करून, लोभ न धरितां, व भीड संकोच न पडतां, सुटीचा ऐवज होईल तो साधावा. चवकशी करून हुजूर आणून समजावाल त्याप्रमाणें फडशा होईल, दार असेल तो वसूल घेणें, नादार असेल तो हसेबंदी लाऊन वसुलांत आणणें, व केवळ बुडीत, व गयाळ असेल, व वसूल करावयासी ठिकाणच नाहीं असें असेल तें हुजूर आणून समजावणें. समजोन

अर्बा सबैन
मया व अलफ
रबिलावल २१

---

now reported that on inquiry he did not consider that the Feringee was much to blame, and recommended that as it was no use incurring the expense of feeding and guarding him, and as he was unable to find a surety, he might be set at liberty. The recommendation was accepted.

VIII. Misconduct of Government officers and Jahágirdárs.

FROM NÁRO APPÁJIS DIARY.

(995) It was found that no inquires had been made by the former Mámlatdàr regarding the remissions granted from time to time to the ryots of Tálukà Kalyán Bhiwandi and Táluká Neral. A special officer was appointed to look into the matter. He was directed to make a very thorough and impartial inquiry and ascertain how much of the amount of sanctioned remissions had been

A. D. 1773-74.

फडशा करणें तो केला जाईल, ह्मणोन सालगुदस्तां हुजूरून करार जाला, त्यावरून सुटीची चवकशी करून, ऐवज घ्यावयाचा ठराऊन, दार, नादार, गयाळ, मयत यांचा झाडा तपशिलवार निवडून त्याप्रमाणें वसूल घ्यावा, तरी सरखोत, व फुरखोत पुढें सुटीचा कज्या राहिला नाहीं ह्मणोन कबजे मागतात, ह्मणोन तुह्मीं हुजूर विदित केलें; ऐशास सालमजकुरीं सुटीचे ऐवजीं मामलेदारापासून कर्जे रुपये ५०००० पन्नास हजार घ्यावयाचे करार केले आहेत, त्याप्रमाणें मामलेदार हुजूर भरणा करतील ते, व पेशजीं रामाजी महादेव, व दिनकर महादेव, यांजपासून सुटीचे ऐवजीं कर्जदाखल रुपये ३५००० पस्तीस हजार सरकारांत घेतले आहेत ते, एकूण पंचायशी हजार रुपये ज्यांचे त्यांस पोहोंचले पाहिजेत, त्यास सालगुदस्तां सुटीची चवकशी तुह्मीं केली. त्यांपैकीं दार कुळांचा ऐवज वसूल घेऊन सालमजकुरीं पन्नास हजार रुपये मामलेदारांपासून घ्यावयाचा करार जाला आहे त्या ऐवजीं घेणें. नादार कुळांकडील तूर्त ऐवज यावयाचा नाहीं. त्यांचें जीवन पाहून हप्तेबंदी करून, तो ऐवज पेशजीं रामाजी महादेव, व दिनकर महादेव, यांजपासून पस्तीस हजार रुपये घेतले आहेत त्या ऐवजीं वसुलास नेमून देणें. नादारपैकीं एक दोन असामींचें फाजील सरकारांत मामलतसंबंधें येणें आहे, त्या ऐवजीं सुटीचा ऐवज त्या असाम्यांकडे ठरेल तो रदकर्जी लिहिणें. गयाळ मयताचा झाडा हुजूर आणून समजावणें. सुटीपैकीं ज्या कुळांपासून वसूल घ्याल त्यांस पुढें सुटीचा लांझ्या राहिला नाहीं ह्मणोन जाब सरसुभ्याहून लिहून घेणें. येणेंप्रमाणें सुटीचा फडशा करून जावता हुजूर समजावणें, त्याप्रमाणें विल्हेस लागेल. चवकशीमुळें पंचायशीं हजारांस ऐवज न पुरला तर, मागील मामलेदारांनीं सुटीपैकीं ऐवज साधणूक करून घेतला असेल, त्याची रुजुवात करून पस्तीस हजारांचें रदकर्जी लिहिणें ह्मणोन, त्रिंबक विनायक सरसुभा प्रांत कोंकण यांचे नांवें. छ. १४ जिल्हेज.

सनद १.

रसानगी याद.

९९६ (१८९)—वेदशास्त्रसंपन्न राजश्री रघुनाथ दीक्षित यांचे नांवें कीं, मकाजी

---

collected from the ryots and misappropriated by the officers. In cases in which the person concerned in the fraud was able to repay the money misappropriated it should be recovered from him. If he was not able to pay, an agreement for the payment of the money by instalments should be taken. Cases in which the officers concerned were in extremely poor circumstances should be reported to the Government for orders.

A. D. 1774-75.

(996) Makáji Teli of kasbá Khed owed some money to his creditors. They handed over the documents regarding the loan to Raghunáth Dixit. He forcibly recovered the

खमस सबैन मया व अलफ रबिलाखर ५

तेली, कजबे खेड, यानें हुजूर विदित केलें कीं, आपण सावकाराचें कर्ज देणें आहे. बारावयासीं आवाकांत नाहीं, असें असतां रघुनाथ दीक्षित यांणीं माझे सावकारांचीं खतें घेऊन मजला फार सक्त तगादा करून मजपासून एवज उगऊन घेतला.

६०० मल्हार भट पाठक, पुणेंकर, यांचे मुद्दल रुपये २०० त्याचा वसूल घेतला. बरहुकूम.

३०० भटजीस दिले रुपये.
३०० दरम्यान आपण घेतले रुपये.

६००

४० महादेव भट दातार, खेडकर, यांचे मुद्दल रुपये २५ त्याचा वसूल तपशील.
१७ कान्हूचा कुणबी बनजाजी याचे मुद्दल रुपये १२ त्याचा वसूल.
३९ रामकृष्ण भट वैशंपायन यांचे मुद्दल रुपये १५ त्याचा वसूल.
१५ आपा सराफ, खेडकर, यांचे मुद्दल रुपये १० त्याचा तपशील.

७११

एकूण सातशें अकरा रुपये वसूल घेतला, त्याची चवथाई सरकारांत द्यावी तेही न दिल्ही, आपणच मध्यें रुपये खाऊन मज गरीबास तसदी देतात. हल्लीं महिपतराव देशपांडे, चाकणकर, यांजपासून एकशेंचोवीस रुपयांचें माझें खत घेऊन, त्यांचें तीनशें रुपये देणें ह्मणोन तसदी केली आहे, याजमुळें मी परागंदा होऊन फिरतों. लोकांची खतें घेऊन यास तसदी न देणें, ह्मणोन पेशजीं सरकारचें पत्र सादर जाहलें असतां मानीत नाहींत, मजला जबरदस्तीनें बुडवितात. येविसींची आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन; ऐशीयास एकवेळ तुह्मांस सरकारांतून ताकीदपत्र सादर जाहलें असतां फिरोन लोकांचे कर्जाकरितां या गरीबास तगादा करून देशधुडी लाविला हे कोण रीत? दरमियान रुपयेही गरीबांचे खातां हें परिच्छिन्न, उत्तम नसे. हल्लीं हें पत्र सादर केलें असे, तरी या उपरीं असे तगाद एकंदर न करणें. पेशजीं सातशें अकरा रुपये वसूल घेतला आहे, त्यापैकीं दरम्यान

amount due but did not pay one fourth of it to Government. He further tried to compel Makáji to pass a bond for Rupees 300, in consideration of a sum of Rupees 124 obtained by him from Mahipatrao Deshpánde of Chàkan. Makáji therefore left the village and complained to the Peshwâ who issued orders to Raghunâth to stop oppressing the man The orders were set at naught and the man complained again. Raghunáth Dixit was severely reprimanded for his conduct and was directed not

तीनशें रुपये घेतले आहेत ते, व बाकी चवथाई हुजूर पाठऊन देणें, येविशींचा बोभाट फिरोन हुजूर न येत असें करणें ह्मणोन. चिटणिशी. छ. २६ मोहोरम. पत्र १.

मुतालिक ह्यांचे रोजनिशीपैकीं.

९९७ (१)—निंबाजी व तान्हाजी महाजन, कसबे नसिराबाद, परगणे मजकूर, याणें हुजूर विदित केलें कीं, आपलें कर्ज काळो बाबाजी कुळकर्णी, कसबे मजकूर, यांजकडे येणें होतें तें नारो केशव, दिंमत कमाविसदार, परगणे मजकूर यांणी चौकशी करून चौथाई सरकारांत घेऊन आपलें कर्ज वसूल करून दिल्हें. त्यास हल्लीं नारो केशव दूर होऊन, मशारनिल्हेचे तर्फेनें हिराजी रणसोड परगणे मजकुरीं आले आहेत. ते कुळकर्णी मजकुराची बळासी करून कर्जापैकीं कुळकर्ण्याकडील ऐवज आपल्यास पावला आहे, तो माघारा देवितात. येविशीं ताकीद जाली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तर वाजवी कर्ज असतां चवथाई सरकारांत घेऊन निकाल करून देविला, तो फिरोन मनास आणाव-यास प्रयोजन काय? तर महाजनास कर्जाचा तगादा न करणें, व याखेरीज महाजनाचें कर्ज लोकांकडे येणें तें वाजवी मनास आणून चौथाई सरकारांत घेऊन कर्जाचा निकाल करून देवणें. फिरोन बोभाट येऊं न देणें ह्मणोन, हिराजी रणसोड, दिंमत महादाजी केशव कमाविसदार, परगणे मजकूर, यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सुमस मबैन मया व अलफ साबान १२

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

९९८ (३४२)—फकीर महमद माजी कमाविसदार, मौजे केम, परगणे वांगी, याज-

---

to molest the man and to remit to Government a fourth of the loan recovered by him.

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(997) A debt due to Nimbáji and Tànáji Mahájan of Nasirábàd from Kálo Bàbáji Kulkarni was recovered for them by Náro Keshav, an agent of the Kamávisdár, and a fourth of it was as usual credited to Government. Náro Keshav was subsequently recalled by the Kamávisdár and Hiráji Ransod was appointed in his place. Hiràji siding with the Kulkarni asked Nimbáji and Tánáji to restore to the Kulkarni the money levied by them. They applied to the Huzur. Hiràji was informed that his action in raking up an old matter was improper, and he was directed not to press Nimbáji and Tánàji to return the money.

A. D. 1774-75

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(998) The Mokádams of Kem in Parganá Wángi laid a complaint

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

कडे तुह्मीं अन्याय लाऊन द्यावे, अन्याय लाऊन न दिल्यास रुपये पांच हजार रुपये गुन्हेगारी सरकारांत तुह्मीं द्यावी, याप्रमाणें सन खमस सबैनांत कबूल केलेंत; त्याजवरून कलमें लागू करावयाची चौकशी कमळाकर भास्कर याजकडे सांगितली; त्यांणीं मनास आणितां कलमें लागू न जाहलीं, तुह्मीं खोटे पडलेत, सबब सदरहू पांचहजारांची वरात राणूजी नाईक निंबाळकर यांची सालगुदस्त बापूजी जैन कमाविसदार, मौजे मजकूर, यांजवर करून ऐवज सरकारांत घेतला असे, तरी सदरहू पांच हजारांचे व्याजसुद्धां बापूजी जैन यांस पावते करून कबज घेणें ह्मणोन, मोकदम मौजे मजकूर यांस छ. १२ रजब. सनद १.

रसानगी अजमास.

९९९ (४६२)–त्रिंबक कृष्ण व भवानी हरी कमाविसदार, तर्फ हवेली, प्रांत

समान सबैन मया व अलफ जमादिलावल १०

संगमनेर, यांस पत्र कीं, शिंपी, रंगारी, साळी वगैरे उदमी रयत कसबे संगमनेर यांणीं हुजूर विदित केलें कीं, कमाविसदाराकडून, व कसबे मजकूरचा केरोजी पाटील गुंजाळ यांजकडून आपल्यास जाजती उपद्रव लागतो, त्याचा बंदोबस्त सरकारांतून जाल्यास आमची नांदणूक होईल; नाहीं तरी होत नाहीं; त्याजवरून याचें वर्तमान मनास आणून कलमें करार करून दिलीं असेत. बीतपशील.

किता.	कलमें.	किता.	कलमें.
१	कसबे मजकूरचे उदम्यांपासून गुदस्तां मोहोतफ्र्याशिवाय एकसालां पट्टी सरकारांत घेतली असतां सालमजकुरीं	१	कसबे मजकूरचे उदमी बाजारास परगणे मजकुरीं जातात, त्यांस मना करूं नये. कलम.

A. D. 1776-77.

against the late Kamávisdár of the village, Fakir Mahomed, and agreed to forfeit Rs. 5000 to Government if they failed to substantiate it. Kamlákar Bháskar was then deputed to inquire into the matter, and he found that the charges were not true. The complainants were therefore directed to pay in the amount agreed upon.

(999) The tailors, dyers, weavers and other traders of Kasbá Sangamner represented that they were much harassed by the Kamávisdár and by Keroji Pátil. The Kamávisdár was therefore addressed as follows:—

A. D. 1777-78.

(1) The levy in the preceeding year from the traders, in addition to Mohotarf, was for one year only: It should not be made in the current year;

दुसरे पट्टीचा तगादा केला आहे तो न करणें; वसूल घेतला असेल तो माघारा देणें. कलम.

॥। खास बारदार दिंमत हाय असामी ६

who were deputed to keep order at the Parwati temple at the time of the assembly.

१॥	जासूद जथेहाय असामी	१२
३।=	प्यादे दिंमत विठोजी गुंड असामी	२७
३।=	प्यादे दिंमत अबदुल असामी	२७
१	प्यादे दिंमत पिरजी भिलारे असामी	१६
१।=॥	प्यादे दिंमत रामजी यादव	९
३।=॥	दिंमत तोफखाना	२५
४॥।	दिंमत देवजी सावंत वगैरे माहाले लोक	३८
१	बहिरजी मोरे	८
।।	प्यादे दिंमत बालोजी सालोखे	२
१।=॥	प्यादे निसबत विसाजी भोडदेव जोग	९
।=॥	चाकणकर असामी	१
१	फूटलोक असामी	८
२९		२३२

५४।=॥	दिंमत हुजूर हशम ४३३	
३॥।	खिजमतगार निसबत खास जिलेब असामी	१०
	एकूण	
१७२।		१३७८

२६२ तैवज खर्च श्रावणमासचे उत्साहाबद्दल ब्राह्मणांस विडे द्यावयास विड्याचीं पानें हिरवीं खरेदी केलीं, गुजारत प्यारजी तांबोळी पानें सुपारी.

२००००० छ. ३० जमादिलाखर.
१००००० छ. १ रजब.
१००००० छ. ४ रजब.
१२४००० छ. २६ रजब.

५२४०००

दर रुपयास पानें २००० दोन हजार प्रमाणें.
रसानगी यादी.

४५४।

१०३१ (५२३)–धूम्रपानी गोसावी चौऱ्यायशीं आसनें करून योगसाधनेंत आनंदवलीस नेहमीं राहतो. त्यास पेशजीं रोजमरा दरमहा वीस रुपये व पांच शेर लांकडें वजन दररोज पावत होतें, त्यास अलीकडे पावत नाहीं, ऐशास हल्लीं पेशजींप्रमाणें दरमहा रोजमरा रुपये २० वीस, व लांकडें दररोज वजन पक्के ऽऽ५ पांच शेर देविले असे, तरी सनद पैवस्तगिरीपासून गंगापुराहून देत जाणें ह्मणोन, रामचंद्र बल्लाळ नारळीकर यांस. सनद १.

समान सबैन मया व अलफ मोहरम २३

रसानगी यादी.

१०३२ (५३९)–मौजे सिंगवें, परगणें नाशिक, हा गांव श्री रामचंद्र संस्थान पंचवटी यांजकडे आहे, त्यास श्रीचा पुजारी याणें आपले कर्जाचे ऐवजीं सावकाराकडे गांव गहाण ठेऊन, गांवचा वसूल सावकार परभारा घेतो, ह्मणोन हुजूर विदित झालें; याजवरून मौजे मजकूरचे बंदोबस्तास हुजुरून श्रीनिवास नर्मा कारकून शिलेदार पाठविले असत. तरी मशारनिल्हेसी रुजू होऊन, मौजे मजकूरचा श्रीकडील अंमल सुरळीत देणें, पुजारी याजकडे व त्याचे सावकाराकडे वसूल एकंदर न देणें ह्मणोन, मौजे मजकूरचे मोकदमाचे नांवें छ. २२ जिल्काद चिटणिसी. पत्र १.

समान सबैन मया व अलफ सफर २६

१०३३ (५४५)–तेलंग अगंतुक ब्राह्मण सोमवार पेठेंत मृत्यु पावला आहे, त्याचे दहनास लांकडें जाळाऊ वजन पक्के खंडी ·।।।· पंधरा मण लांकडें देविले (लीं) असे(त) तरी खरेदी करून देऊन ब्राह्मणाचें दहन करणें, सदरहू लांकडांची किंमत होईल ते शहरमजकूरचे कोतवालीचे

समान सबैन मया व अलफ सफर २६

(1031) An allowance of Rs. 20 per month and 5 seers of fuel per day was granted to an ascetic who inhaled smoke and practised Yoga in 84 different postures.

A. D. 1777-78.

(1032) Government was informed that the village of Singwe in Parganá Násik, belonging to the idol of Rámchandra in Panchawati, had been mortgaged by the worshipper to his creditor, and that the revenue was being recovered by the creditor direct. A karkun was sent to take over the management of the village and to spend proceeds for purposes connected with the idol. The pátil of the villaged was enjoined to see that the revenue was not paid to the creditor or to his agents.

A. D. 1777-78.

(1033) Sanction was given to supply 3/4 Khandi, that is 15 Maunds,

हिशेबीं ब्राह्मणाचे नांवें धर्मादाय खर्च लिहिणें मजुरा पडेल ह्मणोन, आनंदराव काशी कमाविसदार कोतवाली शहर पुणें यांचे नांवें छ. २६ जिल्हेज. सनद १.

परवानगी रूबरू.

१०३४ (५८३)—धर्मादाय दक्षणा श्रावणमास मुक्काम पुणें. रुपये.

तिसा सबैन
मया व अलफ
रजब २९

३२२०२ पर्वतीस रमण्यांत दक्षणा ब्राह्मणांस दिल्ही, प्रारंभ छ. ४ रजब श्रावण शुद्ध षष्ठी सौम्यवासरे बेवीस घटकांनंतर रुपये.

१३२१६ विद्यमान जनार्दन आपाजी, दरवाजा पहिला, ब्राह्मण ८३४०, एकूण शेरा १॥ प्रमाणें.

६४६० विद्यमान रामशास्त्री, दरवाजा दुसरा, ब्राह्मण ३२५९ एकूण शेरा १॥।=॥ प्रमाणें. रुपये.

५३८१ विद्यमान अमृतराव विश्वनाथ, दरवाजा तिसरा, ब्राह्मण २७५०, शेरा १॥।=। प्रमाणें.

७१४५ विद्यमान कृष्णराव बल्लाळ काळे व काशीनाथ शास्त्री, दरवाजा चौथा, ब्राह्मण ३४१५ एकूण शेरा २॥ प्रमाणें

३२२०२ १७७६४

शेरा सरासरी १॥।८ प्रमाणें.

२५८२२ वाड्यांत ब्राह्मणांस दक्षणा दिल्ही. विद्यमान रामशास्त्री नावनिशीवार तपशीलबंद. अलाहिदा सुमारें ३३ एकूण ब्राह्मण असामी.

देखील क्षेत्रींचे ब्राह्मणांसुद्धां दक्षणा. रुपये.

२३८७२ निसबतवार व क्षेत्रस्थ वगैरे मिळोन ब्राह्मण असामी २१७७ शेरा सरासरी १०॥।=॥ रुपये.

१९५० यज्ञेश्वरशास्त्री, आपाशास्त्री यांचे बंधू यांस लग्नाबद्दल सालमजकुरीं एकसाल. रुपये.

२५८२२

A. D. 1777-78 of fuel for the cremation of a travelling Telang Brahman who died in Poona.

(1034) Among the details of this date, the details of the *Shrawan-Dakshina* expenses amounting to Rs. 64, 537 are given. It appears from a remark made at the end that some

A. D. 1778-79.

३०० शंकराचार्य स्वामी शृंगेरीकर यांच्या समाधी पंचवटींत श्रीगोदातीरीं दोन आहेत, तेथील पूजन, अर्चन, व पुण्यतिथ दोन मिळून दरसाल तीनशें रुपये श्रावणमासीं द्यावयाचा करार आहे, त्याप्रमाणें सालमजकूरचे रुपये.

२ श्रीदेवदेवेश्वर, वस्ती पर्वती, यांस रमण्यांत दक्षणा समाप्त जाल्यावर दक्षणा ठेविली, विद्यमान जनार्दन आपाजी. रुपये.

१ श्रीदेवदेवेश्वर.
१ श्रीविष्णु.

९९५ दुखणेकरी ब्राह्मण व ब्राह्मणांचीं मुलें वगैरे रमण्यांत दक्षणेस गेलीं नाहींत. त्यांस घरोघर दक्षणा दिल्ही; व गांवांतील देवांपुढें दक्षणा ठेविली, गुजारत कारकून निसबत रामचंद्र नारायण सुभा प्रांत पुणें, व बाळ दिक्षित गडबोले बरहुकूम यादी. रुपये.

२ श्रीदेव.
·॥· श्रीओंकारेश्वर.
१ श्रीरामचंद्र तुळशीबागेंतील.
·॥· श्रीगणपती.

२

९९३ ब्राह्मण. असामी ७४८

एकूण शेरा सरासरी १।- प्रमाणें. रुपये

५०४ प्रत असामी ५०४ दर १
४८६ प्रत असामी २४३ दर २
३ प्रत असामी १ एकूण.

९९३ ७४८

९९५

६६७ मुक्काम पुरंधर येथील ब्राह्मणांत दक्षणा दिल्हीबरहुकुम याद.

१० बाळंभट किरकिरे.
८ गोविंदभट किरकिरे.
१० पुरुषोत्तम भट, पुराणीक.

at least of the persons who received Daxaṇá at the wadá were brought in palanquins; all the palanquins in the town were requisitioned by Government for the purpose on that day.

६ बाळंभट मराठे.
६० प्रत असामी १२ दर ५ प्रमाणें.
१२८ प्रत असामी ३२ दर ४ प्रमाणें.
२३१ प्रत असामी ७७ दर ३ प्रमाणें.
२०६ प्रत असामी १०३ दर २ प्रमाणें.
८ प्रत असामी ८ दर १ प्रमाणें.

६६७ २३६

शेरा सरासरी २॥-। प्रमाणें.

५९९८८ २०९२६

४१५५॥ खुर्दा रमण्यांत उलफ्याबद्दल दर पांच रोजां व दक्षणे समयीं दिल्हा, गुजारत बाळाजी नारायण आगाशे, खुर्दा गुजारत पांडोबा नाईक वगैरे खुर्दा. रुपये.

१६४८३। उलफ्यास पांच रोजां ब्राह्मण वगैरे असामी. एकूण.

१३५२८॥ ब्राह्मण ५४११४ असामी. दर असामी टक्का ।· प्रमाणें.

८१७७॥। दरवाजा पहिला असामी ३२७११
४३८२ दरवाजा दुसरा असामी १७५२८
९६८॥। दरवाजा तिसरा असामी ३८७५

१३५२८॥ ५४११४

तपशील तेरखा.

१८३६	छ. २९ जमादिलाखर	७३४१
२५०९॥	छ. ३० जमादिलाखर	१००३८
२८५८॥।	छ. १ रजब असामी	११४३५
३०२६॥	छ. २ रजब	१२१०६
३२९७॥।	छ. ३ रजब	१३१९१
१३५२८॥		५४११४

२९५४॥। बायका ११८१९ असामी दर असामी ।· प्रमाणें एक.

६६३॥।	छ. २९ जमादिलाखर	२६५५
८२२	छ. ३० जमादिलाखर	३२८८

४७५।	छ. १ रजब	१९०१
४६८॥।	छ. २ रजब	१८७५
५२५	छ. ३ रजब असामी	२१००
२९५४॥।		११८१९

१६४८३। ६५९३३

२१६०। दक्षणेसमयीं ब्राह्मणांस दर असामीस रुके ८६ प्रमाणें इस्तकबिल छ. ४ रजब तागाईत छ. ५ मिनहू. दक्षणेस असामी १७७६४ पैकीं ब्राह्मणांस खुर्दा पावला नाहीं ते वजा असामी ४८२ बाकी असामी १७२८२ एकूण दरवाजेवार असामी एकूण टके.

१०२३॥।	दरवाजा पहिला असामी	८१९०
३६५॥।६	दरवाजा दुसरा असामी	२९२७
३४३॥।	दरवाजा तिसरा असामी	२७५०
४२६॥।६	दरवाजा चौथा असामी	३४१५
	टके	
२१६०।		१७२८२

१८६४३॥ ८३२१६

पैकीं वजा खुर्दाचें मापें घेतां, व खर्च होतां कसर वाढली खुर्दा टका १॥ बाकी टके १६६४२ एकूण खुर्दा खरेदी गुजारत हाये. रुपये.

२२६३।=॥ गुजारत पांडोबा नाईक पराडे, खुर्दा टके १०१५० दर ४।११। प्रमाणें रुपये.

१२६७॥=॥ गुजारत जेत्या

१००० प्रत टके ४५०० दर ४॥

२६७॥=॥ प्रत टके १२०० एकूण दर ४।११। प्रमाणें.

१२६७॥=॥

६२४॥=॥ गुजारत यादोबा नाईक लोहोकर टके २७९.२ एकूण दर ४।१०॥ प्रमाणें.

———

४१५५॥=॥

पैकीं वजा सुट ८=॥, बाकी रुपये.

३९३॥। किरकोळ तपशील बंद अलाहिदा २ एकूण.

———

६४५३७।

वाड्यांत ब्राह्मणांस दक्षणा दिली, विद्यमान रामशास्त्री इस्तकबील छ. २९ जमादिलाखर, श्रावण शुद्ध १ भृगुवासरे तागाईत छ. ७ रजब. रुपये.

३५६२ आश्रित वगैरे.

१५० बाळकृष्णशास्त्री.

१०० रामशास्त्री.

१५० लक्ष्मण पाठकर्जा.

× × × ×

२६३५ निसबत बापूभट शित्रे.

२५ विश्वनाथभट गोडशे.

२५ मथुराभट वैद्य काशीकर.

२५ बाळकृष्णभट छत्रे.

× × × ×

२२८ निसबत यज्ञेश्वर दीक्षित मनोहर.

८ बाळंभट घाणेकर.

५ शंकर दीक्षित आकुर्डीकर.

१८२ वाड्यांतील असामी एकूण रुपये.

२७ आचारी.

४ बाबाजी गोखला.

४ सदाशिव करमरकर.

× × × ×

७८ शागिर्द.

३ विसू जोशी.

३ भवानी शकर.

× × × ×

३० हरकारे.

३ बापू अवधारी.

३ विसोबा धुमाळ.

× × × ×

१५ रीमवान.

३ लक्ष्मण चोपडा.

३ येशवंत.

× × × ×

२० पीर कसबें पुणें यांस सालगुदस्तप्रमाणें सालमजकुरीं दक्षणेसमयीं पावतात ते.

१० शेखसला.

१० शेखसादत.

२०

११७॥ पोस्तखर्च प्यादे वगैरे रमण्यांत ब्राह्मणांचे बंदोबस्तास होते त्यांस मिठाईबद्दल दर असामी ८= प्रमाणें.

२२ किल्लेहायचे लोकांस.

३ किल्ले विसापूरकर असामी २४.

२॥। किल्ले राजमाची असामी २२.

× × × ×

११॥।= तालुके हाय.

६॥ तालुके विजेदुर्ग असामी ५२.

२॥ तालुके अवचितगड असामी २०.

२८॥= प्यादे वगैरे.

४॥= दिंमत रामजी यादव असामी ३७.

४॥ निसबत विसाजी धोंडदेव असामी ३६.

× × × ×

२८= माजी चंदनगडकरी.

१५० २५८= हुजूर हशमलोकांस असामी.

१५० कित्तालोक.

३६ पर्वतीस श्रीदेवदेवेश्वराकडे व विष्णूकडे चौकीस आहेत त्यांस सालाबादप्रमाणें.

१५ दरवाज्यांस असामी १५.

५॥= कारखान्याकडे वगैरे प्यादे असामी.

३० सरकारचे वाड्यांत दक्षणासमाप्तीदिवशीं ब्राह्मण कोंडले त्यांचे चौकीस.

१० ब्राह्मणांस आणावयास व पोचवावयास पालख्या शहरांतील गृहस्थांच्या जमा करावयास होते ते.

५ विद्याकडे.

× × × ×

१०३५ (८९२)–श्रावण मासचे दक्षणेचे बंदोबस्तास सरकारांत लोक आणविले असेत, तरी पोटाची सदरहु लोकांची पेगमी करून देऊन पाठवून देणें ह्मणोन. सनदा.

सीत समानीन मया व अलफ रमजान १७

१ परशराम श्रीनिवास प्रतिनिधी यांस असामी ३०० तीनशे यांविशीं.
१ सदाशिव चिमणाजी सचिव यांस असामी ३०० तीनशें यांविशीं.
१ रामचंद्र नारायण किल्ले पुरंधरपैकीं असामी १०० शंभर यांविशी.
१ नारो महादेव किल्ले सिंहीगडपैकीं असामी ७५ पाऊणशें यांविशीं.
१ रामराव नारायण किल्ले राजमाची, तालुके मजकूर, पैकीं असामी ५० यांविशीं.
१ रंगो शामराव किल्ले चंदन पैकी असामी १५ पंधरा येविशी.
१ भगवंतराव नारायण किल्ले चाकण पैकीं असामी १० दहा यांविशीं.
१ रघुनाथ सदाशिव तालुके रायगड पैकीं असामी १०० शंभर यांविशी.

८

आठ सनदा दिल्ह्या असेत. रसानगी महादाजी नरसी कारकून दिमत सर्वोत्तम शंकर. हशमनीस.

१०३६ (९०७)–पाद्री फैल्याद मानरदेव रेवदंडेकर याणें हुजूर येऊन अर्ज केला कीं, रेवदंड्यास मानरदेवीची रमेद फिरंगी याचे वेळेची आहे, तिच्या भिंती मजबूद आहेत परंतु वासे जुने होऊन वगैल काम जाया जाहलें आहे, ते सरकारांतून नीट करून देविलें पाहिजे म्हणोन: त्याजवरून रमेदीचें कामाबद्दल रुपये १०० शभर रुपये तालुके रेवदंडा पैकीं दे-

सीत समानीन मया व अलफ मोहरम १२

(1035) Men were brought to Poona from the service of Pratinidhi, Sachiv, and other officers to keep order during the alms giving ceremony in the month of Sráván.

A. D. 1785-86.

(1036) At the request of a Portuguese priest of Rewadanda, sanction was given to the expenditure of Rs. 100 on repairing a Christian church at Rewadanda.

A. D. 1785-86.

विले असत, तरी सदरहू शंभर रुपये देऊन काम करवणें म्हणोन, आनंदराव शिंदे याचे नांवें. सनद १.

रसानगीयादी.

१०३७ (९४३)–श्रीपंचलिंग महादेव, वास्तव्य मौजे बारव, तर्फ हवेली, प्रांत जुन्नर यांस, तालुके शिवनेर, व तालुके चास वगैरे जागां कोळ्यांनीं दंगा केला होता त्यांचें पारपत्य होऊन बंदोबस्त जाला ह्मणजे श्रीचें देवालय बांधावें ह्मणोन बाळाजी महादेव यांणीं नवस केला; त्याप्रमाणें कोळ्यांचें पारपत्य होऊन बंदोबस्त जाला. सबब श्रीचें देवालय दोन हजार रुपयांत बांधावयाचा करार करून बाळाजी महादेव यांस आज्ञा केली आहे. तालुके शिवनेर व तालुके चास येथील गांवगन्ना पैकी सरकारजमेशिवाय पट्टी करून दोन हजार रुपयांत देवालय बांधणें, जाजती पट्टी न करणें ह्मणोन, कमाविसदार यांचे नांवें. सनदा.

सबा समानीन मया व अलफ जमादिलावल २९

१ बाळाजी महादेव तालुके शिवनेर यांस कीं, श्रीचें देवालय दोन हजार रुपयांत बांधणें. सदरहूपैकीं सातशें रुपये निळकंठराव रामचंद्र, तालुके चास, यांजकडून देविले आहेत, बाकी तुह्मांकडून रुपये १३०० तेराशें देविले असेत. तरी तालुके मजकूर येथील गांवगन्नापैकीं देणें ह्मणून. सनद.

१ निळकंठराव रामचंद्र, तालुके चास, यांस कीं, श्रीचें देवालय दोन हजार रुपयांत बांधावयाची आज्ञा बाळाजी महादेव यांस केली आहे. सदरहूपैकी तुह्मांकडून रुपये ७०० सातशें देविले असेत, तरी तालुके मजकूर येथील गांवगन्नापैकीं देणें, ह्मणन. सनद.

२

रसानगीयादी.

१०३८ (९५०)–द्वारकादास बैरागी हे श्रीगोदातीरी मौजे बाभुळगांव, परगणा

(1037) When a rebellion of kolis broke out in Táluká Siwaner and Táluká Chás, Báḷáji Mahádeo, officer of the former Táluka, made a vow to build a temple to Shri Panch-Linga Mahádeo at Mouze Barav in piánt Junner, if the rebellion was put down. The rebellion was suppressed and Báḷáji Mahádeo was permitted to fulfill his vow by levying Rs. 2000 from the two Tálukás in addition to Government demand.

A. D 1786-87.

(1038) Dwárkádás, a Bairági residing in the fields near Bábhulgaum in Parganá Waijápur was a great ascetic. In summer he surrounded himself on all sides with fire, in the

A. D. 1786-87.

सबा समानीन मया व अलफ. रजब २४

वैजापूर, नजीक रानांत राहतात, निस्पृहवृत्तीनें आहेत, बहुत योग्य तपस्वी, उष्णकाळीं पंचाग्निसाधन, व पर्जन्यकाळीं पर्जन्यांत, व शीतकाळीं जलांत. याप्रमाणें तपस्वी, निराहारी दुग्ध प्राशन करून आहेत, आल्या गेल्या ब्राह्मणास व बैरागीयास अन्न देतात, व गाईची सेवा करितात. यांचे सरकारांतून चालविल्यास श्रेयस्कर जाणोन, नूतन इनाम पडजमिनीपैकीं जमीन चाहूर १॥ दीड चाहूर द्यावयाची करार करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी यांचें मठाजवळ लगते परगणा वैजापूरचे गांव आहेत, तेथील गांवपैकीं यांचे उपयोगी व गाईच्या चरावयाचे उपयोगी पडजमिनीपैकी जमीन सदरहूप्रमाणें पाहून नेमून त्यांचे दुमाला करून देऊन चतुःसिमेचा जाबता हुजूर पाठवून देणें. त्याप्रमाणें इनामपत्रें बैरागी यांचे नांवें करून दिल्हीं जातील ह्मणोन, रामचंद्र नारायण मामलेदार, परगणा नेवासें वगैरे महाल, यांचे नांवें.

सनद १.

रसानगीयादी.

१०३९. (१०१३)–श्रावणमासचे दक्षणेचे बंदोबस्तास तालुकेहायपैकीं लोक आणविले असेत, तरी पोटाची बेगमी करून पाठऊन देणें ह्मणोन.

इहिदे तिसैन मया व अलफ जिल्काद १

सनदा.

१ रघुनाथ चिमणाजी सचिव यांजकडील लोक असामी ३०० तीनशें येविशीं.
१ परशराम श्रीनिवास प्रतिनिधी यांजकडील लोक असामी ३०० येविशीं.
१ तर्फ शिवनेर निसबत बाळाजी महादेव यांजकडील लोक असामी २००.
१ किल्ले वंदन निसबत विश्वासराव नारायण लोक असामी ५०.
१ किल्ले पुरंधर निसबत रामचंद्र नारायण लोक असामी २००.
१ तर्फ पटा निसबत बाळकृष्ण केशव लोक असामी ५०.
१ किल्ले विसापूर निसबत भिकाजी गोविंद लोक असामी ६०.
१ किल्ले कोरीगड निसबत आनंदराव भिकाजी असामी ५०.
१ किल्ले चाकण निसबत भगवंतराव नारायण लोक असामी १५.

rainy season he exposed himself to rain and in winter he remained immersed in water. He lived on milk, distributed food to Brahmans and Bairágis, and was devoted to the service of cows. One and a half chahurs of inám land was therefore given to him.

A. D 1790-91.

(1039) About 1800 men were ordered to Poona from different tálukás to assist in keeping order at the time of the payment of the Daxaṇa distributed in the month of Shrávaṇ.

१ तालुके रायगड निसबत सदाशिव रघुनाथ लोक असामी २००.
१ किल्ले ताथवडा निसबत माधवराव कृष्ण असामी २५.
१ किल्ले राजमाची निसबत रामराव नारायण असामी ७५.
१ किल्ले चंदन व नांदगिरी निसबत रंगो शामराज लोक असामी ५०.
१ किल्ले परळी निसबत नारो बल्लाळ लोक असामी ३०.
१ किल्ले सिंहीगड निसबत केशवराव जगन्नाथ असामी १००.
१ किल्ले पाल निसबत गोविंदराव बल्लाळ असामी ७५.
१ किल्ले नारायणगड निसबत रामचंद्र शिवाजी असामी १५.
१ किल्ले घनगड हवालदार व कारकून लोक असामी १५.

१८

एकूण १८ सनदा दिल्ह्या असेत.

१०४० ( )—श्रीकार्तीकस्वामी, वास्तव्य पर्वती, यांचे प्रासादावर उल्कापतन होऊन विछिन्न जालें, त्याचा जीर्णोद्धार केला त्याजबद्दल खर्च आहे.

इसन्ने तिसन मया व अलफ सवाल ३

९ इनाम, नक्त नेमणुकी, वतनें वगैरे.

(ब) देणग्या पुढें चालवणें.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०४१ (२८७)—विनायकभट थथे यांस मौजे ताथवडें, तर्फ हवेली, प्रांत पुणें. हा गांव इनाम दिल्हा आहे, त्याचीं सरकारचीं इनामपत्रें होऊन राजपत्रें जाली आहेत, त्या पत्रांवर सरकारचा शिक्का गडबडेमुळें जाहला नाहीं, यास्तव श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामींस विनंती

सीत सबैन मया व अलफ. रबिलाखर ५

(1040) Some expenditure was incurred in repairing the temple of Shri Kártik Swámi at Parwati as it had been struck by lightening.

A. D. 1791-92

(b) Continuance of ináms.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(1041) The village of Táthawade in pránt Poona had been given to Vináyakbhat Thathe by the late Peshwá Mádhavrao and a Sanad had been issued but never sealed. The Peshwá's agent at Sátárá was asked to request the Satárá Rájá to cause

A. D. 1775-76.

करून, तीर्थस्वरूप कैलासवासी माधवराव साहेबांचे कारकीर्दीत पत्रें जालीं आहेत, सबब त्या वेळचे शिक्के काढवून भटजींच्या पत्रांवर शिक्का करून देणें ह्मणोन, कृष्णराव अनंत, मुक्काम सातारा, यांचे नांवें छ. ११ रबिलावल. सनद १.

येविशीं बाबूराव कृष्ण यांस सदरहू अन्वयें. सनद १.

२

रमानगीयादी.

१०४२ (९८२)—महालानिहाय येथील मुसलमान लुमाचे सदारत व अदालतीची मामलत तिमाराव भिमाजी याजकडे सालमजकुरापासून सांगोन, इनामदार, व जहागीरदार, व रोजिनदार. व काजी मुलाणे खतीब वगैरे, व मोईतसबी; यांची चौकशी करून गैरसनदीमुळें ऐवज निघेल तो, व न्यायमनसुबीमुळें व सनदी लोकांपासून वाजवीच्या रीतीनें जीवन पाहून सरकारचा ऐवज साधावयाविशीं आज्ञा केली असे; तरी मुसलमान लोकांस ताकीद करून मशारनिल्हेकडे पाठवणें. ज्याचे ते रुजू होऊन सदारतीकडील पत्रें आणतील त्याप्रमाणें इनामगांव, व जमीन, व रोज, व वतनें, व हक्क लवाजमे चालवीत जाणें; दिकत असेल त्याची चौकशी, व खूम मजकुराचा न्याय इनमाफ वगैरे सदारतीचे व अदालतीचे अंमल मशारनिल्हेकडील कारकून येऊन करितील त्यांस करूं देणें; दुमाले व इनामगांव ज्यांकडे असतील त्यांस ताकीद करून अंमल देवित जाणें; व काजी मुलाणे वगैरेयांस गांवखर्ची इनामजमीनी व हक्क असतील त्यांची वैवाट पाहतील त्याचा झाडा दाखवणें; येविशीं गांवगन्नाचे मोकदमांस ताकीद करणें ह्मणोन, मामलेदार व जमीदार यांस चिटणिसी पत्रें.

तिसा समानीन मया व अलफ. जमादिलावल ६

२ परगणे पारनेर.
१ महादाजी नारायण यांस.
१ जमीदारांस.
———
२

a search to be made for the late Peshwá's seals and to order the sanads to be sealed with it

(1042) Timárao Bhimáji was appointed to inquire into the land and cash alienation in parganá Parner, Nagar, Sinnar Sangamner, Násik &c. enjoyed by Mahomedans. Where no sanads were forthcoming the alienations were to be resumed. Where sanads were forthcoming a reasonable amount from the holder as *nazar* was to be levied for Government.

A. D. 1788-89.

२ तर्फ नगर हवेली.
 १ महादाजी नारायण यांस.
 १ जमीदारांस.
 ———
 २
२ परगणे सिन्नर.
 १ पांडुरंग धोंडाजी कमावीसदार यांस.
 १ जमीदार परगणे मजकूर यांस.
 ———
 २
२ तर्फ हवेली संगमनेर.
 १ गणेश भवानी कमावीसदार यांस.
 १ जमीदारास.
 ———
 २
२ तर्फ त्रिंबक.
 १ धोंडो महादेव यांस.
 १ जमीदार यांस.
 ———
 २
२ परगणे नाशिक.
 १ कृष्णराव गंगाधर कमावीसदार यांस.
 १ जमीदार यांस.
 ———
 २
१ जमीदार परगणे पाडेपेडगांव यांस.
———
१३

१०४३ (१०७६)-परगणे येरंडोल वगैरे महाल येथें इनाम जमीनी आहेत, त्यास बेवारशी व जाजती सुदामतशिवाय अनभवीत असतील त्यांची चौकशी करून, बेवारशी व जाजती जमीनी असतील त्यांचा वसूल सरकारांत घ्यावयाविशीं तुम्हांस आज्ञा करून हें पत्र सादर केलें असे.

सल्लास तिसैन मया व अलफ सवाल २३

(1043) An inquiry was ordered to be made into ináms which had become liable to resumption through failure of heirs, as also into those which were unauthorizedly held. All such ináms were ordered to be fully assessed to the revenue.

A. D. 1792-93.

तरी बेवारशी व जाजती जमीनी असतील त्याचा वसूल महालाकडे घेणें; आणि सुदामत इनाम असतील ते चालवणे ह्मणोन भिकाजी विश्वनाथ कमावीसदार यांचे नांवें चिटणिसी.

पत्र १.

येविशीं. पत्रें ४.

३ जमीदारांस.

१ परगणा येरंडोल.
१ परगणा नेर.
१ परगणा बेटावद.

३

१ मोकदम देहेवि तपशील.

२ परगणा यदलाबाद.

१ मौजे चांगदेव.
१ मौजे इटई.

२

१ मौजे वाघोदें परगणा रावेर.
१ मौजे धाधरणे, परगणे बेटावद.

४

४

१० किताबती, व बहुमान.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०४४ (३५२)–बाबूराव कृष्ण यांचे नांवें सनद कीं, तुह्मांस बहुमान चवरी द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे, तरी चवरी नवी करावयास रुपये.

सबा सबैन मया व अलफ रमजान २९

X Grants of titles and honours.

FROM JANÁRDAN APÁJI'S DIARY.

(1044) Baburao Krishna was permitted to use a *chawri*, and Rs. 30 were given to him to get one made (Rs. 15 for cow's hair and Rs. 15 for the handle.)

A. D. 1776-77.

१५ गंगावनाचा कांदा.
१५ दांडीस रुपे.

३०

एकूण तीस रुपये नेमून एकसालां दिल्हे असेत, तरी किल्ले सातारा येथील ऐवजीं घेऊन चवरी करऊन बाळगीत जाणे ह्मणोन छ. १९ रमजान. सनद १.

परवानगीरूबरू.

मुतालीकांचे रोजकिर्दीपैकीं.

१०४५ (१९)–बळवंतराव कदम बांडे याचे नांवे सनद कीं, ताराजी कदम शिलेदार तुह्मांकडील यांणीं तुमचे पथकाबरोबर स्वारींत चाकरी चांगली केली, सबब त्यांस आफ्तागिरा करार करून दिल्हा असे, तरी तुह्मांकडील सरंजामाचे ऐवजीं सदरहू आफ्तागिऱ्याची मोईन सालीना रुपये ५० पन्नास रुपये छ. १ सफरापासून देत जाणें; व आफ्तागिराचें सामान शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन. सनद १.

इसन्ने तिसैन मया व अलफ सफर ७

रसानगीयादी.

११ सार्वजनिक इमारती, व लोकोपयोगीं कामें.

(अ) विहिरी व तलाव.

१०४६ (४९६)–अमृतराव आपाजी यांस सनद कीं, वेदमूर्ती देवशंकरभट ओझे, वास्तव्य मौजे धरोल, परगणे हकार, प्रांत सोरट, यांणीं द्वारकेचे वाटेस मौजे मजकूरचे रानांत सहा कोस उजाडींत पाणी नवतें तेथें विहीर खणोन पाणी पाडिलें आहे. तें वाटसरांचे उपयोगीं पडतें. परंतु भोवर-

समान सबैन मया व अलफ रजब १२

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(1045) Táráji Kadam Silledár, under Balwantrao Kadam Bânde, having done good service in the late campaign was given an annual allowance of Rs. 50 for the salary of an *áftágir* bearer.

A. D. 1791-92.

XI Public buildings, and works of public convenience.

(a) Wells and tanks.

(1046) Dewashankarbhat Oze of Dhárol in pargana Hakár in prant Sorat had constructed a well within the limits of the village for the use of travellers proceeding to Dwárka, as no water was to be had for 12 miles round. Sanction was accorded to an annual expenditure of Rs. 60 for drawing water from the well by bullocks.

A. D. 1777-78.

गावचीं गुरें व वाटसरांचीं गुरें घोडीं वगैरे यांचे उपयोगीं मोट लाविल्याशिवाय पडत नाहीं, यास्तव मोट लाविली पाहिजे म्हणोन, भटजींनीं विदित केलें; त्याजवरून मोटेचे बैलांस व माणसांस मिळोन दरसाल रुपये ६० साठ तालुके अमदाबादपैकीं नेमून देविले असत, तरी सदरहू साठ रुपये दरसाल मोटेचे बैलांस व माणसांस नेमून देणें, हे मोट लावतील म्हणोन.

सनद १.

रसानगीयादी.

(१०४७ (५२०)-बाजी गोविंद यांस सनद कीं, चिमणाजी महादेव व माधवराव राम यांणीं विदित केलें जें, कसबे पाल, मामले मजकूर, येथें हाटाळे तळें बहुतकाळीं आहे. तें गाळानें भरलें होतें, त्यास भुतांदेवतांचे उपद्रवाकरतां हा काळपर्यंत कोणीं गाळ काढून नीट केलें नाहीं, त्यास आपण तेथील जमीदारास पुसोन, भुतांदेवतांचा बंदोबस्त करून, दगडी बांध व घाट बांधोन तयार केलें. तळ्याचें पाणी गुरांस व जनांचे उपयोगीं पडतें. तळ्याचे दक्षिणेस व पश्चिमेस व उत्तरेस तिहीं बाजूंस बांधावर आंबे, केळीं व फळझाडें लाविलीं आहेत. त्या कामास पदरचे आठशें रुपये, व गांवकरी. वाणी, उदमी वगैरे यांणीं उदकाचें काम सर्वांचे उपयोगीं परोपकार जाणोन पट्टी करोन तीनशें बेचाळीस रुपये दिले. त्यासुद्धां खर्च करून तळें बांधोन पाणी विपुल केलें. असें असतां सालमजकुरीं बाजी गोविंद यांणीं सरकारचें तळें तुम्हांकडे आहे, तें जाग्यासुद्धां आपणाकडे घ्यावें, याअन्वयें सरकारचें पत्र आम्हांस आणिलें, त्याजवरून आम्हीं पुण्यास येऊन सदरहू वर्तमान मशारनिल्हेस सांगितलें, तेव्हां त्यांणीं तळें जाग्यासुद्धां आमचे स्वाधीन करविलें आहे, त्याप्रमाणें आम्हांकडे चालवावयाविशीं सरकारांतून सनद दिली पाहिजे म्हणोन; त्याजवरून मनास आणितां उभयतां नोदक यांणीं आपले पदरचा ऐवज पट्टी करून गांवकरी वगैरे यांणीं दिल्हा त्यासुद्धां खर्च करून तळें बांधून उदक विपुल सर्वांस केले; आणि तळ्याचे तिहीं बाजूंस बांधावर झाडें आंब, फणस वगैरे फळझाडें लाऊन बाग करून, सन सलास सीतैनापासून आज सोळा

समान सबैन मया व अलफ जिल्काद २०

(1047) The tank of Hátále in kasba Pál had been silted up for a long time. No one ventured to clear it through fear of raising evil spirits. Chimnáji Mahádeo and Mádhavrao Rám, with the permission of the Jamidár, arranged about the evil spirits and had the stone wall and steps repaired at a cost of Rs 1142: of this amount Rs. 800 was given by Chimnáji himself, the remaining amount being raised by contributions. The tank had now an ample supply of water and trees were planted around it. It was now claimed by Bàji Govind, on behalf of Government. The matter being taken to the Peshwá, the tank was made over to Chimnáji Mahádeo and the other person on account of their expenditure on it.

A. D. 1777-78.

वर्षे उपभोग करीत आहेत, त्यास सालमजकुरीं तळें सरकारी ह्मणोन तुह्मांकडे सुभा निसबत सरकारांतून दिल्हें होतें, त्यास मशारनिल्हे यांणीं सदरहू वर्तमान तुह्मांस सांगितल्यावरून तुह्मीं तळें मोडकांकडे ठेविल्याप्रमाणें सरकारांतून याजकडे करार करून दिल्हें असे, तरी पेशजींप्रमाणें मशारनिल्हेकडे तळें जागासुद्धां चालवणें, अडथळा न करणें ह्मणोन छ. २२ जिल्काद. सनद १.

रसानगीयादी.

मुतालिक ह्यांचे रोजकिर्दीपैकीं.

१०४८ (१२)—मनोळी व सतगिरें या दोन्हींच्या दरम्यान सहा कोस पाणी नव्हतें, याजकरितां तुह्मांकडील रामचंद्र महादेव परांजपे यांणीं पैका खर्च करून विहीर बांधोन अरण्यांत पाणी उत्पन्न केलें, तेथें पांथिक येईल, राहील; त्यास वस्ती पाहिजे याजकरितां प्यादे नेहमीं ठेऊन वस्ती करावी लागल्ये, त्यास स्वामीनीं कृपाळू होऊन वसाहतीबद्दल जमीन नूतन देविली पाहिजे ह्मणोन, सदाशिव कृष्ण यांणीं विनंती केली; त्याजवरून बेगमीबद्दल सालमजकुरापासून जमीन. बिघे.

समान सबैन मया व अलफ मोहरम १८

१२० परगणे मुरगोडपैकीं विहिरीनजीक चिगर २ एकूण. बिघे.

६० मौजे मदलूरपैकीं चिगर १ बिघे.

६० मौजे श्रीरंगपूरपैकीं चिगर १

एकूण. बिघे.

१२० २

८० मौजे चिंचपूर, तर्फ सिदोगीपैकीं. बिघे.

२००

एकूण दोनशें बिघे जमीन सदरहू तिही गांवपैकीं दूम, सीम प्रतींची देविली असे, तरी नेमून देऊन चालवणें, आकार होईल तो धर्मादाय खर्च लिहीत जाणें, दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें ह्मणोन महिपतराव कृष्ण यांचे नांवें. सनद.

रसानगीयादी.

FROM THE MUTÁLIK'S DIARY.

(1048) There being no water between Manoli and Satgire for a distance of 12 miles, Rámchandra Mahádeo built a well at his own cost between those villages. It became necessary to keep a guard at the place, to protect travellers who might halt there; Sadáshiv Krishna offered to arrange for the guard and was given 200 bighás of land in inám for the purpose.

A. D. 1777-78.

१०४९ (७१५)–आनंदराव मोरेश्वर व सदाशिव यादव उपनाम जावडेकर, गोत्र जामदग्नी, सूत्र अश्वलायन, यांणीं हुजूर कजबें पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, कसबें इंदापूर, परगणे मजकूर, सरकार जुन्नर, सुभे खुनस्ते बुनीयाद, येथें पाण्याचा तोटा, यास्तव आपण तळ्याची इमारत करून गांवास पाण्याची सोय केली, सबब परगणे मजकूरचे कमावीसदारांनीं व जमीदारांनीं आपणांस एक चावर जमीन इनाम देऊन चतु:सीमापूर्वक जाबता करून दिल्हा, तो पाहून स्वामींनीं कृपाळू होऊन सदरहू एक चावर जमीन इनाम देऊन चालविली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणतां गांवास पाण्याचा तोटा, सबब यांणीं कजबे मजकुरीं इमारत तळ्याची करून गांवास पाण्याची सोय केली, हें जाणोन यांजवर कृपाळू होऊन यांस परगणे मजकूरचे कमावीसदारांनीं व जमीदारांनीं एक चावर जमीन इनाम देऊन चतु:सीमापूर्वक जाबता करून दिल्हा, तो पाहून त्याप्रमाणें जमीन चावर.

इसन्ने समानीन मया व अलफ रमजान १५

·।।।१५ थळसमलट पैकीं जमीन.

·।· अव्वल.

·।· दूम.

·।१५ सीम.

·।।।१५

यासी चतु:सीमा पूर्वेस बेड सिगवट.

दक्षणेस थळ पिसाळ.

पश्चमेस थळ पिसाळ इनाम. बाळूभट अडगरे.

उत्तरेस थळ सिगवट.

८१५ तळ्या नजीक गांवकरी यांची जमीन. बिघे.

८४ अव्वल.

८६ दूम.

८५ सीम.

८१५

यासी चतु:सीमा पुर्वेस संभूप्रसाद मलट

दक्षणेस थळ जाधव. माळाचा उत्तरवट.

उत्तरेस कसबे मजकूरचे

(1049) There being scarcity of water at kasbá Indápur, Anandrao Moreshwar and Sadásiv Yádav Jáwdeker built a tank for the public use. He was given one *châhur* of land in inám.

A. D. 1781-82.

पश्चमेस थल जाधव माळाचा उतरवट. गांवकुसास.

१

एकूण एक चावर जमीन अव्वल, दूम, सोम, तिही प्रतीची सदरहू चतुःसीमापूर्वक, स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी, कुलबाब कुलकानु. हल्लीं पट्टी, व पेस्तर पटी, जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधि, निक्षेपसहित खेरीज हक्कदार करून नूतन इनाम सरकारांतून करार करून दिल्ही असे. तरी सदरहू एक चावर जमीन यांचे दुमाला करून देऊन यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें, दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें, या सनदेची प्रती लिहून घेऊन हे अस्सल सनद यांजवळ भोगवटीयास परतोन देणें ह्मणोन सनदापत्रें.

२ फडणिसी.

१ नांवचें.

१ मोकदम कसबे मजकूर.

२

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशाधिकारी, व लेखक वर्तमान व भावी.

१ देशमूख व देशपांडे.

२

४

सनदा व पत्रें चार दिल्हीं असेत.

रसानगी यादी.

१०५८ (८४६)—शिवाजी गोपाळ यांस पत्र कीं, कल्याणाहून वसईस खुष्कीचे मार्गे जातां मनुष्यांस पाणी उन्हाळे दिवशीं नाहीं, याजकरितां मौजे राजावली, तर्फ कामण प्रांत वसई, येथील शिवेंत राजमार्गावर रानांत कोण्हीं नवी विहीर धर्मपरायण बांधिली आहे. तिचें पाणी बहुत चांगलें असतां, कोळी मच्छीमार खाजणांतील येऊन विहिरीत पाय धुतात, व ताडाचें मद्य

अर्बा समानीन मया व अलफ रजब ९

(1050) Jiwáji Gopál represented that a well built for charitable purposes at Rájáwali in tarf Kámaṇ on the road from Kalyáṇ to Bassein contained good drinking water; but

A. D. 1783-84.

काढणार भंडारी भोपळे धुतात, असा उपद्रव होतो. त्याचा बंदोबस्त जाल्यास वाटसरांस निर्मळ पाणी व छाया नवी लावणी झाडांची केली आहे त्याची होईल. याजकरितां हें पत्र सादर केलें असे. तरी प्रांत मजकूरचे नेमणुकेपैकीं एक शिपाई नेमून देऊन विहिरीचे पाण्यास कोण्ही उपद्रव न देत असें करणें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

१०५१ (९६७)—मैराळ भास्कर व निंबाजी भास्कर व यादो भास्कर व लक्ष्मण भास्कर व रामचंद्र भास्कर, गोत्र कौंडिण्य, सूत्र अश्वलायन, यारदी परगणे वण, सरकार संगमनेर, यांणी हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, मौजे राजापूर, परगणे मजकूर, हा गांव मार्गावरील, पाण्याची सोय नाहीं. त्यास गांवानजीक सप्तश्रृंगाचे मार्गावरी प्राचीन गायमुख तीर्थ आहे; त्या तीर्थाचें कुंड बेमरामत होऊन जाया जाहालें, त्यांत पाणी राहात नाहीं, याजमुळें सप्तश्रृंगीचे देवीचे यात्रेकरी यांस, व मार्गींचे आल्यागेल्या लोकांस, व गांवास पाणी मिळत नाहीं. त्या कुंडाचा जीर्णोद्धार करून कुंड बांधावयास आह्मांस सामर्थ्य नाहीं. त्यास तुह्मी कुंडाचे जीर्णोद्धारास जो पयका लागेल तो लाऊन कुंड बांधावें. या खर्चाचे ऐवजीं तुह्मांस मौजे मजकूरपैकीं बागाइत जमीन एकवीस बिघे इनाम करून देऊन भोगवटीयास चतुःसीमापूर्वक पत्र करून देतों, ह्मणोन मोकदम मौजे मजकूर यांणीं सांगितलें, त्यास आह्मीं मान्य होऊन कुंडाचे जिर्णोद्धारास काम लाविलें त्याजवरून मौजे मजकूरचे मोकदम यांणीं मौजे मजकूरपैकीं बागाईत जमीन टिकी दोन एकूण जमीन बिघे ८२१ एकवीस चतुःसीमापूर्वक आपल्यास इनाम देऊन भोगवटियास इनामपत्र करून दिल्हें आहे, त्यास स्वामींनीं कृपाळू होऊन मोकदम याचे सदरहू जमिनीचें इनामपत्र आपल्या जवळ आहे तें पाहून त्याप्रमाणें सरकारांतून जमीन आपणास इनाम करार करून देऊन भोगवटियास इनामपत्रें करून दिल्हीं पाहिजेत म्हणून; त्याजवरून मनास आणितां मौजे मजकुरीं गायमुखाचें कुंड आहे, त्याची बंदिस्त जाया जाहली आहे, कुंडांत पाणी राहात नाहीं, याजमुळें श्री देवीचे यात्रेकरी यांस व आल्यागेल्या लोकांस व गांवास पाणी मिळत नाही. याजकरितां कुंड बांधावयास पैका लागेल तो लाऊन कुंड

समान समानीन मया व अलफ रबिलाखर २७

---

that the water was fouled by fishermen washing their feet in it, and Bhandáries washing their liquor-pots in it. A peon was therefore appointed to prevent the well being fouled.

(1051) Mairál Bháskar and four others, Yardis of pargaṇá Waṇ in Sirkár Sangamner, were granted by the village officers of Rájápur in the said pargaṇá some inám land in consideration of their having repaired, for the use of travellers, a tank on the road to Saptashringa. The grant was confirmed by the Peshwá.

A. D. 1787-88.

बांधावें. त्याचे खर्चाचे ऐवजीं यांस मोकदम यांणीं मौजे मजकूरपैकीं एकवीस बिघे जमीन बागाईत इनाम देऊन, आपलें पत्र करून दिल्हें आहे. तें यांणीं हुजूर आणून दाखविलें. तें पाहून यांचें चालवणें अवश्यक जाणून यांजवरी कृपाळू होऊन मोकदम यांचे पत्राप्रमाणें मौजे मजकूरपैकीं बागाईत पाणी पिती ठिकीं दोन एकूण जमीन बागाईती गजानें बिघे८२१

पूर्वेस नागोजी देशमूख याचा कनीर मळा लगता १ — पश्चमेस कसबे वण येथें जावयाचा रस्ता १

दक्षणेस कृष्णा देवकर याचा मळा. — उत्तरेस पुंजा शेट याचा मळा १

येणेंप्रमाणें एकवीस बिघे जमीन बागाईत सदरहू चतुःसीमापूर्वक स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा, देखील सरदेशमुखी कुलबाब कुलकानू हल्लीं पट्टी व पेस्तर पट्टी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधी, निक्षेपसहित खेरीज हक्कदार करून इनाम तिजाईसुद्धां दरोबस्त सरकारांतून इनाम यांस करार करून दिल्ही असे, तरी गायमुखाचें कुंडाचें काम चांगलें पक्कें करतील, त्यास मौजे मजकूरपैकीं सदरहूप्रमाणें एकवीस बिघे जमीन यांचे दुमाला करून देऊन, यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवणें. दरसाल नवीन सनदेचा उजूर न करणें. या सनदेची प्रती लेहून घेऊन हे अस्सल सनद याजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन. सनदा पत्रें.

३ फडणिसी. सनदा.

१ मैराळ भास्कर, व जिवाजी भास्कर, व यादो भास्कर, व लक्ष्मण भास्कर, व रामचंद्र भास्कर यारदी यांचे नांवांची. सनद.

१ मोकदम मौजे मजकूर यांस.

१ गंगाधर भिकाजी यांस की, अलाहिदा भोगवटियास इनामपत्रें करून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें मौजे मजकूरपैकीं एकवीस बिघे जमीन यांचे दुमाला करून देऊन, आकार होईल तो परगणे मजकूरचे हिशेबीं यांचे नांवें इनामखर्च लिहीत जाणें.

३

२ चिटणिसी. पत्रें.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी, परगणे मजकूर यांस.

१ देशमूख व देशपांडे, परगणे मजकूर यांस.

२

५

एकूण सनदा तीन, व पत्रें दोन मिळोन पांच दिल्हीं असेत.

रसानगी यादी.

११ सार्वजनिक इमारती व लोकोपयोगीं कामें.

(ब) दुसरीं कामें.

१०५२ (७१०)–तुकोजी होळकर यांणीं क्षेत्र पंढरपूर येथें अन्नछत्राचा वाडा बांधावयाकरतां तुळया वगैरे लांकडें रायवळ अडीचशें एकूण ताफे सुमारें पांच पुणियांत खरेदी करून, क्षेत्रमजकुरीं पुणियाचे नदींतून नेतील, त्यास नेऊं देणें. सदरहू लांकडाची जकात यांस माफ केली असे. तरी आकार होईल तो यांचे नांवें माफखर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार जकात प्रांत पुणें जुन्नर यांस. सनद १.

इसन्ने समानीन मया व अलफ सावान १७

रसानगी यादी.

१०५३ (८२९)–बाळाजी महादेव मामलेदार तालुके शिवनेर यांचे नांवें सनद कीं, घाट मालसेज तालुके मजकूर इंग्रजाचे गडबडीमुळें सरकारांतून पाडविला होता, त्याची हल्लीं बंदिस्त करून घाट चालवावयाची आज्ञा तुह्मांस केली असे, तरी घाटाचे बंदिस्तीस खर्च चौकशीनें करून खर्च होईल त्यापैकीं ऐवज दोन हिसे बापूजी गणेश व उधो दादाजी कमावीसदार, जकात प्रांत कल्याणभिंवडी यांजकडून व एक हिसा भिकाजी विश्वनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांजकडून देविला असे, तरी सदरीलप्रमाणें तीन हिसे ऐवज घेणें, बाकी एक हिस्सा ऐवज राहिला, तो तुह्मी लाऊन तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहिणें, मजुरा पडेल ह्मणोन. सनद.

अर्बा समानीन मया व अलफ जिल्हेज १५

रसानगी यादी.

XI Public buildings and works of Public convenience.

(b) Other works.

(1052) Permission was given to Tukoji Holkar to float down free of duty, timber from Poona to Pandharpur by river, for the purpose of a charitable poor house which he intended to build there.

A. D. 1781-82

(1053) The pass of Málsej in tarf Siwner had been destroyed by Government during the war with the English. It was now ordered to be repaired.

A. D. 1783-84.

१०५४ (९९४)–मौजे राजेवाडी, तर्फ करेपठार, प्रांत पुणें, येथील हणमंताचें देवालय जीर्ण झालें आहे, तें व धर्मशाळा नवी बांधावयाकरितां गांवकरी यांणीं अर्ज केला; त्याजवरून देवालय व धर्मशाळा बांधावयाबद्दल मौजे मजकूर येथील सालमजकूरचे ऐवजीं रुपये १५० दीडशें देविले असेत, तरी देऊन देवालय व धर्मशाळा बांधवणें. सदरहू दीडशें रुपये तुह्मांस प्रांत मजकूरचे ऐवजीं मजुरा पडतील ह्मणोन, रामचंद्र नारायण यांचे नांवें. सनद १.

सीत समानीन
मया व अलफ
रमजान २३

रसानगी यादी.

१०५५ (९९९)–मौजे वारी, परगणे कुंभारी, हा गांव तालुके धोडप येथील बेगमीस आहे, त्यास मौजे मजकूरचें गांवकुसूं सालमजकुरीं श्री गंगेस महापूर येऊन कुसास धक्का बसोन तीन बाजूंच्या भिंती वाहून गेल्या, याजकरितां कुसूं घालावयास काम लाविलें आहे, त्याचे खर्चाबद्दल सरकारांतून ऐवज द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन मोकदम मौजे मजकूर यांणीं अर्ज केला, त्याजवरून गांवकुसाचे बंदिस्तीबद्दल एक सालां रुपये १००० एक हजार रुपये देविले असेत, तरी मौजे मजकूरची जमाबंदी सालमजकुरीं होईल, त्यांपैकीं सदरहू एक हजार रुपये देणें ह्मणोन, बाजीराव आपाजी तालुके मजकूर यांचे नांवें छ. ६ जमादिलाखर. सनद १.

समान समानीन
मया व अलफ
जमादिलाखर २९

रसानगीयादी.

१०५६ (१०००)–रामचंद्र कृष्ण यांचे नांवें सनद कीं, तुह्मीं विनंतीपत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट जाहालीं. तालुके मुल्हेर येथील बंदोबस्ताविशीं लिहिलें त्यास. कलमें.

तिसैन
मया व अलफ
राबिलावल २९

(1054) On the application of the villagers of Rájewádi in tarf Karepathár. Rs. 150 were given for the construction of a temple and a Dharmashálá.

A. D. 1785-86.

(1055) The wall round the village of Wári in parganá Kumbbári having been washed away on 3 sides by the flood of the Godávari, Rs. 1000 were given to the villagers out of the Government revenue of the village, for its repair.

A. D. 1787-88.

(1056) The village wall of Thengode being out of repair, the Wáṇis and traders threatened to leave the village. The wall was ordered to be repaired at a cost of Rs. 1000, half being contributed by the villagers and the rest by Government.

A. D. 1789-90.

मौजे ठेंगोडें येथील पेठचें कुसूं जागां जागां पडोन वाटा बहुत जाहल्या, यामुळें वाणी उदमी कुसूं तयार न जाहल्यास मालेगावीं जाणार, त्यास तयार करावयासी एक हजार रुपये अजमासें लागतील. पेठेची जमा तर सात आठशें रुपयेपर्यंत आहे. यास्तव निमे पट्टी व निमे सरकार याप्रमाणें खर्च लाऊन दोहों सालांत तयार करावयाची आज्ञा जाहल्यास करीन, म्हणोन लिहिलें. त्यास पट्टीचा ऐवज निमेवर जाजती साधतां साधेल तो साधून, तो ऐवज व बाकी सरकारचा लाऊन एक हजार रुपयांत कुसूं तयार करून हिशेबीं खर्च लिहिणें. कलम १.

मौजे सावकी, परगणे लोहनेर, येथील बंधारा जीर्ण जाहला, त्यामुळें चार पांच जागां जाया होऊन पाणी जातें. त्याचे डागडोजीची हैगई जाहल्यास दोन हजार रुपयाचा गांव चार पांचशांवर येईल; यास्तव सावकार उभा करून चार पांचशें रुपये लागतील ते लाऊन, त्याचा ऐवज व्याजासुद्धां फिटे तों ऐन जमेपैकीं शंभर रुपये दरसाल रद्‌कर्जी देववावयाची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन लिहिलें, त्यास बंधाऱ्याची डागडोजी चौकशीनें चार पांचशें रुपयेपर्यंत लाऊन परभारें सावकाराकडून करवणें; आणि त्याचा ऐवज सरकारी शिरस्तेयाचे व्याजानें फिटे तोंपर्यंत दरसाल ऐन जमेपैकीं अजी वजा शंभर

पेठ ठेंगोडें येथें चौबुर्जी वाडा बर्वे यांणीं बांधिला आहे, त्यांत कमावीसदार व पेठेचे बंदोबस्ताचे लोक राहतात. वाड्याची डागडोजी नाहीं. यामुळें जाया होतो, त्यास दलालीचा ऐवज पेशजीं वाड्याकडे डागडोजीस होता. अलीकडे सरकार हिशेबीं जमा येतो, त्यांपैकीं पंचवीस रुपये डागडोजीस सालगुदस्तां खर्च केला आहे, ते व पुढें दरसाल पंचवीस रुपये लाऊन डागडोजी करावयाची आज्ञा जाहली पाहिजे. ह्मणोन लिहिलें. त्यास वाड्याचे डागडोजीस सालगुदस्तपासून पंचवीस रुपये लावावयाची नेमणूक केली असे; तरी सालगुदस्त खर्च जाहला आहे ते, व सालमजकुरापासून पंचवीस रुपयेपावेतों खर्च लाऊन, हिशेबी खर्च लिहीत जाणें. कलम १.

हशमी लोकांत लढवाई व स्वारी शिकारीचे उपयोगी आहेत, त्यांस ठेवणुकेचे वेळेस लहान होते त्यामुळे तैनाता कमी पडल्या आहेत. यास्तव त्यांस इजाफा केला पाहिजे. आज्ञा जाहल्यास सैन्यांत संभाळून करीन, ह्मणोन लिहिलें, त्यास इजाफा करावयाजोगे असतील त्यांचा जावता इजाफयासुद्धां तैनातेचा. व ज्यांची कमी करावयाची असेल त्यांचे तैनातेचा, याप्रमाणें दोन जावते पाठवावे. समजोन आज्ञा करणें ते केली जाईल. कलम १.

लोकांचे हिशेबारा तीस हजार रुपये

A dam at Mouze Sáwki in pargaṇa Lohoner useful for irrigation was also ordered to be repaired.

रुपये करून, सावकारास रदकर्जी देत जाणें. कलम १.

शहर मुल्हेर या भोंवतालां चोरट्यांचा उपद्रव बहुत. एक दोन वेळ दरवडे आले ते संभाळिले. त्यास शहरचें कुसूं जुनें पडलें आहे, तें नीट करावयास दोन हजार पावेतों खर्च लागेल, त्यास शहरचे ब्राह्मण व उदमी यांजवर दीड हजार रुपयांची पट्टी केली आहे. वसूल करून काम चालतें करणार येविशीं, व जाजती खर्च लागल्यास सरकारांतून लावावा किंवा गांवगन्ना पट्टी करून घ्यावे, येविशीं आज्ञा जाहली पाहिजे ह्मणोन लिहिलें. त्यास दीड हजारांची पट्टी केली आहे तो ऐवज घेऊन काम करावें, जाजती लागल्यास गांवगन्ना साधून साराच ऐवज हिशेबीं जमा धरून खर्च लिहिणें. कलम १.

देविले ते आले नाहीं ह्मणोन लिहिलें, त्यास ऐवज देविला आहे, वाटणीस कारकून येईल त्याचे गुजारतीनें वाटणी करणें. कलम १.

कुटुंबाचीं माणसें मुल्हेरीस होतीं, तीं हल्लीं नाशिकास ठेविलीं आहेत. त्यास तेथें चौकीस दहा शिपाई ठेविण्याची आज्ञा जाहली पाहिजे, ह्मणोन लिहिलें. त्यास चौकीस ठेवावयास लोक द्यावयाचे नाहीं. कलम १.

एकूण सात कलमें. सदरहू लिहिल्याप्रमाणें करणें ह्मणोन छ. १५ सफर. सनद १.
रसानगी, त्रिंबक नारायण परचुरे, कारकून निसबत दफ्तर.

१०५७ (१०६४)—कृष्णाजी बल्लाळ यांचे नांवें सनद कीं. तुह्मीं विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. मालसेज घाट तालुके शिवनेर येथें आहे, त्यास अवघड जागे होते तेथें जुनी बंदिस्त कोरे दगडांची होती, ती सालमजकुरीं पर्जन्य भारी पडल्यामुळें जागां जागां कोसळून गेली, बैल जावयाचा मार्ग मोडला. नवी बंदिस्त केल्याशिवाय घाट चालून जकातीची आबादानी होत नाहीं, याजकरितां नवी बंदिस्त कोरे दगडाची बांधोन हंगामी घाट चालता केल्यास, वाणी उदमी जाऊन आबादानी करितील. बंदिस्त करावयास पंधरा सोळाशें

सलास तिसैन मया व अलफ रबिलाखर १४

The town wall of Mulher was ordered to be repaired at a cost of Rs. 1500, to be raised by public contribution.

(1057) Krishnáji Ballál represented that owing to heavy rains the Málsej pass had got out of order and was inaccessible: he was directed to repair the pass recovering

A. D. 1792-93

पर्यंत अजमासें रुपये लागतील, त्यास सन अर्बा समानीनांत इंग्रजाचे दंग्यामुळें घाट पडला होता, त्याची बंदिस्त सरकारांतून करून चालता केला, तेव्हां बंदिस्तीस खर्च लागला तो प्रांत कल्याण येथील जकातदार यांजपासून दोन हिस्से व एक हिस्सा प्रांत पुणें येथील जकातदार यांजपासून, व एक हिस्सा तालुके मजकुराकडून नेमून देविला होता, त्याप्रमाणें द्यावयाविशीं आज्ञा जाहल्यास घाटाची बंदिस्त करीन ह्मणोन लिहिलें, तें कळलें; ऐशास घाटबंदिस्तीस प्रांत कल्याणभिंवडी दोन हिस्से, व प्रांत पुणें एक हिस्सा, एकूण तीन हिस्से बंदिस्तीचे खर्चाचे आकारपैकीं ऐवज तुह्मांकडे द्यावयाविशीं सदरहू जकातीकडील कमावीसदारांस अलाहिदा सनदा सादर केल्या आहेत, त्याप्रमाणें यांजपासोन ऐवज घेणें, आणि एक हिस्सा तालुके मजकूरचे हिशेबीं खर्च लिहून मालसेज घाटाची बंदिस्त नौकशीनें कोन्या दगडाची चांगली मजबुदीनें करणें ह्मणोन. सनद १.

जकातदार यांस कीं, तुह्मांकडून ऐवज देविला असे, तरी जकातीचे ऐवजीं पावता करून कबज घेणें ह्मणोन. सनदा २.

१ विसाजी भिकाजी कमावीसदार यांस चौथाई ऐवज देण्याविशीं.

१ बाबूराव हरी कमावीसदार, जकात कल्याणभिंवडी, यांस निमे ऐवज देण्याविशीं.

३

रसानगी, त्रिंबकराव नारायण कारकून, निसबत दफ्तर.

१२ टपाल खातें.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०५८ (३८२)—कलकत्तेकर इंग्रजांकडील वकील हुजूर आहेत, त्यांचीं पत्रें कलकत्यास जावयाचीं, त्यांचा लाखोटा सरकारचे सांडणीस्वाराबरोबर तुह्मांकडे रवाना केला आहे, तरी सांडणीस्वार तुह्मांजवळ बऱ्हाणपुरास येऊन दाखल होतांच आजुरदार कासीदाचा चौकडा करून त्यांजवळ सदरहू लाखोटा देऊन जलदीनें काशींतील इंग्रजांकडे पाठऊन देणें. ह्मणजे ते

सल्लास सबैन मया व अलफ जिल्हेज २९

---

half the cost from the Octroi contractor of parganá Kalyán and Bhiwandi, one-fourth from the contractor of Poona, and one-fourth from the mahal revenue of Shiwaner.

XII Postal Service.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(1058) Letters from the agent at the Huzur of the English colony at Calcuttá had to be sent to Calcuttá. These were sent with a camel-rider in the service of Government to

A. D. 1786-87.

तेथोन कलकत्त्यास पाठऊन सदरहूचा जाबसाल आणिती तोंपर्यंत कासीदाचे चौकडानें काशींतील इंग्रजापाशीं राहून, कलकत्त्याहून सदरहू लाखोट्याचा जाब येईल. तो काशी-तील इंग्रज कासीदाचे चौकड्याजवळ देतील, तो कासीद तुह्मांजवळ घेऊन येतांच हुजूर पाठऊन देणें. कासीदाचा चौकडा काशीस पाठवाल, ते तेथें किती रोजांत गेले, व तेथें किती दिवस कागदाचे जाबाकरितां राहिले, व काशींतून किती रोजांत माघारे तुह्मांजवळ शहरीं आले, याचा दाखला लिहून पाठवणें. वायदेयाची बोली करून जलद जात, व तिकडून येतांना जलद येत तें करणें. कासीदाचा आजुरा पडेल तो हिशेबीं लिहिणें. मजुरा पडेल ह्मणोन, नारो कृष्ण यांचे नांवें छ. १३ सवाल. सनद १.

परवानगी रूबरू.

१०५९ (६३०)–बेलापूर येथील बातमीचा मचवा जाया जाला आहे, त्यास मुंबई-

समानीन मया व अलफ रजब १६

ची बातमी जलद आली पाहिजे, यास्तव नारो विष्णू कारकून तेथें बातमीच्या कामास आहेत, ते सांगतील त्याप्रमाणें सरंजाम देऊन मचवा लौकर तयार करवणें. मचवा तयार न होऊन बातमी लौकर आली नाहीं तरी कार्यास येणार नाहीं ह्मणोन, कृष्णाजी नारायण तालुके बेलापूर यांचे नांवें. सनद १.

रसानगी, भिकाजी गोविंद गोडबोले कारकून, दिंमत चिंतामण हरी दीक्षित.

१०६० (७२८)–नवाब हैदर अलीखान बहादूर यांजकडील बातमी आणावया-

इसन्ने समानीन मया व अलफ जिल्काद १५

करितां बदामीपासून पुणियापावेतों डाक ठेवावयाची तुह्मांस आज्ञा केली असे, तरी डाकेस माणसें असामी ६० साठ परगणे बागलकोट येथील शिरस्तेप्रमाणें ठेऊन त्यांस रोजगरा परगणे मजकूरचे ऐवजीं

Barhánpur and the officer of Barhánpur was ordered to send 4 messengers with them on to the English at Káshi who would forward them to Calcuttá and get a reply. The reply when received by the English at Káshi was to be given to the 4 messengers who were to wait at Káshi till its receipt. The reply on reaching Barhánpur was to be immediately forwarded to the Huzur. The officer of Barhánpur was further directed to induce the messengers to go and return quickly by offers of rewards.

(1059) The boat which carried letters from Bombay to Belápur being out of repair, orders were issued to repair it at once; so that news from Bombay might not be delayed.

A. D. 1779-80.

(1060) Anandráo Bhikáji was directed to arrange for a postal

देत जाणें, मजुरा पडेल ह्मणोन, आनंदराव भिकाजी यांस. सनद १.

परवानगी रूबरू.

१०६१ (८२५)–४६ अजुरा खर्च खेमकर्ण वकील याजकडून दिल्लीहून कासीद जोडी अजुऱ्यानें आली, तिचा करार पंचवीस रोजांनीं पुण्यास पावल्यास पन्नास रुपये द्यावे, त्यास जाजती दोन रोज लागले त्याचे वजा रुपये ४ बाकी अजुरा. रुपये.

अर्बा समानीन
मया व अलफ
सवाल १९

रसानगी यादी.

२३ साहेबराम वलद रामकुवार.

२३ रामचंद्र वलद रतीराम.

———

४६

१३ वैद्यकी व शस्त्रक्रिया.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०६२ (२०२)–वेदमूर्ती राजश्री सदाशिवभट नानल यांणीं श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी यांस औषध दिलें, तेणेंकरून आरोग्य जालें, यास्तव स्वामींनी कृपाळू होऊन यांस मौजे नसरापूर येथें एक चावर जमीन इनाम नेमून द्यावयाविशीं आज्ञा केली; त्याजवरून सदाशिव पंडित सचीव यांस मौजे मजकुरीं एक चावर जमीन चतुःसीमापूर्वक नेमून द्यावयाविशीं पत्र दिल्हें, त्यास मौजे मजकुरीं एक चावर जमीन बवारशी न मिळे, यास्तव एकुणतीस बिघे जमीन मौजे मजकुरीं नेमून देऊन बाकी चावराचे भरतीस गांवगन्ना तर्फ पौनमावळ-पैकीं नेमून देऊन आपलीं पत्रें करून दिल्हीं आहेत. त्याबाबत सरकारांतून करार करून

खमस सबैन
मया व अलफ
रबिलाखर ५

A. D. 1781-82 service from Badami to Poona in order to obtain news about Nawab Haiderali-Khan Bahadur and he was permitted to entertain 60 runners for the purpose.

(1061) Two messengers sent by Khemkarna agent, came from Delhi to Poona in 27 days. The agreement had been to pay them Rs. 50 if they came in 25 days: Rs 4 were cut as they were 2 days over time and they were paid Rs. 46 (that is Rs. 23 each.)

A. D. 1783-84.

XIII Medicine and Surgery.

FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

(1062) Sadáshivbhat Nánal having cured the Satárá Rájá was granted one *chávur* of land in inám at Nasrapur.

A. D. 1774-75.

अलाहिदा भोगवटियास पत्रें करून दिल्हीं आहेत, त्याप्रमाणें तुह्मीं श्रीमंत छत्रपती स्वामी यांस विनंती करून राजपत्रें करून देवणें ह्मणोन, कृष्णराव अनंत, मुक्काम सातारा, यांस छ. ३ रविलाखर. सनद १.

रसानगी यादी.

१०६३ (६२६)–जयशंकर व देवशंकर बिन भवानीशंकर वैद्य गुजराथी, वास्तव्य कसबे नाशिक, यांस मौजे तळेगांव अंजनेर, परगणे नाशिक, येथील मोकासा जगजीवन पवार यांजकडून होता तो व सरकारतर्फेनें जागीर फौजदारी व बाबती सरदेशमुखी एकूण दरोबस्त अंमल देखील घासदाणा व खेरेदी व वेठबेगार कुलबाब कुलकानू, धर्मार्थ गोरगरीबांस औषध देतात, सबब आरोग्यशालेबद्दल पेशर्जी सरकारांतून करार करून दिल्हा, त्याप्रमाणें चालत होता. त्यास उभयतां मृत्य पावले, सबब जयशंकर याचे पुत्र वेदमूर्ति राजश्री विद्याधर वैद्य बिन जयशंकर वैद्य यांजकडे पेशर्जीप्रमाणें मौजे मजकूर येथील दरोबस्त अंमल धर्मार्थ गोरगरीबांस औषध द्यावयास आरोग्यशालेबद्दल करार करून दिल्हा असे; तरी गांव यांजकडे चालऊन, परगणे मजकूर येथील हिशेबीं यांचे नांवें पेशर्जीप्रमाणें ऐवज खर्च लिहित जाणें ह्मणोन, पांडुरंग धोंडोजी कमावीसदार, परगणे मजकूर यांचे नांवें.

समानीन मया व अलफ. जमादिलाखर २६

सनद १.

१०६४ (७२३)–वेदमूर्ति आपाभट वैद्य वाईकर यांजकडून कसबे वाई येथें सरकारांतून रसायणें करविलीं आहेत, त्यास औषधी लावावयाबद्दल जमीन बिघा ८१ एक बिघा जमीन देविली असे, तरी कसबे मजकुरीं वैद्य यांचे घरासमीप पडे अशी सदरहू एक बिघा जमीन नेमून देणें. त्या जमिनींत हे औषधें लावितील, त्यास पुरे असें पाणी पाटाचें दररोज देत जाणें. औषधाचें काम जाल्यावर जमीन माघारे घेणें ह्मणोन, भवानीशंकर हैबतराव यांचे नांवें.

इसन्ने समानीन मया व अलफ. सवाल ७

सनद १.

रसानगी यादी.

(1063) The Government *amal* of the village of Talegaum Anjner in pargaṇá Násik was granted to Jayshankar and Dewashankar bin Bhawánishankar Vaidya Gujaráthi in consideration of their dispensing medicines gratis to the poor. The *amal* was on their deaths continued to Jayshankar's son Vidyádhar Vaidya, to be spent on medicines for the poor.

A. D. 1779-80.

(1064) Apábhaṭ Vaidya of Wái had been ordered to prepare some medicines for the Peshwá. Orders were issued to give him one bighá of land near his house that he might grow medicinal herbs in it, to supply the land with sufficient water, and to take back the land after the medicines had been prepared.

A. D. 1781-82.

१०६५ (१०७५)–वेदमूर्ती भीमाशंकरभट बिन वासुदेवभट वैद्य यांणीं हुजूर येऊन विनंती केली कीं, आपले तीर्थरूप वासुदेवभट वैद्य यांस कसबे संगमनेर, तर्फ मजकूरचे मालांपैकीं वर्षासन दोनशें रुपये पावत होतें, त्यास ते मृत्य पावले, सबब आपले नांवें करार करून देऊन चालविलें पाहिजे ह्मणोन; त्याजवरून मनास आणितां, याचे तीर्थरूपांस वर्षासन गोरगरीबांस औषध द्यावें त्याबद्दल रुपये शंभर व उदर पोषणानिमित्त रुपये शंभर, याप्रमाणें पावत होतें. त्यास ते मृत्य पावले, सबब यांचे नांवें पेशजींप्रमाणें कसबे मजकूरचे मालांपैकीं सालिना रुपये २०० दोनशें करार करून देऊन हे सनद सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें दोनशें रुपये वर्षासन कसबे मजकूरपैकीं पाववीत जाणें. दरसाल ताजे सनदेचा आक्षेप न करणें. या सनदेची प्रती लिहून घेऊन हे असल सनद भटजीजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन, कमावीसदार वर्तमान भावी तर्फ हवेली, परगणे संगमनेर, यांचे नांवें.

मलास तिसैन
मया व अलफ
सफर २३

सनद १.

रसानगी याद.

१४ व्यापार व कारखाने.

(अ) पेठ व बाजार बसवणें.

१०६६ (५४८)–कसबे बारशी, परगणे मजकूर, येथें नवी पेठ वसवावयाकरितां भवानराव शामराव यांणीं पेशजीं सरकारचा कौल वाणी उदमी यांस वगैरे सात सालां नेऊन, पेठेची वसाहत केली आहे, त्यास कसबे मजकूरपैकीं पेशजीं पेठेकडे जमीन दिल्ही आहे, त्याशिवाय त्या जमीनीचे लगती दहा बिघे जमीन कसबे मजकूरपैकीं पेठेकडे वसाहतीबद्दल द्यावयाचा करार करून हे सनद सादर केली असे, तरी सदरहूप्रमाणें जमीन पेस्तर सालापासून पेठे-

समान सबैन
मया व अलफ
सफर २६

(1065) Wásudevbhat, a medical practitioner of Sangamner, was granted an allowance of Rs. 200 for dispensing medicines to the poor (Rs. 100 for cost of medicines and Rs. 100 for his maintenance). The allowance was on his death continued to his son Bhimáshankarbhat.

A. D. 1792-93.

XIV Trade and Manufacture.

(A) Establishment of peths and markets.

(1066) A new peth was established at Bársi by Bhawánráo Shámrao, after obtaining from Government a *kowl* in favour of the traders. Ten bighás of land were given as site for the peth in addition to what had previously been given.

A. D. 1777-78.

कडे देणें, दिक्कत न करणें ह्मणोन, मौजे मजकूरचे मोकदमास. सनद १.

सदरहू अन्वयें परगणे मजकूरचे जमीदारास चिटणिसी पत्र १.

२.

१४ व्यापार व कारखाने.

(ब) देशांत येऊन राहणाऱ्या व्यापाऱ्यांस उत्तेजन.

१०६७ (४५ अ)–कसबे सुपें, परगणे मजकूर, येथें जुनीपेठ बुधवार बाजाराची आहे. ते पेठेंतील कुळें नादारीमुळें खराबीस येऊन मुलकावर उठोन गेलीं आहेत, व बाजारही मोडकळीस आला, यास्तव हें अभयपत्र सादर केलें असे, तरी कुळें उठोन गेलीं आहेत त्यांस आणून बाजाराची अमदरफ्ती आबादी करणें. सालमजकुरीं आफ्ती आहे, सबब पाऊसपाणी होई तों बाजाराचे अमदानीकरितां बाजारांत दाणा वगैरे जिन्नस येईल त्यास जकात थळमोड व थळभरीत माफ केलें असें, तरी बाजाराची अमदरफ्ती करून बाजार भरीत जाणें, व कुळें मुलकावर गेलीं आहेत त्यांस आणून पेठेची वसाहत करणें ह्मणून, महाजन व शेट्ये यांचे नांवें. कौल १.

अर्बा सबैन मया व अलफ रबिलावल २२

येविशीं चिटणिसी. पत्रें ४.

१ आनंदराव त्र्यंबक सुभेदार परगणे मजकूर यांस.

१ नारो शिवराम कमावीसदार बाबती साहोत्रा दिंमत पंतसचिव यांस.

१ माधवराव भिकाजी कमावीसदार दिंमत सरलष्कर यांस.

१ येसोजी धोंडदेव कमावीसदार, दिंमत महिपतराव कवडे यांस.

४

पांच पत्रें दिल्हीं असेत छ. ५ जिल्हेज.

रसानगी याद.

(B) Encouragement to traders settling in the country.

(1067) The traders of kasba Supe having in consequence of poverty left the town, and the year being one of scarcity the octroi on imports and exports was remitted.

A. D. 1773-74.

१०६८ (४४४)–छबिलदास गुलाबदास बऱ्हाणपूरकर यांणीं हुजूर विदित केलें

सबा सबैन मया व अलफ रबिलावल २९

कीं, शहर मजकुरीं आपण कापडाचें नवें दुकान घालणार, त्यास दुकानचा हशील बमयतारकसी निमे आपणास माफ करावा, व निमे सरकार घ्यावा म्हणून; त्याजवरून निमे हशील यासी माफ करून हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी शहर मजकुरीं मशारनिल्हे नवें दुकान कापडाचें तारकसीसुद्धां घालतील, त्यास हशिलाचा शिरस्ता असेल त्यापैकीं निमे हशील यासी दरसाल माफ करून, बाकी निमे हशील सरकारांत घेणें म्हणून, नारो कृष्ण यांचे नांवें.
छ. ८ सफर. सनद १.

रसानगी यादी.

१०६९ (१००२)–पोमाजी नाईक व गोविंद नाईक भुके चारण, यांणीं हुजूर

तिसैन मया व अलफ रबिलावल २९

येऊन अर्ज केला कीं, आपल्या तांड्याच्या बेवीस नाईक्या मिळोन बैल अदमासें पंधरा हजार आहेत, त्यांजवर दरएक जागाहून दाणा भरून लष्करांत व मुलकांत खेपा करतों. परंतु भुसाराची जकात कोणीं घेतली नाहीं, त्याजवर पुण्यांत महागाई जाहली तेव्हां गला आणून अमदानी करणें, ह्मणोन सरकारांतून आज्ञा जाहली, त्याजवरून दाणा भरून पुण्यास आलों, त्यास येथील जकातीचे मामलेदार बोलिले कीं, बंदरीं मिठास जाणें ह्मणजे भुसाराची जकात घेणार नाहीं, न गेल्यास घेऊं. याप्रमाणें सांगोन हडपें व रोख ऐवज घेतला आहे, तो माघारा देववून, भुसार दाणा भरून खेपा आणावयाची आज्ञा केली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून गुदस्तां चारण मजकूर यांस कौल पाठवून भुसाराची अमदानी पुण्यांत करविली, सबब जकातीबद्दल हडपें व रोख ऐवज सालगुदस्तां तुह्मीं घेतला असेल तो माघारा देणें; व सालमजकुरीं भुसार दाणा पंधरा हजार बैल भरून खेपा आणावयाच्या(चा) चारण मजकूर यांनीं करार केला, यास्तव एकसालां जकात माफ केली असे, तरी यांजपासून जकात न

(1068) Chabildás Gulábdás of Barhánpur represented that he intended to open a new shop for the sale of cloth and embroidery in the city and prayed that the tax leviable from him might be reduced by half. His request was granted.

A. D. 1776-77.

(**1069**) Pomáji Náik and Govind Náik Bhuke cháraṇs owned 15,000 pack bullocks and used to cary grain to military camps and about the country generally, free of octroi duty. During the previous year on account of high prices, they had been ordered by Government to bring grain to Poona, but the octroi Mámlatdár there threatened to levy duty from them, unless they brought salt from the sea-coast and actually made them deposit articles and cash as security for complying with his order. They complained

A. D. 1789-90.

घेणें ह्मणोन, विसाजी भिकाजी, व चिमणाजी बाबूराव कमावीसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें छ. १२ रबिलावल. सनद १.

रसानगी यादी.

१४ व्यापार व कारखाने.

(क) जलमार्गाचा व्यापार.

१०७० (२)–चिमणाजी गणेश साठे, मौजे केलीये, तर्फ माजगांव, तालुके रत्नागिरी, यांणीं नवीन महागिरी बांधिली; त्यास घरखर्चाबद्दल गला वगैरे जिन्नस हरएक बंदराहून खरेदी करून मौजे मजकुरीं आणतील, त्यास जकातीचा व खुटल्याचा व वेठीचा तगादा न करणें ह्मणोन.

अर्बा सबैन मया व अलफ रजब २

दस्तक १.

१०७१ (८८८)–नरोत्तम जोशी, साकीन बंदर मस्कत, यांची डंगी, भोरशृंगार मंगरुळाहून माल भरून मस्कतास जात असतां, वाटेस तुह्मांकडील आरमाराची गांठ पडोन बेकौली ह्मणोन डंगी तुह्मीं धरून आणिली, त्याजवरील कारार्णी वगैरे माणसें अटकेस ठेऊन माल उसपोन घेतला, त्यास बंदरचे दलाल सरकारचे कौल वसईहून घेऊन सावकाराकडे जलमार्गे व खुष्कीनें रवाना करितात, त्यास दिवसगत लागलीयास, सावकार डंगीची हाकारणी करून निघतात, तेव्हां कोणास ठिकाणीं व मार्गी अथवा ज्या बंदरीं डंगी जाते तेथें कौल पावता होतो, त्यास मध्यें सरकारचे अरमाराची गांठ पडली तरी बंदरांत आलियावर कौल घेतला आहे नाहीं याची चौकशी करून, डंगी दस्त जाल्या अगोदर कौल घेतला असा दाखला पुरल्यास मालसुद्धां डंगी सोडून देतात, अशी चाल आहे. त्यास हल्लीं जोशी मजकूर यांचे डंगीचा कौल वसईहून तेथील बंदरचे दलालानें घेऊन रवाना केला त्याची गांठ पडली

खमस समानीन मया व अलफ रजब १०

---

to Government. The articles and cash deposited were ordered to be restored to them and they were exempted from octroi for one year.

(C) Maritime trade.

(1070) Chimnáji Ganesh Sáthe of Keliye in tarf Májgaum in táluká Ratnágiri having built a new ship was exempted from octroi and other taxes on goods brought in the ship from other ports to his village for house-hold use. His ship was also exempted from liability to forced service.

A. D. 1773-74.

(1071) Narottam Joshi, a merchant of Mascat, was proceeding from Mangrol to Mascat in a boat loaded with merchandize. On the voyage the boat was seized by Anandráo Dhulap,

A. D. 1784-85.

नाहीं, अगोदर हाकारणी करून निघाला, त्यास कौलाची चौकशी करून मालसुद्धां डंगी सोडून द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन मथुरादास गिरधर, दिंमत जोशी मजकूर यांणीं हुजूर विनंती केली; त्याजवरून मनास आणितां जोशी याचे डंगीचा कौल वसईहून तेथील दलालाचे मार्फतीनें जाला, त्यास हंगामी कौल घेऊन जलमार्गें अगर खुष्कीनें रवाना करितात, त्यांची कोणाची गांठ ठिकाणीं व मार्गीं अथवा ज्या बंदरीं डंगी जात्ये तेथें पावेतों, त्यास दर्यांत आरमाराची गांठ पडल्यास डंगीवर कौल नसल्यास धरून आणिल्यावर चौकशी करून धरिल्या अगोदर कौल घेतला असल्यास सोडावयाची चाल पेशजींपासून आहे, त्यास जोशी यांची डंगी धरून आणिल्यावर चौकशी न करितां काराणी वगैरे माणसें अटकेंत ठेऊन माल उसपून घेतला, हें ठीक न केलें. हल्लीं कौलाची तेरीख पाहतां डंगी धरल्याच्या अगोदर कौल घेतला, परंतु पोंहचला नाहीं, आणि हाकारणी करून निघाला. सरकारचे बंदरांत डंगी आल्यावर कौल येऊन पोंहचावा, तों तुह्मीं डंगी धरली. यास्तव जोशी याची डंगी सोडावयाचा करार करून, हे सनद तुह्मांस सादर केली असे, तरी भवानजी गाईकवाड खिजमतगार सरकारांतून पाठविला आहे, त्याचे गुजारतीनें डंगी मालसुद्धां सोडून देणें ह्मणोन, आनंदराव धुळप यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

१४ व्यापार व कारखाने.

(ड) वजनें व मापें.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०७२ (५०९)—मकरंदसिंग लछीराम याजकडे सरकारांतून बटछपाईचें कामकाज प्रांत गंगथडी व खानदेश व बागलाण येथील सांगितलें आहे, त्यास केली मापें व पक्कीं वजनें व कच्चीं वगैरे यांजवर शिक्का मारावयाचे छापे पुणियातील आहेत, त्याप्रमाणें दोन छापे मशारनिल्हेस देणें ह्मणोन, आनंदराव काशी कोतवाल, शहर पुणें, यांचे नांवें छ. १८ सवाल. सनद १.

समान सबैन मया व अलफ सवाल ३०

रसानगी यादी.

---

as it could not produce a permit of Government It was found on inquiry that the necessary permit had been issued but that it had not reached the vessel before it sailed. The vessel was ordered to be released.

(D) Weights and Measures.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(1072) Makarandsing Lachiram was appointed to stamp weights and measures in pránts Gangathadi, Khándesh and Báglán, and the kotwál of Poona, was directed to provide him with 2 stamps of the kind used in Poona.

A. D. 1777-78.

१०७३ (५१०)—प्रांत गंगथडी व खानदेश येथील बटछपाईचें कामकाज सां[illegible]

समान सबैन
मया व अलफ
सवाल ३०

तलें आहे, तरी इमानेंइतबारें वर्तोन कामकाज करून वहिवाटी[illegible] कच्चा हिशेब सरकारांत आणून समजावणें. आकार होईल त्यांपैकी कार्याकारण शिबंदी तुह्मी ठेवाल, ती वाजवीचे रुईची होईल [illegible] जुरा पडेल; बाकी ऐवजाचा भरणा सरकारांत करून जाब घेत जाणे ह्मणोन, मकरंदसिं लछीराम यांचे नांवें छ. २० सवाल. सनद रसानगीयाद.

१०७४ (५११)—महालांनिहाय येथील मापें, कैलीचीं व पक्के कच्चे वजनांचीं,

समान सबैन
मया व अलफ
सवाल ३०

तूप तेलाचीं, लांकडाचीं मापें व गज, यांचें बटछपाईचें काम सरकारांतून मकरंदसिंग लछीराम यांजकडे सांगितलें असे. जेथें महालींहून मापें करून दिल्हीं नसतील, सरकारचे शिक्याखेरीज उणीव मापें असतील त्यांची चौकशी करून. जेथें ज्या मापाची चाल असेल त्याप्रमाणें महालींहून एकेक माप करून घेऊन, त्या फर्मेयाप्रमाणें गांवगन्ना मापें करून देऊन बटछपाई घ्यावी. जेथें महालींहून मापें करून देऊन बटछपाई घेत असतील, तेथें कांहीं घेऊं नये. परंतु, सारे मापांची चौकशी करून, उणें असेल तें ठीक करून द्यावें. तेवढ्याची मात्र बटछपाई घ्यावी. बोभाट गैरवाजवी येऊं देऊं नये. याप्रमाणें करार करून बटछपाई घ्यावयाचा शिरस्ते जाबता अलाहिदा शिक्यानिशीं करून दिल्हा असे, तरी सदरहू करारा प्रमाणें मापांची चौकशी करून, मापें करून देऊन, बटछपाई घेतील त्यांस घेऊं देणें. कोणी वाणी उदमी व रयत वगैरे दिक्कत करील त्यास निक्षून ताकीद करून अंमल बसऊन देणें. मापें महालींहून तुह्मी यांजवळ करून द्याल त्याप्रमाणें ज्या गांवीं लोहार सोनार असतील त्यांजकडून मापांवर छापे करून देवणें ह्मणून, प्रांत गंगथडी व प्रांत खानदेश व बागलाण, देखील सरंजामी व जहागीर किल्ले जात, येथील कमावीसदारांस व सरसुभेदारांस चिटणिसी. पत्रें.

प्रांत गंगथडी.

१ तर्फ हवेली संगमनेर, निसबत त्रिंबक कृष्ण व भगवानजी हरी कमावीसदार.

(1073) Makarand was directed to render a detailed account to Government of his receipts and expenses. He was permitted to entertain reasonable establishment for conducting the duties of his office.

A. D. 1777-78.

(1074) Orders were issued to the kamávisdárs of the above provinces to allow Makarandsing to stamp all weights and measures where no such weights were supplied by the mahál officers. Makarandsing was to examine the

A. D. 1777-78.

१ परगणा वण दिंडोरी, निसबत दिगंबर महादेव.
१ परगणा नाशिक, निसबत पांडुरंग धोंडाजी.
१ परगणा सिन्नर, निसबत शिवराम रघुनाथ.
१ तालुके त्रिंबक, निसबत धोंडो महादेव.
१ तर्फ राहुरी, निसबत बहिरो रघुनाथ.
१ परगणा कुंभारी व संवत्सर कोकमठाण, निसबत आत्माराम रंगनाथ व आत्माराम राजाराम.
१ परगणा कोतूळ, निसबत रामचंद्र प्रल्हाद.
१ परगणा आकोलें, निसबत खंडो बाबूराव व खान कवीजंगबहादर.
१ तालुके पटा, निसबत बाळकृष्ण केशव.
१ तर्फ बेलापूर, निसबत बाळाजी केशव.
१ तर्फ धांदरफळ, निसबत रामचंद्र शिवाजी.
१ तालुके कावनई, निसबत परशराम त्रिंबक.
१ परगणा नेवासें, निसबत रामचंद्र नारायण.

प्रांत खानदेश.

१ शहर बराणपूर, निसबत नारो कृष्ण.
१ परगणे बेटावद, निसबत कृष्णाजी नल्लाळ.
१ तालुके घोडप, निसबत बाजीराव आपाजी.
१ तालुके मुल्हेर, निसबत लक्ष्मण विश्वनाथ.
१ परगणा राजदेहर, निसबत व्यंकटराव बल्लाळ.
१ परगणा भामगड व मुधी, निसबत माधवराव कृष्ण.
१ परगणा बोरनार, निसबत निळो गोपाळ.
१ परगणा चोपडें, निसबत गोपाळराव हरी.
१ तालुके आशेर, निसबत केशवराव जगन्नाथ.
१ परगणा भोकर, निसबत वासुदेव नारायण व लक्ष्मण चांदो.
१ परगणा दहीवेल, निसबत भिकाजी कृष्ण.
१ परगणा पिंपळनेर, निसबत हरी बल्लाळ.
१ परगणा जळोद, निसबत काशी नारायण.
१ कसबें साकोरें, परगणे माणीकपुंज, निसबत चिंतो विठ्ठल.
१ परगणा लोहोनेर, वाखारी, देहुरपालें, निसबत जगदीश व्यंकटेश, व वासुदेव नारायण.

weights and to repair only those which might be found deficient. The new weights and measures were to be in accordance with the standard

१ प्रांत बागलाण, निसबत गोविंद हरी;

१ परगणे जैतापूर.

१ परगणा पिसोल.

१ परगणा तिळवण.

१ परगणा पिंपळे.

१ परगणा कनासी.

१ परगणा कोऱ्हाळी.

६

पत्र.

१ नारो कृष्ण सरसुभा, खानदेश.

१ नरसिंगराव बल्लाळ सरसुभा, प्रांत गंगथडी.

१ सर्वोत्तम शंकर, प्रांत गंगथडी व प्रांत खानदेश व बागलाण येथील महालांविशीं.

१३ तुकोजी होळकर.

१ मशारनिल्हेस.

१ अहिल्याबाई होळकर यांस.

११ कमावीसदारांस वगैरे.

१ परगणा रावेर, व सुलतानपूर, निसबत सिद्धेश्वर विष्णु.

१ परगणा नंदुरबार, निसबत यादवराव रघुनाथ.

१ परगणा गाळणा, निसबत राजाराम काशी.

१ परगणा आंबे, निसबत संताजी होळकर.

१ परगणा आडावद, निसबत केसोजी ढमढेरे.

१ परगणा उत्राण, निसबत बाळाजी नारायण.

१ परगणा थाळनेर, निसबत बाजीराव रामचंद्र.

१ कमावीसदार तर्फ दापूर यांस.

१ कमावीसदार तर्फ कोऱ्हाळें.

१ कमावीसदार फुटगांव, तर्फ बेलापूर यांस.

१ कमावीसदार, परगणा चांदवड.

११

१३

---

weights and measures of the different localities. Makarandsing was authorised to levy certain fees varying from Rs. 1-8 to Rs. 0-0-6 for

४ महादजी शिंदे.

१ मशारनिल्हेस.

कमावीसदारांस.

१ परगणा एदलाबाद, निसबत नानाजी सखदेव.

१ परगणा लोहारें, निसबत भैराळ भिकाजी.

१ परगणा यावल, निसबत कृष्णाजी मल्हार.

४

४ रघुपतराव नारायण राजेबहादूर.

१ मशारनिल्हेस.

३ कमावीसदार, दिंमत मजकूर यांसी.

१ परगणा निंबाईत.

१ परगणा अंमळनेर.

१ फुटगांव तर्फ बेलापूर.

३

४

४ शिवाजी विठ्ठल.

१ मशारनिल्हेस.

३ कमावीसदार, दिंमत मजकूर यांसी.

१ परगणा सोनगीर.

१ परगणा धुळें.

१ परगणा पाटोदें.

३

४

५ सखाराम भगवंत.

१ मशारनिल्हेस.

कमावीसदारांस.

१ परगणा नेर, निसबत नारो महादेव.

---

applying stamped weights and measures. A *nazar* of Rs. 3001 was levied from him.

१ कसबें चोपाले, निसबत दादो भास्कर.
१ परगणा एरंडोल, निसबत रंगो गणेश.
१ परगणा सांडस, निसबत राजाराम खंडो.

५

४ महादाजी निळकंठ.
१ मशारनिल्हेस.
३ कमावीसदार, दिंमत मजकूर यांस.
१ परगणा नसिराबाद.
१ परगणा चिखलवाहाळ.
१ परगणा भडगांव.

३

४

१ आनंदराव भिकाजी रास्ते महाल.
१ परगणा सावदें.
१ परगणा जामनेर.

२

पत्र.

३ खंडेराव त्रिंबक.
१ मशारनिल्हेस.
१ परगणा जैनाबाद कमावीसदारांस.
१ जहागीर किल्ले हतगड निसबत चिंतो काशी यांस.

३

३ माधवराव रामचंद्र.
१ मशारनिल्हेस.
२ कमावीसदार, दिंमत मजकूर यांस.
१ परगणे मेहुणबारें.
१ परगणा झोडगें.

२

३

१ अमृतराव कदम बांडे यांसी महाल.

१ परगणा बारसें.

१ परगणा उमरपाटें.

पत्र.

१ तर्फ राजूर, परगणे आकोलें, निसबत धोंडो महादेव यांस.

४ अमृतराव विश्वनाथ.

१ मशारनिल्हेस.

कमावीसदारांस.

१ परगणा बोदवड, निसबत रघुनाथ गंगाधर.

१ कमावीसदार परगणा म्हसवें. यांसी.

१ कमावीसदार परगणा टोकडें यांस.

४

१ रामचंद्र पवार यासी परगणा बहाळ येविशीं.

१ बळवंतराव धोंडदेव यासी परगणा चादसर येविशीं.

१ गुलजारखान टोके, परगणा डांगरी.

---

८५ (८३)

छ. १५ रमजान. पंचायर्शी पत्रें दिलीं असेत.

प्रांत गंगथडी व बागलाण व खानदेश, देखील सरंजामी महाल व जहागीर किल्लेजात, येथील मापें कैलीचीं. व पक्के वजनाचीं. व कच्चे वजनाचीं, व कच्चीं तुपाचीं लांकडाचीं मापें, व तेलाचीं, व गज याचे बटछपाईचें काम सरकारांतून तुह्मांस सांगितलें असे. जेथें महालींहून मापें करून दिल्हीं नसतील, सरकारचे शिक्क्याखेरीज उगीच मापें असतील, त्यांची चौकशी तुह्मीं करून, जेथें ज्या मापाची चाल असेल त्याप्रमाणें महालींहून एकेक माप करून घेऊन त्या फर्म्याप्रमाणें गावगन्ना मापें करून देऊन, बटछपाई घ्यावी. जेथें महालींहून मापें शिक्क्याचीं करून देऊन बटछपाई घेत असतील तेथें कांहीं घेऊं नये. परंतु खरे मापांची चौकशी करून, उणें असेल तें ठीक करून देऊन, तेवढ्याची मात्र बटछपाई घ्यावी. याप्रमाणें करार करून बटछपाई घ्यावयाचा शिरस्ता जाबता अलाहिदा करून दिल्हा असे. तरी इमानें इतबारें वर्तोन सदरहूप्रमाणें मापांची चौकशी करून मापें करून देऊन बटछपाई घेणें येविशीं. कलमें.

तीन प्रांतांचे मापांची बटछपाई सांगोन नजरेचा मक्ता ३००१ रुपये.

यासी मुदती.

१००० कार्तिक अखेर.

१००० पौष अखेर.

१००१ वैशाख मास.

५०० शुद्ध पौर्णिमा.

५०१ अखेर वैशाख.

१००१

३००१

एकूण तीन हजार एक रुपया करार केला असे. सदरहू मुदतीप्रमाणें भरणा करून जाब घेणें. कलम १.

महालानिहायचे मापांची चौकशी करून हुजूर येईतोंपर्यंत घालमेल करूं नये, ह्मणून तुमची विनंति. त्यास सरकारचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावी. वाणी उदमी वगैरे रयतीचा बोभाट गैरवाजवी येऊं देऊं नये. उदमी यांचे राजीरजावदीनें कराराप्रमाणें बटछपाई घेणें. जाजती उपद्रव लाविल्यास कार्यास येणार नाहीं. आज्ञेप्रमाणें एकनिष्ठेनें वर्तणूक केल्यास घालमेल होणार नाहीं. कलम १.

वाणी, उदमी व रयत वगैरे कोणी [illegible] करील त्यास निक्षून ताकीद करून. अमल बसऊन देणें ह्मणून, कमावीसदारास अलाहिदा सरकारचीं पत्रें सादर केलीं आहेत. त्याप्रमाणें ते अंमल बसऊन देतील. जे कमावीसदार तुमचा अंमल बसऊं न देई त्या महालाचे वाणी उदमी वगैरे यांचा अजमास करून तेथील बटछपाईचा ऐवज होईल तो हुजूर समजावणें. कमावीसदारांस सरकारांतून ताकीद करून ऐवज देविला जाईल, येणेंप्रमाणें करार. कलम १.

एकूण तीन कलमें करार करून दिल्हीं असेत. सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणून. मकरंदसिंग लछीराम यांचे नांवें. छ. १५ रमजान. सनद १.

रसानगी यादी.

सदरहू बटछपाई घ्यावयाचा शिरस्तेजाबता शिक्यानिशीं अलाहिदा येणेंप्रमाणें.

कैली मापांस रुपये.	पक्के वजनांस.
१।- अधोली.	१।- पांसेरीस.
॥। शेर.	१ अडीचशेरीस.

·। निठवें.
।≡ चिपटें.
·।। अदपाई.

२॥≡॥

कच्चे वजनांस

·॥ ॥ पांसेरीस.
॥· अडीचशेरीस.
।· सव्वाशेरीस.
गुळाचे मणास महालचालीप्रमाणें द्यावें.

·।≡।

अदगजास ·॥· रुपये.

१ दुशेरीस.
·॥· शेरास.
·।· अदशेरास.
८= पावशेरास.
८- अदपावास.
१॥ धडी सव्वामणाची.

·॥।·

तुपाचीं कच्चीं लांकडाचीं मापें व तेलाचीं मापें.

।· शेरास.
८= अदशेरास.
८- पावशेरास.
८॥ अदपावास.

·।≡॥·

एकूण केली पांच मापांचे अडीच रुपये साडेतीन आणे, व पक्के आटा वजनांचे पावणेसाहा रुपये, व कच्चीं वजनें चार पैकीं तीन वजनांचा सव्वा रुपया अडीच आणे, व गुळाचे मणास महालचालीप्रमाणें द्यावें; व कच्चीं मापें तूप तेलाचीं चार याचे साडेसात आणे, व अदगजास निमे रुपयाप्रमाणें बटछपाई द्यावयाचा शिरस्ता करून दिल्हा असे.

१०७५ (५३४)—विसाजी नारायण यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे पालें खुर्द पैकीं पेठ पालें, प्रांत खानदेश, येथें आपल्यास एक चाहूर जमीन जिगइती इनाम करार करून देऊन दुमाला केली. त्याचा भोगवटाही चालत असतां, हल्लीं वासुदेव नारायण व जगदीश वेंकटेश कोणते काठीनें मोजून द्यावी याचें सनदेंत लिहिलें नाहीं, ह्मणोन आक्षेप करितात. त्यास येविशीं ताकीद जाली पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र तुह्मांस सादर केलें असे, तरी पांच हात पांच मुठीचे काठीनें जमीन मोजून देऊन चतुःसीमा गांवकरी यांणीं करून दिल्ही आहे, त्याप्रमाणें पेशजींचे सनदेबरहुकूम भोगवटा चालत आल्याप्रमाणें चालविणें. नवीन दिकत न करणें ह्मणोन, वासुदेव नारायण व जगदीश वेंकटेश कमावीसदार, परगणे ओतुरपालें, यांचे नांवें. छ. १० जिल्काद. चिटणेसी. पत्र १.

समान सबैन मया व अलफ सफर २६

(1075) Visáji Náráyan had been given one *Chāhur* of land in mauze Pále in pargana Peth Pále in prānt Khándesh. A question having arisen as to the measure to be used in marking out the land, it was ordered that the rod, five cubits and five hands in length, should be used.

A. D. 1777-78

१४ व्यापार व कारखाने.

(ई) किरकोळ.

१०७६ ( )–कसबे जालनापूर, परगणे मजकूर, येथें जर सनगांस लावावयास तयार करितात येविशीं वगैरे. कलमें.

शीत तिसैन मया व अलफ जिल्हेज २२

पागोटें बारा पंधरा हात लांबीचें करितात हें चांगलें नाहीं. तरी तिसा हातांखालीं पागोटें करूं नये, याप्रमाणें कारीगार यांस ताकीद करून तीस हात पागोटें लांब करवीत जाणें.

कलम १.

चांदवड रुपया आटून जर तयार करितात ती वाईट निघत्ये, यास्तव पेशजींपासून मल्हारशाई व इंग्रजी व सुरती व पटणी रुपया आटून जर तयार करीत होते, त्याप्रमाणें करवीत जाणें.

कलम १.

केळीचा खार रेशमास लावितात, याजमुळें जर काळी पडत्ये, याजकरितां कारीगारांस ताकीद करून दात्याखार रेशमास लाववीत जाणें. कलम १.

एकूण तीन कलमें लिहिलीं असेत, तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें कारीगार व दुकानदार यांस ताकीद करून करवीत जाणें. चांदवड रुपया आटून जर केला, व केळीचा खार रेशमास लाविला, व बारा पंधरा हात पागोटें लांब केल्यास पारपत्य करून गुन्हेगारी घेऊन परगणे मजकूर येथील हिशेबीं जमा करणें म्हणोन, वेंकटराव शिवाजी यांचे नांवें.

सनद १.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे
कारकून, निसबत दफ्तर.

XIV Trade and Manufacture.

(E) Miscellaneous.

(1076) The manufacturers of turbans in kasbe Jálnápur were directed to make each turban 30 cubits long and not 12 or 15 cubits as they had been in the habit of doing and to prepare the brocade used for turbans, by melting rupees, of the Malhárshai, English, Surati, or Patani currency, and not of the Chándvad currency.

A. D. 1795-96

१०७७ (११३३)–कसबे पैठण, परगणे मजकूर, येथें जर सनगांस लावावयास तयार करितात यविशीं वगैरे. कलमें.

सीत तिसैन
मया व अलफ
जिल्हेज २२

वांदवड रुपया आटून जर तयार करितात ती वाईट निघते. याम्तव पेशजींपासून मल्हारशाई व इंग्रजी व सुरती व पटणी रुपया आटून जर तयार करीत होते त्याप्रमाणें करवीत जाणें. कलम १.

नवी पुतळी आटून जर तयार करितात ती वाईट, याजकरितां जुनी पुतळी आटून जर करवीत जाणे. कलम १.

केळीचा खार रेशमास लावितात, याजमुळें जर काळी पडत्ये. याजकरितां कारीगारांस ताकीद करून दात्या खार रेशमास लाववीत जाणे. कलम १.

एकूण तीन कलमें लिहिलीं असेत. तरी सदरहू लिहिल्याप्रमाणें कारीगार व दुकानदार यांस ताकीद करवीत जाणें. नवी पुतळी व चांदवड रुपया आटून जर केल्यास, व केळीचा खार रेशमास लाविल्यास, पारपत्य करून गुन्हेगारी घेऊन परगणे मजकूरचे हिशेबीं जमा करीत जाणें म्हणोन, लक्ष्मणराव नागनाथ याचे नांवें. सनद १.

रसानगी, त्रिंबकराव नारायण परचुरे
कारकून, निसबत दफ्तर.

१५ टांकसाळी व नाणीं.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०७८ (३१८)–धारवाडी रुपयास व चांदीस चार गुंजा जळीचा शिरस्ता पेशजीचा आहे. त्यास हल्लीं सदर रुपयाची चौकशी हुजूर मनास आणतां, दर रुपयास साडे चार पांच गुंजा जळ आली. हे गोष्ट परिछिन्न कार्याची नाहीं. या उपरांत टंकसाळे नर्म आणून पारपत्य चांगलें

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २०

(1077) Similar orders were issued to the manufacturers of Paithan.
A. D. 1795-96.

XV Mints and Coins

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(1078) The Dhárwár and Jamkhindi rupees were tested at the Hazur and it was found that loss in minting, which ought to be 4 *gunjis* per rupee, came to from 4½ to 5 *gunjis* in the case of the former and from 5½ to 6 gunjis in the case of the latter rupee. Orders were issued to the officers of the places to warn

A. D. 1776-77.

करून, सदरहू जळीचे रुपये पाडिले असतील त्याचा तोटा, व गुन्हेगारी टंकसाळे यांजपासून घेऊन तालुके धारवाड येथील हिशेबीं जमा धरणें; व यापुढें रुपया पेशजींचे करारापेक्षां चांगला माल, खरा पाडावयाची ताकीद निक्षून करणें. याउपरीं असें जाल्यास टंकसाळे हुजूर आणून पारिपत्य केलें जाईल ह्मणोन, वेंकटराव नारायण यांचे नांवें. छ. ११ जमादिलाखर. सनद १.

परवानगी रूबरू.

जमखिंडी रुपयास व चांदीस चार गुंजा निदान जळ जावी. याप्रमाणें पेशजींचा शिरस्ता आहे, त्यास हल्लीं सदरहू रुपयाची चौकशी हुजूर मनास आणतां, दर रुपयास साडे पांच, सहा गुंजा जळ आली. ऐसीयास तुमचे चौकशीस चार गुंजांस कमीच जळ जावी, ते साडे पांच, सहा गुंजा जळ दर रुपयास येते हे गोष्टी ठीक नव्हे, तरी जमखिंडींतील टंकसाळे तुह्मीं आणून चांगलें पारिपत्य करून, मागील जळीचा तोटा भरून घेणें, व गुन्हेगारी घेणें; व पुढें चांगला पेशजींचे शिरस्तेप्रमाणें माल, खरा रुपया पाडावयाची ताकीद करणें. या उपरी खोटा रुपया पडिल्यास टंकसाळे हुजूर आणून पारिपत्य केलें जाईल ह्मणोन, पांडुरंगराव गोविंद यांचे नांवें. छ. ११ जमादिलाखर. सनद.

परवानगी रूबरू.

१०७९ (५६३)–गुजारत भास्कर महादेव व मल्हार मुकुंद.

समान समानीन
मया व अलफ
जमादिलावल ८

जमा. रुपये.

५१०४।।≈ मोहरा नाणें.

२३५४।।≈ दिल्ली शिक्का नाणें सुमार १६१ दर १४।।≈ प्रमाणें. रुपये.

२७५० पंचमेळ नाणें.

४३ सुरती.
७४ औरंगाबादी.
३४ बनारसी.
१० कुरा ज्याहानाबाद.

---

the mint owners to prevent such excess occurring in future and to inform them that any malpractice on their part would be duly punished.

(1079) The different kinds of Mohor are stated to be as follows:—
A. D. 1777-78. 1 Delhi at Rs. 14–10.

४ मछलीबंदर.
६ पटणी.
१४ लाहुरी.
१५ बराणपुरी.

२००
दर १२॥। प्रमाणें रुपये.

५१०४॥=

६४५६॥।=॥ पुतळी तारें १४०५ एकूण वजन तोळे इंग्रजी रुपये भार ४१८॥, दर १५।=॥· प्रमाणें एकूण बारमासी तोळे ३९७॥=॥ दर १६८≡॥। प्रमाणें. रुपये.

६४५४ ऐन मुंबई इंग्रजी रुपये भार. तोळे ४१८॥ एकूण दर १३॥।= प्रमाणें.

२॥।=॥ कसर बारमासी तोळ्यावर दर बसवितां वाढली ते.

६४५६॥।=॥

१६९४।≡॥। इस्संबोल मुमार ४०८ एकूण रुपये वजन तोळे इंग्रजी रुपये भार १२२८५ दर १३॥।= प्रमाणें. रुपये.

२९९३॥≡ कडीं सोन्याचीं मुमार ७१ एकूण वजन इंग्रजी रुपये भार तोळे ११५॥।·॥, दर १३॥।= प्रमाणें, एकूण बारमासी वजन तोळे २०५८१८॥· दर १४॥=॥ प्रमाणें. रुपये.

१६२४९॥≡।
तपशील.

---

1 Surati.
1 Aurangábádi
1 Banárasi.
1 Kurá Jyáhánábád.
1 Machhli Bandar.
1 Patani.
1 Láhuri.
1 Barañpoori.

} at Rs 13-12

१६२४६॥।-॥। ऐन.

२॥।=॥ कसर बारमासी तोळ्याचे दरामुळें.

१६२४९॥=।-

१०८० (७८९)-दुलभशेट गोविंदजी व गोविंद पांडुरंग यांचे नांवें सनद कीं, कोंकण प्रांतीं सरकार तालुक्यांत खुर्दाच्या टंकसाळा घालावयाविशीं तुह्मीं विनंति केली; त्याजवरून तुह्मांस आज्ञा केली असे, तरी टंकसाळा सरकार तालुक्यांत घालून खुर्दा चौकशीनें पाडणें येविशीं.

सलास समानीन मया व अलफ. रविलाखर २५

कलमें.

खुर्दा पाडावयाकरितां तांबें मुंबई वगैरे बंदरीं इकडून गलबतें रिकामीं नेऊन, तांबें मात्र खरेदी करून आणावें; दुसरा जिन्नस आणूं नये व नेऊं नये. तांबें ज्या ठिकाणीं खरेदी होईल तेथील गलबतांवर भरून आणिल्यास तीं गलबतें रिकामीं जातील, त्यांस अडथळा पडणार नाहीं. कलम १.

बेलापुरास सरकारचा अंमल होता ते समयीं तेथें टंकसाळ घालून तुह्मीं खुर्दा पाडिला तो साष्टीस नेला आहे, तो इकडे आणून विकावा अडथळा पडणार नाहीं. कलम १.

तांब्याचे खरेदीपुरता ऐवज रोकड व हुंड्या मुंबईस जातील, त्यांस दिकत पडणार नाहीं. कलम १.

खुर्दा तयार होईल तो देशांतील व खुर्दा पाडितां तांब्याचा चुरा पडेल तो, व खुर्दा करावयाजोगें तांबें नसेल तें कासार उदमी यांस विकावें, अडथळा पडणार नाहीं. कलम १.

टंकसाळांपुरतें लोखंड वगैरे सामान मुंबईहून खरेदी करून आणावें, व जाजती आणूं नये. कलम १.

तांबें येईल त्याची जकात, जलमार्गाची व खुष्कीची, पेशजीं पनवेलीस टंकसाळ होती, तेसमयींचे शिरस्तेप्रमाणें जकातदार घेतील; जाजती उपसर्ग लागणार नाहीं. कलम १.

टंकसाळांचें काम चालीस लागल्यापासून तागाईत पेस्तर सन आर्बा अखेर सालपर्यंत चालवावें; पुढें आज्ञेशिवाय करूं नये. कलम १.

(1080) Dulabhshet Govindji and Govind Pándurang were permitted to open mints for the manufacture of copper coin in Konkan. The following instructions were issued to them:—

A. D. 1782-83.

(1) they were to pay a *nazar* of Rs. 12,001. for the privilege: no other person was to be allowed to open mints for coining copper, till the end of the year A. D. 1783-84:

(2) copper required for the purpose should be brought from Bombay or other ports:

कोंकणांतील उदमी खरेदी करून हरएक जागां नेतील, त्यांस अडथळा पडणार नाहीं. कलम १.

अलीबागेहून व इंग्रजाचे तालुक्यांतून खुर्दा हिकडे येऊं देऊं नये. कोणी आणील त्यापासून गुन्हेगारी घ्यावी. कलम १.

टंकसाळसंमंधें तुह्मांपासून नजर १२००१ रुपये बारा हजार एक रुपया घ्यावयाचा करार केला असे, तरी चैत्र शुद्ध पंचमीस सदरहू एवजाचा भरणा सरकारांत करून, पावलीयाचा जाब घेणें. कलम १.

खुर्दा पाडावयाचा शिरस्ता इंग्रजी वजनानें. मासे.

९। शिवराई पैसा सव्वा नऊ मासे.
१३॥। अलमगिरी पैसा पावणेचौदा मासे.
१८॥ ढबु पैसा साडे अठरा मासे.

———

४१॥

सदरहूप्रमाणें खुर्दा पाडावा; कमी वजनास करूं नये. कलम १.

बंदी मोकळी जाहालीयावर इंग्रजाचे मुलकांतील खुर्दा हिकडे येऊं लागल्यास, मुदतीपर्यंत ताकीद केली जाईल. कलम १.

टंकसाळांसंमंधें नजर तुह्मांपासून सरकारांत घ्यावयाची करार केली, सबब कोंकणांत व वरघाटीं पेस्तर सन अर्बा अखेर सालपर्यंत नवी टंकसाळ होणार नाहीं. बंदी असतां तांबें आणून एक सालां चालवीत असतील, त्यांस ताकीद करून बंद केल्या जातील. कलम १.

गडबडीमुळें टंकसाळांचें काम बंद जाहालें, तरी तितके रोज चौकशी करून मुदतीपुढें मजुरा दिल्हे जातील. कलम १.

तुह्मांपासून नजर घेऊन टंकसाळांचें काम सांगितलें, त्यास दुसरा कोणी चढ देऊं लागल्यास सरकारांत ऐकणार नाहीं; व जाजती चढ तुह्मांवर मुदतीपर्यंत पडणार नाहीं. करारप्रमाणें निभावणी केली जाईल. कलम १.

हरएक जागां सरकार तालुक्यांत टंकसाळा घालावयाची सोय असेल तेथें टंकसाळा घालणें. नजरपट्टी व हरएकविशीं मामलेदार उपसर्ग करूं लागल्यास ताकीद केली जाईल; व इंग्रजाकडे सरकारचे तालुक गेले आहेत, ते सरकारांत आल्यावर तेथें कमावीसदार सरकारातून जातील, त्यांस पत्रें लागतील तीं दिल्हीं जातील. कलम १.

(3) copper coin should not be allowed to be brought into Government territory from Alibág and from the tálukás of the English: any person acting in contravention of the rule should be punished with fine;

(4) the coins to be struck should be of the following English weights;

(a) Shivrai paisá, 9¼ *másás*.
(b) Alamgiri paisá, 13¾ *másás*.
(c) Dhabu paisá, 18½ *másás*.

एकूण सोळा कलमें करार करून दिल्हीं असेत, तरी सदरहूप्रमाणें वर्तणूक करणें ह्मणोन.
सनद १.
रसानगी यादी.

१६ सरकारनें घेतलेलें कर्ज.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०८१ (६४)—तुह्मांपासून सालगुदस्त सन अर्बा सबैनांत छ. १८ रविलावली वैशाख वद्य पंचमी शके १६९६ जयनामसंवत्सरेचे मितीनें सरकारांत घेतलें कर्ज रुपये २,००,००० दोन लक्ष, यास व्याज दरमहा दरसदे रुपये एकोत्रा बिन सूट प्रमाणें चहूं महिन्यांनीं द्यावयाचा करार केला असे, मुदतीस व्याज मुद्दल हिशेब करून दिला जाईल ह्मणोन, आनंदराव भिकाजी यांचे नांवें लिहून दिलें. छ. रविलाखर. खत १.

खमस सबैन
मया व अलफ
जमादिलाखर २९

१७ निरख व मजुरी.

(अ) निरख.

१०८२ (२६३)—तुह्मांकडून तांदूळ कमोदाचे सरकारांत आणविले होते, ते जमा मुदबख कोठीकडे, गुजारत छोटाराम प्यादा. दर रुपयास कैली ८८२॥ अडीच पायली प्रमाणें कैली बारुळे मापें ·॥· दहा मण तांदूळ, असडी, सरकारांत जमा असत ह्मणोन, हरी बल्लाळ कमावीसदार. परगणे पिंपळनेर, यांचे नांवें. जाब १.

सीत सबैन
मया व अलफ
जिल्काद २

१०८३ (३७६)—राघोजी आंगरे, वजारत माहासरखेल, यांजकडे सरंजामास बेगमीस गांव हजार रुपये बेरजेचे, कमाल आकार दरोबस्त कमावीस मुद्दां, तर्फ तळोजें, तालुके नेरळ, पैकीं देविले असेत. तरी नक्की आकार असेल तो, व ऐन जिन्नस जमाबंदी असेल त्याचे बाब, नक्त

सबा सबैन
मया व अलफ
जिल्हेज २४

XVI Government Loans.

FROM NÁRO APÁJI'S DIARY.

(1081) A loan of Rupees 2,00,000 was taken from Anandrao Bhikáji in the preceding year, at interest of one rupee percent per mensem.

A. D. 1774-75

XVII Prices and wages.

(1082) Kamod rice from Pimpalner was sold at 2½ *páylis* per rupee.

A. D. 1775-76.

(1083) Villages valued at Rs. 1000 in tarf Taloje, taluká Neral had been given in saranjám to Rághoji Angria; in calculating their value the assessment in kind was ordered to be valued as follows:—

A. D. 1776-77.

गोडे भातास दरखंडीस रुपये वीस, व खारे भातास दर खंडीस रुपये सोळा, व उडिदांस दर खंडीस रुपये पन्नास, व तूप दर रुपयास पक्के दीड शेर, याप्रमाणें आकार करून गांव नेमून देणें; आणि गाव नेमून द्याल, तेथील सालमजकूरचा वसूल घेतला असेल, तो मशारनिल्हेकडील कमाविसदार यांजकडे देणें ह्मणोन, राघो नारायण व धोंडो महादेव यांचे नांवें.

सनद १.

रसानगी यादी.

१०८४ (४३७)—राघोजी आंगरे, वजारत महासरखेल, यांणीं हत्ती व घोडे खरेदी केले त्यांची किंमत.

सबा सबैन
मया व अलफ
रबिलावल ८

रुपये.

५००० हत्ती नग २ कर्नेल इपटण वकील कलकत्तेदार, याजपासून पुण्यांत घेतले त्यांची किंमत.

१०० घोडी रास १ मौजे कालोस, तर्फ चाकण, प्रांत जुन्नर, येथें त्रिंबक पुंडाजी याजपासून घेतली त्याची किंमत.

५१००

एकूण एकावनशें रुपयांस हत्ती दोन व घोडी एक घेतली, त्यांची जकात मशारनिल्हेस माफ केली असे; तरी जकातीचा आकार होईल तो यांचे नांवें माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमाविसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर यांस.

सनद १.

रसानगी यादी.

१०८५ (६४७)—वेदमूर्ति विश्वनाथभट गणपुले अग्निहोत्री, वस्ती कसबे केळसी, तर्फ मजकूर, तालुके सुवर्णदुर्ग, यांणी हुजूर विदित केलें कीं, विसाजी नारायण व हरभट बिन नारायणभट व जनार्दन नारायण, उपनाम खांबटे, यांचें ठिकाण कसबे मजकुरीं खांबेटवाडी अजमासें बिघा ८१

समानीन
मया व अलफ
जिल्काद १०

Ordinary rice, Rs. 20 per *khandi*.
rice grown in salt-lands, Rs. 16. per *khandi*.
udid, Rs. 50 per *khandi*.
ghi, Re. 1 per 1½ *seers*.

(1084) Two elephants were purchased by Raghoji Angria for Rs. 5000 from Colonel Upton, agent at Poona of the English colony at Calcutta.

A. D. 1776-77.

(1085) A *bigha* of land in kasba Kelsi in tarf Suvarnadurga was sold for Rs. 525.

A. D. 1779-80.

एक आहे, तें त्यांणीं आपल्यास सव्वापांचशें रुपयांस विकत दिलें आहे. तें सरकारांतून इनाम करार करून देऊन चालविलें पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी वेदमूर्ति खांबेटे यांजपासून सदरहू एक बिघा ठिकाण कसबे मजकुरीं खरेदी केलें आहे, त्याची तुह्मीं चतुःसीमापूर्वक मोजणी करून, जमिनीची मोजणी जाबता लिहून हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, मोरो बापूजी, तालुके मजकूर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

अमृतराव विश्वनाथ यांच्या कीर्दीपैकीं.

१०८६ (८७१)—रुपी कळवंतीण नंदुरबार इजला बसावयासी गाडी भाड्याची करून देऊन लष्करांत रवाना करणें ह्मणोन सालगुदस्तां तुम्हांस सनद सादर जाली आहे, त्यास तुह्मीं भाड्याची गाडी करून दिल्ही, त्याचा आकार इस्तकबिल छ. १२ जमादिलाखर सन अर्बा समानीन तागाईत छ. २२ साबान सालमजकूर, एकूण मुशाहिरा रोज ७१, पैकीं वजा एकोणतिशी रोज एक, बाकी रोज ७०, दररोज गाडीचें भाडें गुजारत बाळू चौधरी रुपया १। प्रमाणें रुपये ८७॥ साडे सत्यांशीं रुपये कलवांतीणचे नांवें हिशेबीं खर्च लिहिणें; मजुरा पडतील, ह्मणोन घाशीराम सावळदास कमावीसदार, कोनवाली शहर पुणें, यांचे नांवें छ. १२ मोहरम. सनद १.

खमस समानीन
मया व अलफ
मोहरम १२

रसानगी यादी.

१८. वेठ.

१०८७ (१६)—मौजे कोरेगांव, तर्फ पाबळ, प्रांत जुन्नर. या गांवाकडे कात्रजचे कुरणांतील गवत पुले १३,५०० साडेतेराहजार कापून द्यावयाची सालाबाद नेमणूक आहे, त्यास सालमजकुरीं लष्करचे मुक्काम कोरेगांवीं होऊन गांवची खराबी झाली, सबब एक सालास सदरहू गवत

अर्बा सबैन
मया व अलफ
रमजान २०

FROM AMRUTRAO VISHWANÁTH'S DIARY.

(1086) Rupi a dancing girl was ordered to be sent to the camp. The journey took 70 days and cart-hire was paid at the rate of Rs. 1-4-0 (choudhri) a day.

A. D. 1784-85

XVIII Forced service.

(1087) The village of Koregaom in tarf Pábal was bound to supply labour for cutting 13,500 bundles of grass every year. The village however, having suffered during the current year owing to troops encamping at it, was exempted from the service for that year.

A. D. 1773-74.

कापावयाचें मना केलें असे, तरी गांवास तगादा बेगारीविषयीं न करणें ह्मणोन, शिवराम रघुनाथ यांचे नांवें. छ. १६ रमजान. चिटणिसी. पत्र १.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१०८८ (७०)–दिंमत तोफखाना याजकडील बैल चारणीस मौजे आणें, प्रांत जुन्नर, येथें आहेत, त्यास पावसाळ्याचे निवाऱ्याबद्दल दोनशें खण सालाबाद बांधून द्यावयाची सनद असते. त्यास सालमजकुरीं लावणीचा हंगाम, रयत खराब होईल, याजकरितां एकशें खण बांधोन देविले असे, तरी किरकोळ शेराचीं वगैरे लांकडें लाऊन गवत घालून शिऊन, बेगारीनें निवारा करून देणें ह्मणोन, रघुनाथ हरी, प्रांत जुन्नर, यांचे नांवें. छ. १६ रबिलाखर.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

सनद १.

रसानगी यादी.

१०८९ (१०५)–प्रांत गंगथडी येथील सालाबाद गवत कापून द्यावयाची नेमणूक आहे, त्यास बेगारीमुळें रयतेस उपद्रव लागतो, सबब गवत कापणावळ व गंजीस आणणावळ गुद्धां दर हजारीं रुपये २ प्रमाणें रयतेपासून घ्यावयाचे करार केले असेत, तरी सदरहू शिरस्तेप्रमाणें प्रांतांतील मामलेदारांपासून पैका घेणें. ज्याजती बेगारीविशीं वगैरे उपद्रव न लावणें ह्मणोन.

खमस सबैन मया व अलफ रमजान २९

सनदा.

१ गंगाधर शंकर यांस कीं, दिंमत पागा हुजूर यांस गवताची नेमणूक, पुळे, पागा ठाणें आसी खुर्द येथील गुमार.

५०,००० तर्फ हवेली संगमनेर.
३०,००० तर्फ राहुरी.
२०,००० तर्फ बेलापूर.

१,००,०००

एक लक्ष गवताविशीं सनद.

(1088) It was usual for the villagers of Âṇe in prânt Junnar to construct every year shelters, 200 *khans* in extent, for the bullocks of the artillery, sent there to graze owing to the rains. As the sowing season was at hand and as the employment of the ryots on the said work was undesirable, only 100 *khans* were ordered to be constructed by means of forced labour.

A. D. 1774-75.

(1089) It was usual for the ryots of prânt Gangathaḍi to supply labourers, free of charge, for cutting grass for Government. As this arrangement was found to be a source

A. D. 1774-75.

१ सेखाजी मुळे यांस सनद कीं, तुह्मांकडील पागा मौजे जोखे येथें आहे, तेथील बेगमीस मौजे मजकूरपैकीं गवत, पुले सुमार ७५,००० पाऊण लक्ष, तर्फ हवेली संगमनेर, येथील बेगारीनें कापून द्यावयाची नेमणूक आहे त्याविशीं.

१ गिर्जोजी बर्गे यास कीं, तुह्मांकडील पागा मौजे आसी बुद्रुक, तर्फ हवेली येथें आहे, तेथील बेगमीस तर्फ मजकूर बेगारीनें मौजे मजकूरचे कुरणापैकीं गवत पुले सुमार २५,००० पंचवीस हजारांची नेमणूक आहे त्याविशीं. सनद १.

१ गोविंदराव बारावकर यांस कीं, तुह्मांकडील पागा मौजे देसोंडी येथें आहे, तेथील बेगमीस मौजे मजकूरचें कुरणपैकीं तर्फ राहुरी येथील बेगारीनें पुले सुमार ७५,००० पाऊण लक्षाची नेमणूक आहे त्याविशीं. सनद.

१ निळकंठराव रामचंद्र यांस कीं, तुम्हांकडील पागा कसबे नांदुर येथें आहे, तेथील बेगमीस कसबे मजकूरचे कुरणपैकीं तर्फ राहुरी येथील बेगारीनें गवत पुले सुमार ४०,००० चाळीस हजार नेमणूक आहे त्याविशीं. सनद.

१ नारो आपाजी यांस कीं, तुम्हांकडील खिलार मौजे सांगवी येथें आहेत, तेथील बेगमीस दऱ्याचे डोंगरीहून गवत, तर्फ हवेली संगमनेर येथील बेगारीनें, गवत पुले सुमार १०,००० दहा हजार द्यावयाची नेमणूक आहे त्याविशीं. सनद.

६

रसानगी यादी. छ. ६ रमजान.

१०९० (४४८)—बाबु जोशी गोठणकर यांस मजेरे निवेली, कर्यात मीठगावणें, तालुके विजयदुर्ग, हा गांव इनाम आहे, त्या गांवांत वतनदार घरें तीन आहेत, त्यांपैकीं दोन ब्राह्मणाचीं व कुणबीयाचें एक आहे. त्यास बेगारीचा उपद्रव भारी लागतो, त्याजमुळें कुणबीयाची वसाहत होत नाहीं; आणि भटजींची नुकसानी होत्ये, त्यास मजेरे मजकुरास बेगार माफ केली असे, तरी मौजे करेल येथें बेगारीचें ओझें येईल तें मौजे दांड्यास पोहचवावें, दांडेकरांनीं करेल यास पोहचवावें; याजप्रमाणें दुसरे गांव जवळचे असतील त्यांणीं त्याज-

सबा सबैन मया व अलफ रबिलाखर १

of annoyance to the people, it was ordered that in lieu of forced labour Rs. 2 for each thousand bundles to be cut should be levied from the Mámlatdárs of the province.

(1090) There being only three houses—two Brahmans', one Kunbi's, in the village of Niweli in karyát Mithgavne of táluká Vijayadurga, the Kunbi was much troubled by being called upon to do forced labour. The village, which was alienated to Gothankar, was therefore exempted from liability to supply forced labour,

A. D. 1776-77

प्रमाणें परभारें वोझें पोहोंचवावें; मजरें मजकुरास हजीर बेगारीचा उपद्रव एकंदर लागों न देणें. या कामास सुभाहून कारकून एक मजरें मजकुरास पंधरा दिवस ठेऊन वळवटा पाडून देणें ह्मणोन, गंगाधर गोविंद यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

१०९१ (५२१)—विठ्ठलभट तामनकर, वस्ती मौजे मुटाट, तर्फ खारेपाटण, प्रांत राजापूर, येथें भटजींचें शेत कुणबाव्याचें आहे, त्यास भटजींनीं आपल्या शेतांत अर्धेलीचा कुणबी शेतांत ठेविला आहे, त्यास मौजे मजकूरचा खोत कुणबी यास वेठबिगार घेतो, ह्मणोन हुजूर विदित जालें; त्यास भटजींचें अर्धेलीचें शेत कुणबी करतो, सबब कुणबी वेठबिगार सालमजकुरापासून मना केली असे, तरी वेठबेगार घेत न जाणें म्हणोन, गंगाधर गोविंद यांचे नांवें.

समान सबैन मया व अलफ जिल्हेज १३

सनद १.

रसानगी यादी.

१०९२ (९२१)—मेस्त्र मालीट, वकील कलकत्तेकर इंग्रजाकडील, मुंबईस येऊन तेथून पुणीयास यावयाकरितां त्याजकडील वोझीं आणावयास तालुकेहाय प्रांत कोंकणपैकीं बेगारी. असामी.

सीत समानीन मया व अलफ जमादिलावल २५

५० परगणे बेलापूर, निसबत पांडुरंग रामचंद्र.

१०० तालुके नेरळ, निसबत गोविंद कृष्ण यांजकडून.

१०० तालुके करनाळा, निसबत रामराव अनंत यांजकडून.

२५०

एकूण अडीचशें असामी पुणें पर्यंत देविले. त्यांणीं वोझीं वाटमाथां टाकून पळोन गेले, सबब वोझीं वाटेंत पडलीं ते आणावयास पुणीयाहून मजूरदार करून पाठविले.

---

and the villagers of Karel were directed to carry any load that they might receive right on to Dande, and similar instructions were issued to the villagers of Dande.

(1091) A kunbi rented a field from Vithalbhat Támnankar of Muṭáṭ in tarf Khárepáṭan of prânt Rájapoor. It was represented that the khot of the village required the kunbi to perform forced service. Orders were therefore issued exempting him from such service.

A. D. 1777-78.

(1092) When Mr. Malet the English agent was proceeding from Bombay to Poona, 250 forced labourers from Belápur, Neraḷ and Karnáḷá, were ordered to carry his baggage.

A. D. 1785-86.

त्यास खर्च रुपये १८६। एकशें सव्वाशायशी रुपये जाहाले, ते सदरील तीन तालुक्यांपासून घ्यावयाचा करार करून, हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी वाटणीप्रमाणें सदरहू ऐवज ज्याचा त्याजपासून घेऊन हुजूर पाठवून देणें म्हणोन, जिवाजी गोपाळ सरसुभा, प्रांत कोंकण, यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

१९. गुलाम.

१०९३ (२२)–किल्ले रायगड येथें सरकारच्या कुणबिणी आहेत, त्यांपैकीं राणी व जानकी दोन कुणबिणी पन्नास व पंचावन वर्षें उमरीच्या बहुत दिवस किल्ल्यास आहेत, त्यांस सोड द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी सदरहू दोन कुणबिणी सोडून देणें म्हणोन, गणपतराव कृष्ण यांचे नांवें. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ सवाल २८

रसानगी यादी.

१०९४ (२८)–सतुमी मिर्धा याणें वणजारे यांजपासून पोरें कस २ दोन, एकूण किंमत रुपये १३४, एकशें चवतीस रुपये यांस खरेदी केले, त्यांचे जकातीचा आकार होईल त्यांपैकीं पांच रुपये माफखर्च लिहिणें; बाकी रुपये बद्दल मुशाहिरा लिहून, जकातीचा तगादा न करणें म्हणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार. जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें छ. १३ सवाल. सनद १.

आर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

रसानगी यादी.

१०९५ (२९)–प्रताप मिर्धा याणें कुणबीण कस १ व पोरें कस २ एकूण किंमत

They left the baggage at the top of the ghàuts and ran away. Hired labourers were therefore sent from Poona to bring in the baggage and the charge on this account, viz. Rs. 186-4-0 was ordered to be levied from the three tálukás in question.

XIX Slaves.

(1093) Two female slaves of Government at fort Ráygad, Rani and Jánki, aged 50 and 55 having long served at the fort were ordered to be released.

A. D. 1773-74.

(1094) Satumi Mirdhá purchased 2 boys from Vanjáris for Rs. 134. Of the duty leviable on the sale, Rs. 5 was remitted and the rest was to be debited to him as salary.

A. D. 1773-74.

(1095) Pratáp Mirdhá purchased one female slave and two boys

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३० — रुपये १२५, सवाशें रुपयांस चारणापासून विकत घेतले त्याचे जकातीचा आकार होईल तो बद्दल मुशाहिरा लिहून, जकातीचा तगादा न करणें म्हणोन, भिकाजी विश्वनाथ कमार्वीसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें. छ. १४ सवाल. सनद १.

रसानगी यादी.

१०९६ (३०)—वेदमूर्ति राजश्री धोंडजोशी पंचनदीकर यांणीं चारणापासून पुण्यांत कुणबीण कस १ एक, एकूण किंमत रुपये ७३ त्र्याहात्तर रुपयांस विकत घेतली, तिचे जकातीचा आकार होईल तो यांचे नांवें धर्मादाय खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें. छ. १६ सवाल. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

रसानगी यादी.

१०९७ (३२)—चिमाजी जगथाप, खिजमतगार, याणें आपली कुणबीण पोर्गी कर्जामधें नारायणजी परभू यांस तीस रुपयांस मौजे असर्द, तर्फ सेदोर, येथें विकत दिल्ही, तिचे जकातीचा आकार यास माफ केला असे, तरी तगादा न करणें ह्मणोन, आनंदराव भिकाजी रास्ते यांचे नांवें. छ. २५ सवाल. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

रसानगी यादी.

१०९८ (३४)—कुणबिणी सरकारच्या यांनीं कजबे पुणें येथें कुणबिणी विकत घेतल्या आहेत.

अर्बा सबैन मया व अलफ जिल्काद ३०

१ फुली, निसबत सौभाग्यवती बाई, हिणें.
१ तुळशी, निसबत मातुश्री मगुणाबाई. हिणें.

२

एकूण दोन कुणबिणी रुपये १४० एकशें चाळीस रुपयांस विकत घेतल्या आहेत,

---

A. D. 1773-74. — from a *chāran* for Rs. 125: the duty leviable on the sale was to be debited to him as salary.

(1096) Dhond Joshi Panchnadikar purchased one female slave from a *chāran* for Rs. 73: the duty leviable on the sale was to be debited to him as *dharmādāya*.

A. D. 1773-74.

(1097) Chimáji Jagtáp gave his female slave for Rs. 30 to Náráyanji Parbhu in payment of debt: the duty was remitted.

A. D. 1773-74.

(1098) Two female slaves were purchased by two female slaves of Government for Rs. 140.

A. D. 1773-74.

त्यांचे जकातीचा आकार माफ केला असे, तरी जकातीचा आकार होईल तो माफ खर्च लिहून, जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें. छ. ६ जिल्काद. सनद १.

रसानगी यादी.

१०९९ (५९)–केसो महादेव फडके मृत्यु पावले, त्यांचे उत्तर कार्याबद्दल ब्राह्मणांस द्यावयास शेषाद्रि शास्त्री यांचे स्त्रीजवळून पुण्यांत कुणबीण कस १ एक ऐशी रुपयांस खरेदी केली, त्याचे जकातीचा आकार होईल तो माफ खर्च लिहून, जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार, जकात प्रांत पुणें व जुन्नर, यांचे नांवें. छ. ८ रविलावल. सनद १.

अर्बा सबैन मया व अलफ रविलावल २२

रसानगी यादी.

नारो आपाजीच्या कीर्दीपैकीं.

११०० (७३)–पागा दिंमत शेकोजी मुळे यांचे नांवें सनद कीं, तुह्मांकडील पागेंतील बिबू पोर्गी, जैनी कुणबीण मुसलमानीण इची लेक, ही केंदूरचे मुसलमानास देऊन सालगुदस्त सन अर्बा सबैनांत तुह्मीं लग्न केलें, सबब सोड खर्च लिहिणें ह्मणोन छ. १४ जमादिलावल. सनद १.

खमस सबैन मया व अलफ जमादिलाखर २९

रसानगी यादी.

११०१ (६२७)–त्र्यंबक नारायण अभ्यंकर वस्ती कसबे संगमनेर, परगणा मजकूर, यांणीं हुजूर विदित केलें कीं, आमची कुणबीण तावजी जाधव, वस्ती कसबे मजकूर, याणें राखली, तिची पोरगी एक व पोरगा एक यांचीं लग्नें करावयास मागणी घेतली, त्यास आपण द्राही दिली, परंतु द्राही मोडून पोराचें लग्न केलें, व पोरीची मागणी घातली, येविशीं ताकीद जाली

समानीन मया व अलफ रजब ६

(1099) One female slave was purchased for Rs. 80 to be given to a Brahmin in connection with the obsequies of Keso Mahádeo Fadke.

A. D. 1773-74.

FROM NÁRO APPÁJI'S DIARY.

(1100) A female slave Jaini, Mohomedan by caste, attached to the cavalry under Sakhoji Mule, had a daughte[illegible]. Sakhoji got the daughter married to a Musalman. Order were issued to show her in the accounts as released.

A. D. 1774-75

(1101) Trimbak Náráyan Abhyankar of Sangamner represented that his female slave had been kept by Távaji Jádhava, and that Távaji arranged to secure a bride for the slave's son; that he (Trimbak) publicly protested in the name of Government against the marriage, but it was notwithstanding celebrated, and that

A. D. 1779-80.

पाहिजे ह्मणोन; त्याजवरून हें पत्र सादर केलें असे, तरी वाजवी मनास आणून पोर व पोरगी व कुणबीण यांचे स्वाधीन करणें, आणि ज्यांणीं द्वाही मोडली असेल, त्यांपासून गुन्हेगारी घेऊन सरसुभा प्रांत गंगथडी येथील हिशेबीं जमा करणें ह्मणोन, नरसिंगराव बल्लाळ यांचे नांवें चिटणिसी. पत्र.

११०२ (७७०)—सगुणी कळवंतीण, वस्ती पेठ शुक्रवार शहर पुणें इणें दत्ताजी सावळा दाळिंबकर याजपासून दीडशें रुपयांस चहूं वर्षांची पोर्गी खरेदी केली आहे, तिचे जकातीचा आकार माफ केला असे, तरी आकार होईल तो माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें. सनद १.

सलास समानीन मया व अलफ साबान ११

परवानगी रूबरू.

११०३ (७७१)—फरासीसाजवळ बटकी पुण्यांत गेल्या, सबब त्यांस जातीखेरीज करून किल्ले सिंहगड येथें पाठविल्या आहेत.

सलास समानीन मया व अलफ साबान २१

बटकी. कस.

२ उमी, दिंमत कृष्णाजी लक्ष्मण जोशी.

१ उमी उमर वर्षे ३०

१ पोरगा उमीचा उमर वर्षे ३

———

२

१ साळी, दिंमत दारकी खेत्रीण वस्ती पेठ नारायण उमर वर्षे २२.

———

३

एकूण तीन माणसें पाठविलीं आहेत, यांस किल्ले मजकुरीं अटकेस ठेऊन इमारतीचें

Távaji was also offering the slave's daughter in marriage. The Sarsubhá of Gangathadi was directed to enquire into the matter and if the facts were found to be as represented, to hand over the female slave with her children to Trimbak, and to punish the person who had acted in defiance of the complainant's protest.

(1102) Sakhu, a prostitute in Poona, purchased a girl aged 4 years for Rs. 150. The duty on the purchase was remitted.

A. D. 1782-83

(1103) Three female slaves having had intercourse with Frenchmen in Poona were put out of caste and sent to fort Sinhagad to be employed on building works.

A. D. 1782-83.

वगैरे काम घेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें
सनद १.

रसानगी यादी.

११०४ (८२०)—नारो विश्वनाथ जोगदंड यांणीं आपले तीर्थरूपांचे क्रियेचे दा

अर्बा समानीन
मया व अलफ
सवाल १

नाबद्दल मार्तंड यादव मुजचाटे, वस्ती पेठ शनवार शहर पुणें याज पासून कुणबीण कस १ एक, एकूण किंमत रुपये १०० शंभर रुप यांस खरेदी केली आहे, त्यास सदरहू रुपयांचे जकातीचा आकार होईल तो मशारनिल्हे यांचे नांवें माफ खर्च लिहून जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

११०५ (८५७)—केसो विश्वनाथ टिळक, कारकून निसबत दप्तरी, यांणीं विठोजी

खमस समानीन
मया व अलफ
साबान १६

हेड्या कुणबिणी विकावयास घेऊन आला, त्याजपासून पुण्यांत कुण बीण कस एक, एकूण किंमत रुपये १०० शंभर रुपयांस खरेदी केली आहे, त्याचे जकातीचा आकार होईल तो यांचे नांवें माफखर्च लिहिणें, आणि जकातीचा तगादा न करणें ह्मणोन, भिकाजी विश्वनाथ कमावीसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांचे नांवें. सनद १.

रसानगी याद.

११०६ (८६१)—मैनी कोम विठोजी सोनार, वस्ती कसबे गोरेगांव, प्रांत राजपुरी

खमस समानीन
मया व अलफ
जिल्काद ५

ही विठोजी मजकूर मृत्यु पावल्यावर तेथून पळून पुणेयास येत होती ती गोविंदराव व चिमाजी माणकर मामलेदार, प्रांत मजकूर यांणीं धरून नेऊन कैदेंत ठेविली. पुढें गोविंद जोशी रेवदंडेकर यांस माण कर यांणीं धर्मादायाचे ऐवजांत दिल्ही. तिला त्यांणीं पुणियास आणिली, तेव्हां गणेशशेट सोनार, वस्ती पेठ शनवार, शहर पुणें, याणें जोशीयास शंभर रुपये देऊन धर्मार्थ सोड·

(1104) Nàro Vishwanáth Jogdand purchased a female slave for Rs. 100 to be gifted away at the obsequies of his father. The duty on the purchase was remitted.

A. D. 1783-84.

(1105) Vithoji Hedyá having brought some female slaves for sale at Poona, one of them was sold for Rs. 100.

A. D. 1784-85.

(1106) Maini, a woman of the gold-smith caste, ran away from Goregaum in prant Rájpuri on the death of her husband and was coming to Poona. The Mámlatdârs of the province, Govindráo and Chimáji Máṇkar, arrested her and kept her in custody. They subsequently made her over to one Govind Joshi in

A. D. 1785-86.

विली; आणि आपले आईबापांचे घरीं जाणें ह्मणोन तीस सांगितलें. तें न ऐकतां शहरांत राहून बदकर्मे करीत होती, सबब कैद करून किल्ले चाकण येथें पाठविली असे, तरी किल्ले मजकुरीं स्वारींत ठेऊन, किल्ल्याचे कोठीकडे इजपासून चाकरी घेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, नारायणराव कृष्ण किल्ले मजकूर यांचे नांवें. सनद १.

रसानगी राघो विश्वनाथ गोडबोले, जबानी रावजी शिवाजी कारकून दिंमत गाडदी मुदफकात, निसबत राघो विश्वनाथ.

११०७ (८८४)—मेघी कुणबीण व तिची लेक कृष्णी या दोघी पेशजीं किल्ले सिंहीगड येथें अटकेस ठेवावयास पाठविल्या, त्या सन समान सबैनापावेतों बंदीसच होत्या, त्यांस सन तिसा सबैनांत किल्ले मजकूरचे हिशेबीं जमेस धरून, दारूखान्याचे कोठीकडे कामास लाविल्या, त्यास मेघी म्हातारी साठ सत्तर वर्षांची जाली, तिच्यानें कोठीचें कामकाज करवत नाहीं, व कृष्णी दारूखान्याचें काम करतेवेळेस काठीवरून पडोन कंबर व हात दुखवला, त्याजमुळें अधू जाली. तिच्यानें कोठीचें काम करवत नाहीं, याजकरितां त्या दोघी जणी एक कुणबीण नवी तरणी देऊन सोड मागतात त्यास व उमी कुणबीण इंग्रजांबरोबर गेली सबब पेशजीं हुजूरून पोर्ग्यासुद्धां किल्ले मजकुरीं अटकेस ठेवावयास पाठविली होती तिजला आजार होऊन मयेत जाली, तिचा पोर्गा उमर वर्षे आठांचा आहे तो रोगी, सबब वीस रुपये घेऊन पोर्गा व सदरहू दोघी कुणबिणी सोडावयाची आज्ञा जाली पाहिजे, ह्मणोन तुह्मीं हुजूर विनंती केली; त्याजवरून मेघी व तिची लेक कृष्णी या दोघी बंदिवानपैकीं किल्ले मजकूरचे हिशेबीं सन तिसा सबैनांत जमेस धरून कोठीकडे कामास लाविल्या आहेत, त्यास मेघी म्हातारी तिच्यानें काम होत नाहीं, व कृष्णी किल्ल्यावर सरकारचें दारूखान्याचें काम करते वेळेस इमारतीवरून पडून हात व कंबर दुखवली, सबब दोघी मिळोन एक कुणबीण चाकरीचे उपयोगी देतात, ती घेऊन दोघीस सोडून देणें; व उमी कुणबीण इंग्रजांबरोबर गेली होती सबब तिचा पोर व ती बंदीस किल्ले मजकुरीं होती त्यांपैकीं उमी मयत जाली. तिचा पोर आठां वर्षांचा आहे, त्याचे वीस रुपये कोणी देईल त्यास पोरगा देऊन,

खमस समानीन मया व अलफ जमादिलाखर ७

payment of certain sums due to him in charity; and Govind Joshi brought her to Poona. Ganesh shet Sonár of Shanwár Peth got her released by paying Rs. 100 to Govind Joshi, and told her to go to her parents' house. She, however, led a prostitute's life in the city. She was therefore arrested and sent to be imprisoned in fort Chákan.

(1107) Two female slaves, Meghi and her daughter Krishni, were prisoners at fort Sinhgad. The former was about 60 or 70 years old. The latter while employed on the work of making gunpowder fell down from a plank and became a

A. D. 1784 85.

सदरहू वीस रुपये किल्ले मजकूरचे हिशेबीं जमा करणें ह्मणोन, नारो महादेव मामलेदार किल्ले मजकूर, यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

११०८ (१०८८)—वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री बिन रंगशास्त्री द्रविड, गोत्र शांडिल्य, सूत्र कात्यायन, शाखा कण्व, यांचे नांवें सनद कीं, गुलतरंग खासे चाकरीची बाईको इचा काल श्री काशी क्षेत्रीं जाहला, ते समयीं तिणें आपले ऐवजांत क्षेत्र पंचवटी, कसबे नाशीक, परगणे मजकूर, येथें घर बांधोन, त्यांत ब्राह्मण ठेवावा, त्या ब्राह्मणास मौजे गंगापूर परगणे मजकूर येथें पाऊणशें रुपयांची इनाम जमीन माझे नांवें सरकारांतून दिल्ही आहे ती त्यास द्यावी असा संकल्प केला. ह्मणून गुणसागर खासे चाकरीची बायको हुजूर आली तिणें विनंती केली; व पेशजीं इनामपत्रें गुलतरंग इचे नांवचीं जाहलीं आहेत, त्यांत ज्या ब्राह्मणास जमीन देईल त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवावी असें लिहिलें आहे; त्याजवरून तुह्मीं थोर शिष्ट सत्पात्र गंगातीरीं स्नानसंध्या करून आहां, तुमचें चालविल्यास श्रेयस्कर जाणून, तुह्मांवर कृपाळू होऊन गुलतरंग इचे ऐवजाचे पंचवटींत घर बांधिलें आहे तें तुह्मांस देऊन, मौजे गंगापूरपैकीं इनाम जमीन तिचे नांवें आहे ती सालमजकुरापासून सरकारांतून तुह्मांस इनाम करार करून देऊन, तिचे नांवाचीं इनामपत्रें आहेत तीं तुह्मांस देविलीं असेत, तरी इनामपत्रांप्रमाणें जमीन चतुःसीमापूर्वक तुह्मीं आपले दुमाला करून घेऊन तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम जमीन व घर अनभवून सुखरूप राहणें ह्मणोन. सनद १.

अर्बा तिसैन मया व अलफ रबिलाकर १

येविशीं गंगाधरराव भिकाजी यांस कीं, घर व जमीन यांचे दुमाला करून देऊन चालवणें; आणि गुलतरंग इचे नांवें इनामपत्रें आहेत तीं यांचे स्वाधीन करून जमीनीचा आकार यांचे नांवें इनामखर्च लिहीत जाणें. नवी सनदेचा अक्षेप न करणें. या सनदेची प्रत लिहून घेऊन हे अस्सल सनद यांजवळ भोगवटियास परतोन देणें ह्मणोन. सनद १.

२.

दोन सनदा दिल्या असेत. रसानगी याद.

---

cripple. The women asked for release on condition of their giving one young female slave in their place. The request was granted.

(1108) Gultarang, a woman in the personal service of the Peshwá, died at Benáres. In deference to her last wishes expressed by her to Guṇaságar, another woman in the personal service of the Peshwá, a house was built at Panchawaṭi out of her money and the house as well as her Inám land were gifted to a Brahman.

A. D. 1793-94.

२० धर्मसंबंधीं व सामाजिक.

११०९ (४२)—नारो महादेव कमावीसदार क्षेत्र पंढरपूर, दिमत परशराम रामचंद्र

आर्बा सबैन
मया व अलफ
सफर १८

यांचे नांवें सनद कीं श्रीविठ्ठलदेव वास्तव्य पंढरपूर यांचे अंगावर पाली-चा व सरडयाचा स्पर्श जाहला आहे. तेथील समस्त ब्राह्मणांचे मतें व स्वामींचे मतें देवास महारुद्र करावा, व शांति करावी, सहस्र ब्राह्मणभोजन करावें; यास खर्च पाहतां चारशें रुपये पर्यंत लागतील म्हणोन शिवाजी बावाजी यांस लिहिलें त्यांणीं हुजूर विदित केलें; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी देवास महारुद्र करणें, व शांति करून सहस्रभोजन करणें; सदरहूचा खर्च मजुरा दिल्हा जाईल म्हणोन मशारनिल्हेस. सनद १.

१११० (१३३)—वेदमूर्ति सदाशिव दीक्षित ठकार हे श्रीकृष्णातीरीं माहुलीसंगमीं

आर्बा सबैन
मया व अलफ
मोहरम २७

वाजपेय यज्ञ करीत आहेत, त्यास दीक्षितांकडे साहित्य देविलें त्याविशीं. सनदा.

१ हैबतराव भवानीशंकर यांस कीं प्रांत वाईपैकीं साहित्य सुमार.

१५० कुंभारकाम.

२५ रांजण.
१०० घागरी.
२५ मडकीं जालीं.

१५०

११५० सुतारकाम.

५० पोळपाट.
५० लाटणीं.

XX Religious and Social matters.

(1109) The deity Vithaldeo, at Pandharpur, having been touched by a lizard, the Mahárudra and Shanti ceremonies were, at the suggestion of the local Brahmins and the Swámi, ordered to be performed. 1000 Brahmins were to be fed, and sanction was accorded to the expenditure of Rs. 400 for the purpose.

A. D. 1773-74.

(1110) Sadáshiv Dixit Thakar being about to perform a Vája-peya sacrifice at Mahuli, orders were issued to provide him with earthen pots, wooden furniture &c.

A. D. 1773-74.

१००० मेखा.
  ५० ठाणवया.

११५०

५००० पत्रावळी.

६३००

सहा हजार तीनशे सुमार देणें म्हणोन. सनद.

१ श्रीनिवास शामराव यांस कीं प्रांत कऱ्हाडपैकीं सदरहूप्रमाणें सुमारी ६३०० सहा हजार तीनशे देणें ह्मणोन. सनद.

२

दोन सनदा. रसानगी यादी. सदरहूखेरीज कांहीं बुरुडकामही देणें ह्मणोन दोहीं सनदांत लिहिलें असे.

जनार्दन आपाजीच्या कीर्दीपैकीं.

१११९ (२४२)—लख्या ठाकूर नाशीककर हा श्रीत्रिंबकेश्वराचे देवळांत गेला, यास्तव त्यास अटकाविला आहे, ह्मणोन विदित जाहालें; ऐशास ठाकूर मजकुराकडे गुन्हेगारीबद्दल ऐवज रुपये एक हजार रुपये घेऊन त्यास सोडावयाची आज्ञा केली असे, तरी सदरहू हजार रुपये घेऊन तालुके त्रिंबक येथील हिशेबीं जमा करणें, आणि ठाकूर मजकुरास सोडून देणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें. छ. १५ साबान. सनद १.

सीससबैन मया व अलफ रमजान ३०

परवानगी राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस.

(२४३) लखा ठाकूर नाशीककर हा त्रिंबकेश्वराचे देवालयांत पूजेस जाऊन अभिषेक करूं लागला, सबब त्याजला तुह्मीं किल्ले त्रिंबक येथें अटकेंत ठेविलें आहे, त्यास ठाकूर मजकुरापासून गुन्हेगारीबद्दल एक हजार रुपये घेऊन तालुके त्र्यंबक येथील हिशेबीं जमा धरून लखा ठाकूर यास सोडून देणें, ह्मणोन छ. १५ साबानची सनद तुम्हांस सादर जाली आहे, परंतु, हल्लीं रुपये घ्यावयाचे मना करून त्यास सोडून द्यावयाची आज्ञा केली असे, तरी ठाकूर मजकुरास सोडून देणें ह्मणोन, नारो महादेव यांचे नांवें छ. २४ साबान. सनद १.

FROM JANÁRDAN APPÁJI'S DIARY.

(1111) Lakhá Thàkur of Násik was fined Rs. 1,000 for having entered the temple of Shri Trimbakeshwar: the fine was afterwards remitted.

A. D. 1775-76.

११११२ (२४६)–धोंडो महादेव, तालुके त्रिंबक, यांचे नांवें सनद कीं कजबे त्रिंबक

सीत सबैन मया व अलफ रमजान ३०

येथें देवीस विजयादशमीस टोणग्याची बळ पहिल्यापासून चालत होती, अलीकडे चार पांच वर्षे चालत नाहीं, त्याजमुळें गांवचे लोकांस दृष्टांत होऊन उपद्रव बहुत होतो, त्यास येविशींची आज्ञा होऊन तेथील अंमलदारास सनद देवविली पाहिजे, म्हणून कजबे मजकूरचे समस्त क्षेत्रस्त ब्राह्मणांनीं हुजूर विनंतिपत्र पाठविलें; त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी कजबे मजकूरचे देवीस विजयादशमीचे दिवशीं बळीस टोणगा पांच वर्षांपलीकडे पावत आल्याचा दाखला मनास आणून, पावत आल्याप्रमाणें एक टोणगा दरसाल तालुकेमजकूरपैकीं देत जाणें म्हणोन छ. २८ साबान. परवानगी रूबरू. राजश्री बाळाजी जनार्दन फडणीस. सनद १.

१११३ (२६५)–लछीनाईक भोई, निसबत पांडुरंगराव गोविंद, याणें बायको टा-

सीत सबैन मया व अलफ जिल्हेज २४

किली होती, त्या बाइकोचा बोभाट तुम्हांजवळ आला. तेव्हां त्यास जातींत लाऊन देऊन बाइको याणें वर्तवावी असें पांचांनें विचारें जालें, त्यास तुम्हीं नजरेविशीं तगादा लाऊन बसविला आहे, म्हणोन हुजूर विदित जाल; ऐशास मशारनिल्हेकडील भोई, याजकरितां नजरेच्या ऐवजाचा तगादा न करणें, बसविला असेल त्यास सोडून देणें. म्हणोन धोंडो बाबाजी कोतवाल शहर प्रांत पुणें यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

१११४ (२७८)–विष्णु केशव देसाई तर्फ राजापूर तालुके विजयदुर्ग यांणीं हुजूर

सीतसबैन मया व अलफ सफर ५

विदित केलें कीं विष्णु अनंत घारे याणीं आपल्यावर भुतें घालून मारे केले, त्याजवरून सुभाहून पडथळे नेमून देऊन अमीन दिला, त्याचे विद्यमानें थळीं उभयतांचा निवाडा जाला; उप्रांतीक सुभा गेलों; नंतर

(1112) A buffalo used to be sacrificed to the goddess at Kasbe Trimbak on the Dasarā festival, but the practice had been discontinued for four or five years The Brahmins of the place represented that the people were much troubled in dreams on account of this omission. The officer of Trimbak was therefore directed to re-store the old practice and offer a buffalo in sacrifice every year.

A. D. 1775-76.

(1113) The wife of Lachhi Naik Bhoi in the service of Pándurangráo Govind was deserted by her husband, and she complained to the kotwál. He referred Lachhi to the caste people. The Panch decided that Lachhi should admit his wife into his house. The kotwál asked Lachhi for a *nazar*. The matter having been represented to the Huzur, the kotwál was told not to trouble him for the *nazar*.

A. D. 1775-76.

(1114) Vishnu Anant Ghate of prānt Rajapur being suspected of

महादाजी रघुनाथ यांणीं पंचाइत करून घाटे मजकूर याजकडे भूत लागूं जालें त्याचें पारिपत्य न होय, याजकरितां त्यांणीं सरकारांत विनंतिपत्र लिहून देऊन उभयतांसही हुजूर जाण्याविशीं निरोप दिला; त्यास महादाजी रघुनाथ यांणीं सरकारांत पत्र दिलें तें पाहोन, व सुभांचे सांगितल्यावरून समस्त ब्राह्मणांनीं घाटे यास वाळींत घातलें. त्यावर उभयतां सरकारांत आलें, पंचाइत्या जाहल्या, घाटे खोटे जाहले. त्यास सरकारची शुद्धतेची आज्ञा नसतां, व समस्त ब्राह्मणांस न कळतां, घाटे याणीं रामठाकूर देसाई, तर्फ मजकूर, यांस पुढें करून कांहीं ब्राह्मण धटाईनें जेऊं घातले आहेत, त्यास ज्या ब्राह्मणांनीं त्याचे घरीं अन्नवेवहार केला असेल त्यांस, व घाटे यांस श्रीधूतपापेश्वराचे देवालयीं पंचगव्य देऊन शुद्ध करावयाची आज्ञा जाली पाहिजे म्हणोन; त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे, तरी सुभाचे आज्ञेनें बहिष्कार पेशजीं जाला असल्यास, दिवाणचे आज्ञेविना त्याचे घरीं अन्नव्यवहार ज्या ब्राह्मणांनीं केला असेल, त्यांजपासून दर असामीस पांच रुपये गुन्हेगारी घेऊन, घाट्यास व त्यांस पंचगव्य देऊन शुद्ध करणें म्हणोन, गंगाधर गोविंद याचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सबा सबैन
मया व अलफ
जमादिलावल २

११११५ (३०५) मौजे सायखेडें. परगणे नाशीक, येथील सरदेशमुखीचा अंमल शिवानंद सरस्वती संन्यासी शेणवी यांजकडे पहिलेपासून चालत होता, त्यास यादवराव रघुनाथ यांणीं सरकारांत गैरवाका समजाऊन सरदेशमुखीचे अंमलाची जप्ती करविली होती, त्याची कमावीस तुह्मांकडे सांगितली आहे, त्यास हल्लीं जप्ती मोकळी केली असे; तरी तुह्मीं जप्ती मोकळी करून दस्तलागिरी न करणें. जप्तीमुळें वसूल घेतला असेल तो माघारा देणें ह्मणोन, शिवाजी विठ्ठल यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

१११६ (३४८)–काजी पुणेकर याणें कळवंतिणीचे कुणबिणीची पोर रंगरेजाशीं

A. D. 1775-76.

raising evil spirits against Vishnu Keshav Desái, the matter was investigated by the Subhá and the parties were sent to the **Huzur.** In the meantime, Vishnu Anant was excommunicated by the villagers. He however, in disregard of the excommunication gave a dinner to certain Brahmins. A complaint was made to the Huzur and it was decided that if the order of excommunication was passed at the instance of the Subhá. the persons who had dined should be fined Rs. 5 each.

A. D. 1776-77.

(1115) The Sardeshmukhi *ámal* of Sáyakhed in parganá Násik was held by Shivánand Saraswati, a Sanyáshi of the Shenwi caste.

(1116) The Kázi of Poona being about to solemnize a *Nikà*

सबा सबैन
मया व अलफ
रमजान २९

निका लावण्याचें केलें, तेव्हां कळवंतीण सरकारांत फिर्याद आली कीं, रंगरेजाशीं पोरीचा निका लाऊं नये. त्याजवर काजीस ताकीद केली असतां रंगरेजाबरोबर कळवंतिणीचे पोरीचा निका लाविला, सबब काजी मजकूर याचे वतनाची इनामगांवसुद्धां जमी करून जमीची कमावीस तुह्मांकडे सांगितली असे, तरी कळवंतिणी वगैरे मुसलमान लोकांकडे काजीची दस्तुरी असेल ते, व गांवमळा वगैरे कुल काजीकडून जप्त करून, आकार होईल तो सरकारांत पावता करून जाब घेणें ह्मणोन, पांडुरंग कृष्ण बेडेकर यांचे नांवें. छ. १ रमजान. सनद १.

परवानगी रूबरू.

१११७ (५१६)–रामा कानडा जातीचा ब्राह्मण ह्मणवितो परंतु पुण्यांत गाईंचीं पुच्छें तोडलीं वगैरे उपद्रव केले, प्रायश्चित्त योग्य नव्हे, सबब किल्ले कोहज येथें अटकेस ठेवावयासी बेडीसुद्धां पाठविला आहे, तरी पायांत बेडी घालून पोटास कोरडा शेर देऊन पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेवणें ह्मणोन, भिकाजी गोविंद यांस छ. १२ रमजान. सनद १.

समान सबैन
मया व अलफ
सवाल ३०

रमानगी याद.

१११८ (५१७)–विश्वनाथभट पेठ्ये, वस्ती कसबे कडूस, तर्फ खेड, यांणीं कुणबीण ठेवून बायको नांदविली नाहीं, यास्तव सरकारांतून पत्र पाठवून भटजीस हुजूर आणिलें त्यास येविशीं कलमें बितपशील.

समान सबैन
मया व अलफ
सवाल ३०

A. D. 1776-77.

marriage between the daughter of a slave belonging to a prostitute, and a dyer, the prostitute made a complaint to Government, and the Kázi was directed to refrain from performing the marriage; nevertheless he performed it His watan inám and his *hak* of levying *dasturi* from prostitute and other Musulmans were attached.

(1117) Rámá Kanade, calling himself a Brahmin, cut off the tails of some cows and did other mischief in Poona. His offences could not be expiated by a mere penance so he was sent in fetters to be inprisoned at fort Kobaj.

A. D. 1777-78.

(1118) Vishvanáth Bhat Pethye of Kadus in taluká Khed deserted his wife and lived with a kunbi woman. He was called to the Huzur and directed to give up his mistress an live with his wife. He agreed to do so, so his wife was made over td

A. D. 1777-78

भटजीनें कुणबीण ठेऊं नये, स्त्रीस नांदवावें, याप्रमाणें सरकारांतून ताकीद केली; त्यास सरकारआज्ञेप्रमाणें चालतों असें भटजींनीं कबूल केलें; याजवरून यांची स्त्री यांचे हवालीं करून यांस कसबे मजकुरीं पाठविले असेत, तरी हे रीतीप्रमाणें आपले स्त्रीस नांदवितील. कलम १.

कसबे मजकुरीं भटजींचें शेत आहे, तें तुह्मीं जप्त केलें ह्मणोन हे सांगतात, तरी यांचे शेताची जप्ती मोकळी करून पूर्ववत्प्रमाणें यांचें शेत यांजकडे चालवणें. कलम १.

भटजीची कुणबीण किल्ले सिंहगड येथें अटकेंत ठेविली आहे, तिचीं पोरें तीन आहेत, तीं भटजींचे स्त्रीचे हवालीं केलीं आहेत. तीं हे आपले घरीं नेऊन पालण करितील.

एकूण तीन कलमें लिहिलीं आहेत, त्यास यांचे शेताची जप्ती मोकळी करून सदरहू लिहिल्याप्रमाणें यांस वर्तवणें ह्मणोन, गोविंद बल्लाळ कमावीसदार तर्फ मजकूर यांचे नांवें चिटणिसी छ. ९ सवाल. पत्र १.

११११९ (५८१)-धाको महादेव करमरकर, वस्ती बीरवाडी, तर्फ मजकूर, यांची कन्या चौवरसांची त्रिंबक रघुनाथ धारप याणें करमरकर याचे अर्ज्या गुलामास व बटकीस फिताऊन मुलीस चोरून बीरवाडी नजीक पोफळविराचे रानांत नेऊन, येस जोशी नांदगांवकर व आबा धारप यांस नेऊन लग्न करीत होता, हें वर्तमान मुलीचा माय-आजा भिकाजी बल्लाळ टीगणे व गणेश नारायण लिमये यांस कळतांच धावोन जाऊन मुलीस घेऊन गांवांत आले, आणि हुजूर येऊन सदरहू वर्तमान विदित केलें; त्याजवरून धारप व जोशी यांस मसाला करून आणून मनास आणितां येस जोशी याणें लिहून दिल्हें कीं, त्रिंबक धारप याणें मजला पन्नास रुपये द्यावयाचा करार करून, पैकीं तीस रुपये देऊन रामचंद्र कृष्ण मामलेदार याची आज्ञा घेतली आहे, तुह्मीं लग्न चालवावें म्हणून गोमय तुळसीवर हात ठेऊन शफतपूर्वक सांगि-

तिसा सबैन
मया व अलफ
रजब २९

---

him, and the attachment on his field was removed. The kunbi woman was sent to be imprisoned at fort Sinhgad, and the children which she had by the Brahmin were entrusted to the care of his wife.

(1119) Trimbak Raghunáth Dhárap of Birwádi, with the help of the slaves at Dháko Maháden Karmarkar's house, enticed away Dháko's daughter aged 4 years to the lands of Pophalvir near Birwádi, and was going to marry her. His brother Abá Dhárap, was present on the occasion and Yés Joshi was officiating as priest The girl's maternal-grand-father, having got wind of the matter, ran to the spot and carried the girl back to the village; and then complained to the Huzur. Dhárap and Joshi were summoned to appear and Yés Joshi stated in his evidence, that he undertook to

A. D. 1778-79.

तर्ले, आणि मुलीस घेऊन पोफळविराचे रानांत गेला; त्याचा भाऊ आबा धारप मजला बोलावायास आला, तो व मी तेथें गेलों, लग्नाचा संकल्प करून देवकस्थापना पुण्याहावाचन वितरिक्त गणपतीपूजनादिक कन्यादानान्त उदकेंकरून केलें. विवाहहोमास अग्नि नवता तो आणावयास आबा धारप गेला, तों इतकीयांत धावणें आलें, तें समयीं आपण पळोन अवचितगडचे मेट्यांत गेलों, आणि सदरहू जालें वृत्त मामलेदारास निवेदन केलें, त्यांणीं लग्न फिरेलसें वाटतें असें उत्तर केलें. मागून भिकाजी बल्लाळ आले, त्यांणीं विवाहहोम जाहला नाहीं ह्मणोन सांगितलें, त्यास राहिलें कर्म समाप्त करणें ह्मणून सांगून ग्रामस्तांस पत्र देऊन सर्वांस निरोप दिल्हा. धारपांकडे व मजकडे पांचशें रुपये गुन्हेगारी करार करून निशा घेतली, पैका आपण दिल्हा नाहीं, धारप याणेंच दिल्हा. विवाहहोमादि राहिलें कर्म गांवीं येऊन करावें तों मुलीस पळविलें यामुळें जालें नाहीं. ह्मणोन, व ग्रामस्तांचें पत्र सरकारांत आलें, त्यांत विवाहहोमादिक कर्म जाहालें नाहीं ह्मणून लिहिलें आहे. त्याजवरून, वेदशास्त्रसंपन्न लक्ष्मण पाठक प्रभृती शिष्ट ब्राह्मणांचे मतें मूल कोणाची, देतो कोण, हें सारेंच अनन्वित, आणि विवाहहोमही जाला नाहीं, तेव्हां लग्न जालेंच नाहीं, यास्तव दुसरा वर उत्तम पाहून मुलीचें लग्न करावें, याप्रमाणें सिद्धान्त होऊन हें पत्र सादर केलें असे, तरी जोशी व आबाजी बल्लाळ धारप यांणीं कर्म वाईट केलें, सबब उभयतांस आपांक्त करून, मुलीस वर तिचे मातुश्रीचे विचारास येईल तो योजून लग्न करवणें ह्मणोन, रामचंद्र कृष्ण कमावीसदार, तालुके अवचितगड, यांचे नांवें चिटणिसी.

पत्र १.

सदरहूअन्वयें ब्राह्मण समस्त, वास्तव्य बिरवाडी, यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

२

दोन पत्रें छ. ७ जमादिलाखर दिल्हीं असेत.

officiate as priest at the ceremony as Trimbak told him that he had obtained the Mamlatdár's permission for the marriage and as he (Trimbak) paid him Rs. 30 and offered to pay 20 more. He further stated that the ceremonies of *Ganpati pujan* &c. up to and including *kanyádán* had been completed, and that they were stopped while Aba had gone to fetch fire which was required for performing the marriage sacrifice. The villager's report also showed that the sacrifice had not been performed. The matter was then referred to Laxman Páthak and other learned Brahmins. They found that as the guardian of the girl had not offered the girl in marriage and that as the marriage sacrifice had not been performed, no marriage had taken place, and advised that the girl should be married to another suitable bride groom. Orders were therefore issued to excommunicate Yés Joshi and Abáji Dhárap, and the kamávisdár was directed to get the girl married to another man selected by her mother.

११२० (५८२)–त्रिंबक धारप याणें धाको महादेव याचे मुलीस पळऊन आपणाशी

तिसा सबैन
मया व अलफ
रजब २९

बीरवाडीनजीक पोफळविराचे रानांत लग्न लावीत होता, सबब त्यास धरून आणून किल्ले राजमाची येथें अटकेंत ठेवावयासी पाठविला आहे, तरी याचे पायांत बेडी घालून किल्ले मजकुरीं पक्क्या बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पोटास शेर शिरस्तेप्रमाणें देत जाणें ह्मणोन, रामराव नारायण यांचे नांवें. छ. ३ जमादिलाखर. सनद १.

रसानगी यादी.

११२१ (६४२)–क्षेत्र नाशीक, परगणे मजकूर, येथें रामाजी जनार्दन दिंमत चिं-

समानीन
मया व अलफ
जिल्काद ३

तो विठ्ठल याजकडे ब्रह्मवधाचें निमित्य आलें, त्याचें प्रायश्चित न होतां अभिमान धरून वेदशास्त्रसंपन्न विश्वनाथभट भातवडीकर व दादंभट बेले प्रभृती ब्राह्मणांनीं आग्रहें रामाजीशीं संसर्ग करून तड केला. अलीकडे दिवाकर दिक्षित पटवर्धन यांजकडे ध्यानंदास बैरागी यास मारावयाचे प्रयोजकतेचें निमित्य आलें, त्याची निष्कृति न करितां वेदशास्त्रसंपन्न पांडुरंग दिक्षित प्रभृती शुक्ल पक्षींचे ब्राह्मणांनीं दिक्षितांशीं व्यवहार चालविला. हें वर्तमान सरकारांत विदित जाहलें, त्याजवरून दोन्हींकडील संभावित ब्राह्मणांस हुजूर पुण्याचे मुक्कामी बोलाऊन वर्तमान मनास आणून ज्याजकडे जसा दोष व ज्याजकडे जसा संसर्ग तसें त्यास प्रायश्चित्त योजून दोन पक्षांच्या दोन याद्या अलाहिदा ठराऊन पाठविल्या असेत. त्याप्रमाणें पायश्चित्त करवणें, व क्षेत्रांतील ब्राह्मण वगैरे यांणीं पुढें वर्तणूक कशी करावी येविशींचा ठराव कलमवार समस्त ब्राह्मणांचे विद्यमानें करून तीन तहनामे लिहून पाठविले आहेत, ते कोणापाशीं कसे ठेवावे येविशींचा, व कृष्णपक्षींचे ब्राह्मणांनीं बखेडा केला याजमुळें शुक्लपक्षींचे ब्राह्मणांस कर्ज जाहलें तें वारावयाविशींचा मार्ग योजून तपशील लिहिला आहे. बितपशील.

कलमें.

(1120) Trimbak Dhárap, the chief offender was sent to be im-
A. D. 1778-79 prisoned in fort Rájmáchi.

(1121) One Rámáji Janardan of Násik was suspected of having
A. D. 1779-80. killed a Brahmin Vishwanáth Bhat Bhátawdekar; still other Brahmins knowing had dealings with him without requiring him to purify him-elf by penance. This led to a split in the Brahmin community of Násik, one party calling itself *Shukla* and calling their opponents, including Vishwanáth Bhat, *Krishna* (impure). Certain members of the former party, Pándurang Dixit and others, subsequently had dealings with Divákar Dixit Patwardhan who was suspected of having abetted the murder of a *bairági* without making

१ तहनामे सरकारांतून तीन करून दिल्हे आहेत, त्यांपैकीं एक कमावीसदारांनीं दप्तरीं ठेवावा. व एक पाटील कुळकर्णी यांजपाशीं ठेवावा, व एक धर्माधिकारी यांजवळ द्यावा. धर्माधिकारी यांणीं त्याच्या पाच नकला श्र (स्व) दस्तुरी करून, आपलें बिकलम घालून, वरकड धर्माधिकारी त्यांचे भाऊबंद असतील त्यांच्या साक्षी घालून, सदरीलचें असल पत्र आपणाजवळ आहे ह्मणून नकलेचे पाठीवर लेहून, पांचा ज्ञातींजवळ पांच नकला द्याव्या.

१ देशस्थांमध्यें उपासनी हिंगणे यांजपासीं द्यावी.

१ चित्तपावनामध्यें यज्ञेश्वर दिक्षित पटवर्धन यांजपाशीं द्यावी.

१ कऱ्हाडे यांमध्यें चिंतामण दिक्षित गडकंभकर यांजपाशीं द्यावी.

१ यजुर्वेदी यामध्यें पूर्वीपासून ज्या घराण्यांत कागदपत्र ठेवावयाची चाल असेल त्याजपाशीं द्यावी.

१ कण्वांमध्यें ज्या घराण्यांत पूर्वींपासून कागदपत्रें ठेवावयाची चाल असेल त्याजपाशी द्यावी.

५

१ रामाजी जनार्दन याच्या कजीयापासून शुक्लपक्षी ब्राह्मणांस व कृष्णपक्षी ब्राह्मणांस खर्च जाहला आहे, त्यास कृष्णपक्षीं खोटे पडिले, त्यांचा खर्च त्यांनीं समजोन घ्यावा; शुक्लपक्षींचे ब्राह्मणांस जो खर्च पडिला आहे त्यास हे खरे जाहले, सबब रामाजी जनार्दन व दादंभट गेळे व विश्वनाथभट भातवडीकर व बापूभट मठकर व दादंभट खेडकर वगैरे यांनीं बखेडा करून कलह वाढविला, सबब त्यांजपासून घेऊन शुक्लपक्षींचे ब्राह्मणास द्यावा; त्यांजपासून ऐवज निष्पन्न होईल तेणेंकरून ऐवजाची भरती न होय तरी महादोषाचें प्रायश्चित्ताचें द्रव्य पांचा ज्ञातीस वांटून द्यावें असें लिहिले तें या ऐवजाचे भरतीस ऐवज फिटेतोंपर्यंत द्यावें व दिवाकर दीक्षितसंबंधें ब्राह्मणांस खर्च जाहाला असेल तो चौकशी करून दिवाकर दीक्षिताकडून देवावा.

२

एकूण दोन कलमी तपशील लिहिला आहे, याप्रमाणें करून प्रायश्चित्ताच्या यादी अलाहिदा पाठविल्या आहेत, त्याप्रमाणें चौकशीनें प्रायश्चित्तें करऊन पुढील वर्तणुकेचा तह-

---

inquiries in the matter. The Brahmans of both the parties were therefore called to the Huzur, and inquiries were made and penances were prescribed to all according to the measure of their guilt. A document was also drawn up showing how the Brahmins were to behave in

नामा कलमवार जाहला आहे, त्याप्रमाणें वर्तणूक सर्वांपासून करणें, व तुह्मीं करणें ह्मणू॰ पांडुरंग धोंडाजी कमावीसदार परगणे मजकूर यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

सदरील तीन तहनामे तिघांपाशीं ठेवावयाकरितां दिल्हे आहेत, त्याची नक्कल तप शीलवार अलाहिदा दप्तरीं करून ठेविली असे, तिहींचाही मजकूर एकसारिखाच असे.

१११२ (६४८)–वेदमूर्ति शामाचार्यप्रभृती ब्राह्मण पैठणकर यांणीं नरहरी रनालकर भ्रष्ट ब्राह्मण यास प्रायश्चित्ताचा अधिकार नसतां प्रायश्चित्त देऊ॰ पंक्तीस घेतला, व शुद्धपक्षींचे ब्राह्मणांवर बलात्कार करून त्यांशीं आपली पंक्ती केली, सबब शामाचार्य याजकडे वर्षासनें वगैरे आहेत व त्याचे कुटांतील ब्राह्मणांकडे वर्षासनें वगैरे आहेत, त्यांची जप्ती सरकारांत केली त्याज विशीं रसानगी यादी. सनदा.

समानीन मया व अलफ जिल्काद २२

१ रामचंद्र नारायण यांचे नांवें सनद कीं, वेदमूर्तीकडे परगणे पैठणपैकीं मुकासी याचे अंमलाचे गांव आहेत ते.

देहे.

१ मौजे आनंदपूर.

१ मौजे पथवंडी.

२

एकूण दोन गांव आहेत तेथील मोकाशाचा अंमल, व हरदूगांवीं मशारनिल्हेची इनाम जमीन आहे तिची जप्ती करून उत्पन्न होईल तें परगणे नेवासें वगैरे महाल येथील हिशेबीं जमा करणें म्हणोन. सनद.

२ मोकदम देहाये, परगणें पैठण, यांचे नांवें सनदा कीं, मशारनिल्हेचे इनामजमीनीची व मोकाशाची जप्ती करून कमावीस रामचंद्र नारायण यांजकडे सांगितली आहे, त्यांशीं रुजू होऊन सदरहूचा वसूल सुरळीत देत जाणें ह्मणोन. सनदा.

१ मौजे आनंदपूर.

१ मौजे पथवंडी.

२

future. The expenses incurred by the Brahmins of the pure party were ordered to be paid by the 'impure' party as the latter were the aggressors.

(1122) Shámácbárya and other Brahmins of Paithan performed the ceremony of purification in the case of a man who was not entitled to be purified. The annuities enjoyed by the Brahmins were therefore attached.

A. D. 1779-80.

१ नारो लक्ष्मण कमावीसदार, बाबती सरदेशमुखी, परगणे पैठण दिंमत महादाजी शिंदे, यांचे नांवें सनद कीं, शामाचार्यप्रभृती कुटांतील ब्राह्मण यांजकडे सरदेशमुखीचे वगैरे अमलापैकीं रोज व वर्षासनें चालत आहेत त्यांची जफ्ती सरकारांत करून, जफ्तीमुळें ऐवज वसूल होईल तो सरकारांत पावता करून जाब घेत जाणें म्हणोन. सनद.

१ विठ्ठल कृष्ण कमावीसदार मोकासा परगणे पैठण दिंमत मानसिंगराव यादव व अमृतराव यादव सोळसकर यांचे नांवें सनद की, शामाचार्यप्रभृती कुटांतील ब्राह्मणांकडे मोकाशापैकीं वर्षासनें व रोज चालत आहेत त्यांची जफ्ती करून, उत्पन्न होईल तें सरकारांत पावतें करून पावल्याचा जाब घेत जाणें म्हणोन. सनद.

५

पांच सनदा दिल्हा असेत.

११२३ (६५२)—नारो कृष्ण यांचे नांवें पत्र कीं, कुंभाराचीं वधुवरें घोड्यावर बसऊं नयेत येविशीं कासार व सुतार व लोहार यांणीं दिकत केली, सबब कुंभाराचा व कासार वगैरे यांचा कजीया लागोन मनसुबी हुजूर पडली त्याचा फडशा होऊन कुंभाराचीं वधुवरें घोड्यावरी बसवावीं असें सिद्ध जाहालें. कुंभार खरे जाहाले त्यांजपासून हरकी घेतली, कासार वगैरे खोटे जाहाले त्यांजपासून गुन्हेगारी घ्यावी, सबब बनाजी कासार व कृष्णाजी लोहार व सुतार मौजे पोंहरी, परगणे सुतोडा, यांस दोनशें रुपये मसाला करून सरकारांतून राऊन व खिजमतगार व ढलाईत हुजूर आणवावयाबद्दल पाठविले असतां ते गैर हजीर जाहाले म्हणोन हुजूर विदित जालें, त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरी बनाजी कासार व कृष्णाजी सुतार वगैरे यांची वस्तभाव व साहुकारी प्रांत खानदेश येथें असेल ते सरकारचा खिजमतगार पाठविला आहे. त्याचे विद्यमानें मोजदाद करून बंदोबस्त करणें, आणि मोजदादीचा जाबता हुजूर पाठवणें. सदरहू कुळाकडे गुन्हेगारीचा ऐवज येणें त्याचे वसुलास सरकारचा खिजमतगार तेथें ठेऊन घेणें म्हणोन चिटणिसी. पत्र १.

समानीन मया व अलफ जिल्काद २९

११२४ (६५९)—बाबू विष्णु प्रभुणा याचे आईकडे माहुलीस आपाजी तमाजीस

(1123) The carpenters, blacksmiths &c. of Khándesh objected to the bride and bride-groom of the potter caste riding on horse-back. Their objection was overruled; and they were made to pay a fine, while a present was taken from the potters.

A. D. 1779-80

(1124) The mother of Bábu Vishṇu Prabhuṇá of Máhuli was sus-

समानीन
मया व अलफ
जिल्हेज ८

कण्हेराच्या मुळ्या वाटून घातल्याचा, व बाबू विष्णु व त्याचा सोबती सदाशिव लिंबा या दोन पतितांचे स्त्रियांस त्यांचा संसर्ग जाला असा शब्द ठेऊन या दोघी व बाबू विष्णूची आई एकूण तिघी वेगळ्या ठेविल्या आहेत ह्मणोन हुजूर विदित जाहालें; त्याजवरून मुळ्यांचा व संसर्गाचा शोध करितां ह्मातारीनें मुळ्या वाटून घातल्या नाहींत, व दोघी स्त्रियांस पतितांचा संसर्ग जाला नाहीं, याप्रमाणें चौकशीनें ठरलें, याकरितां तिघींस मिथ्यापवाददोषपरिहारार्थ पंचगव्य देऊन पूर्ववत् व्यवहार चालवणें ह्मणोन, कृष्णराव अनंत यांस चिटणिसी. पत्र १.

येविशीं समस्त ब्राह्मण क्षेत्र माहुली यांस कीं, तिघीस पंचगव्य देऊन पूर्ववत् व्यवहार चालवावा असें चिटणिसी. पत्र १.

२

११२५ (७३४)—बाळाजी महादेव मामलेदार तालुके शिवनेर यांस पत्र कीं,

इसन्ने समानीन
मया व अलफ
मोहरम ८

जुन्नरांत तुमचे घरीं बटीक होती, ते पूर्वी जातीची परभूची स्त्री असतां, तिणें अंतज्याशीं व्यभिचार केला होता, असें सांप्रत कळलें. तुमचे घरीं कमकसर अडीच वर्षे होती. घरांतील झाडणें, सारवणें. खरकटीं भांडीं घासणें, व भाज्या निसणें चिरणें, व बिछाने घालणें हीं सर्व कामें करीत असे, यास्तव नीचाभिगतयोषित्संसर्गप्रायश्चित्त प्राजापत्यें एकूण रौप्य प्रत्याम्नाय.

रुपये.

२७० तुमची मातुश्री ठकूबाई प्राजापत्यें १३५ दर २ दोन रुपये प्रमाणें. रुपये.

१६२० तुह्मी व तुमची स्त्री.

१०८० तुम्हांस मुंडणपूर्वक प्राजापत्यें २७० दर प्राजापत्यास रुपये ४ प्रमाणें.

A. D. 1779-80.

pected of having given roots of the *kanher* plant to Appáji Tamáji to eat. She as well as two other women, who were suspected of having had connection with their husbands after the latter had lost caste, were excommunicated by the Brahmins of Máhuli. Inquiry showed the suspicions in each case to be groundless. It was ordered however that cow's urine should be given to the three women to purify them from the false imputation that had been made against them, and that they should then be admitted into the caste.

A. D. 1781-82.

(1125) It was discovered that a female slave who had lived in the house of Báláji Mahádeo, Mámlatdár of Shiwner for about 2½ years was originally a Parbhu woman

५४० स्त्रीस प्राजापत्यें १३५ दर ४ प्रमाणें. रुपये.

१६२०

१३५ तुमचे चुलत बंधु उमर वर्षे १२ यांस प्राजापत्यें १३५ दर १ प्रमाणें. रुपये.

२७० तुमचे पुत्रास प्राजापत्यें १३५ दर २ प्रमाणें. रुपये.

४ तुमचे सुनेस प्राजापत्यें २ दर २ प्रमाणें. रुपये.

५०१ ब्राह्मणभोजन जुन्नरांत करावें, ब्राह्मण. असामी.

१००० खुद्द.

५०० स्त्रीस.

१०० सर्वांस.

१६००

एकूण सोळाशें ब्राह्मणांस दर हजारी उत्तम प्रतीचे भोजनास अजमासें रुपये ३०० तीनशें प्रमाणें व दक्षणा मिळोन. रुपये.

२०० पुर्वोत्तरांग एकूण. रुपये.

३०००

येणेंप्रमाणें प्रायश्चित (ता ?) र्थ प्राजापत्यांचे रौप्य प्रत्याम्नाय, व ब्राह्मणभोजन, व पुर्वोत्तरांग मिळोन तीन हजार रुपये करार केले असेत, त्यास प्रायश्चित्त नेमिलें आहे, त्या प्राजापत्यांची व्यवस्था. रुपये.

१३८० जुन्नरांत.

६७९ प्राजापत्यें एकूण रुपये.

५४४ प्राजापत्यें २७२, दर २ प्रमाणें.

१३५ प्राजापत्यें १३५, दर १ प्रमाणें.

६७९ ४०७

एकूण सहाशें एकूणऐशीं रुपये चारशें सात प्राजापत्यांचे, त्यास वैदिक, व अग्निहोत्री व श्रोती, व पंडित, व तपस्वी असतील त्यांस दोन प्राजापत्यें दर दोन रुपयांचीं द्यावीं, व सामान्य वैदिकास एक प्राजापत्य दर दोन

---

and had previously committed adultery with a mahàr. The Màmlatdár and his family were therefore directed to undergo a penance costing Rs. 2,500 as Daxina and Rs. 500 as food-expenses. Penances were also prescribed for those who had dined with the Mámlatdár or had dealings with

रुपयांचें द्यावें व किरकोळ भिक्षुकांस एकेक प्राजापत्य दर १ रुपयाचे दराचें द्यावें.

२०० पूर्वोत्तरांग.

५०१ ब्राह्मणभोजन असामी १६०० रुपये.

१३८०

२८० क्षेत्र नाशीक येथें प्राजापत्यें ७० दर ४ चार याचीं पाठवावीं. तीं वैदिक, व अग्निहोत्री, व श्रौती, व पंडित, व अध्यापक, व तपस्वी असतील त्यांस एक एक प्राजापत्य द्यावें; अग्निहोत्रें ज्यांचीं सिद्ध असतील त्यांस दोन दोन प्राजापत्यें द्यावीं.

१२० क्षेत्र पुणतांबें येथें प्राजापत्यें ३० तीस दर ४ प्रमाणें पाठवावीं. तीं वैदिक, अग्निहोत्री, व श्रौती, व पंडित, व अध्यापक असतील त्यांस एक एक प्राजापत्य द्यावें.

१२२० पुणीयांत वैदिक उत्तम, व श्रौती, व पंडित, व तपस्वी यांस योग्यतेनुरूप वाटावयासी आणावीं प्राजापत्यें ३०५ दर ४ प्रमाणें. रुपये.

३०००

याप्रमाणें प्रायश्चित्तांचा आकार करून जुन्नरांत, व क्षेत्र नाशीक, व पुण्यस्तंभ, व पुणें येथील ब्राह्मणांस वांटावयाचीं, व ब्राह्मणभोजन व पूर्वांग उत्तरांग करावयाची नेमणूक करून दिल्ही आहे, याप्रमाणें करणें; व तुमचे पंक्तीस जेवणार व संसर्गी वगैरे यांस प्रायश्चित्त द्यावयाची व्यवस्था व ग्र(गृ)ह शुद्धतेचीं. कलमें.

तुमचे अनुपनीत पुत्रास पंचगव्य प्राशन करवणें. कलम १.

मांससंसर्गीयांस प्राजापत्यद्वय व पंचगव्य प्राशन. प्राजापत्य प्रत्याम्नाय दर प्राजापतीं व्याहृती होम दोन सहस्र अथवा दर प्राजापतीं एक रुपयाप्रमाणें दर असामीनें दोन दोन रुपये प्रमाणें द्यावे. कलम १.

एक दोन वेळ पंक्तीस भोजन घडलें असेल, त्यांस उपोषण ब्रह्मकूर्च विधि करून पंचगव्य प्राशन करावें. कलम १.

गृहांतून वस्त्रपात्र धान्यादिक बाहेर काढून ग्र(गृ)हभूमीचें खनन दहन करून संमार्जन करून गायीचें परिभ्रमणादिक करून प्रायश्चित्तोक्त ब्राह्मणभोजन करावें. कलम १.

---

him. The floor of the house was to be dug up and purified by a cow trampling it. The pots were to be purified by being put into the fire. The wooden-seats & the wooden-doors were to be scraped.

मांसाई संसर्गी यांस दोन प्राजापत्यें, व पंचगव्य प्राशन. प्राजापत्य प्रत्याम्नाय. व्याहुती होम एक हजार प्रमाणें दोन सहस्र अथवा द्रव्य दर एक रुपया प्रमाणें दर असामीनें दोन रुपये प्रमाणें द्यावें. कलम १.

निरंतर पंक्तीस भोजन करणार तुमचा भाचा व आणखी पांच असामी एकूण सहा असामी यांस दर असामीस प्राजाप्रत्यें ९० नव्वद, प्रत्याम्नाय होम दर एक हजार प्रमाणें दर असामीनें ९०००० नव्वद हजार करावा, अगर श्रीत्रिंबकेश्वरीं ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणा ३६ छत्तीस कराव्या, अथवा दर असामीस प्राजापती एक रुपया प्रमाणें नव्वद रुपये. कलम १.

घरांतील मृत्तिकाभांडीं असतील तीं त्यागावीं, व पाकसंमंधीं लांकडाचीं पात्रें असतील तीं टाकावीं, व पाट असतील ते तासून घ्यावे. चौकटी, कवाडें, खांब खरवडून धुवावे. कलम १.

तांब्याचीं व पितळेचीं भांडीं वगैरे धातूचीं भांडीं असतील तीं ताऊन घ्यावीं. कथलाचीं असतील तीं आटवावीं. कलम १.

सर्व वस्तुमात्रावर पंचगव्य प्रोक्षण करावें, व घरच्या देवांची अर्चा शुद्धी करावी. कलम १.

याप्रमाणें करावयाचा निश्चय करून समस्त ब्राह्मण कसबे जुन्नर यांस अलाहिदा पत्र लिहिलें आहे, तरी ते सांगतील त्याप्रमाणें वर्तणूक करून प्रायश्चित्त घेऊन शुद्ध होणें म्हणोन. पत्र १.

समस्त ब्राह्मण, वास्तव्य कसबे जुन्नर, यांस कीं, सदरहू लिहिल्यान्वयें करून प्रायश्चित्त करवावें म्हणोन. पत्र १.

२

चिटणिसी.

इसन्ने समानीन मया व अलफ. सफर ६

११२६ (७४१)—वेदमूर्ति मुकुंद दीक्षित पुजारी क्षेत्र श्री सप्तशृंग यांणीं हुजूर विदित केलें कीं, मौजे चंडकापूर, परगणे वण, हा गांव श्रीदेवीचे पूजेस सरकारांतून आहे, त्याचें उत्पन्न आनंदा गुरव श्रीचे पुजेस न लावतां मध्येंच खातो, त्याजपासून मागील हिशेब घेऊन देवीचे पूजेची नेमणूक पेशजीं सरकारांतून केली आहे, त्याप्रमाणें चालविली पाहिजे म्हणोन; त्याजवरून श्रीचे पूजेस मौजे मजकूर सरकारांतून आहे, त्याचें उत्पन्न आनंदा गुरव श्रीचे

A. D. 1781-82.

(1126) It was represented that the Gurava (worshipper) of the goddess at Saptashringa had misappropriated the proceeds of the *inām* village assigned for the expenses of the goddess. The officer of Dhodap was directed to inquire into the matter,

पूजेस न लावतां मध्येंच खातो त्याची चौकशी तुह्मीं करून, गुरवाकडे ऐवज निघेल तो त्याजपासून घेऊन सरकारांत समजावणें. आज्ञा होईल त्याप्रमाणें करणें. पुढें गांवचा ऐवज श्रीचे पूजेकडे नेमून देऊन श्रीची पूजा यथास्थित चालवणें. श्रीचे पूजेची नेमणूक कसकशी करून घ्याल तीही सरकारांत समजावणें. श्री देवीची वस्तभाव आज तागाईत शिलकेस गुरवाकडे किती आहे, तो झाडा काढून यादी श्रीचे जामदारखान्यांत ठेवणें, आणि सरकारांत समजावणें. ह्मणजे वस्तभावेचा बंदोबस्त पूर्वील चालीप्रमाणें करून दिल्हा जाईल ह्मणोन, बाजीराव आपाजी तालुके धोडप यांचे नांवें. सनद १.

रसानगी यादी.

११२७ (२८)–समस्त ब्राह्मण क्षेत्र वाई यांचे नांवें पत्र कीं, नीळकंठ नाईक रास्ते

इसन्ने समानीन मया व अलफ रविलाखर १७

रोजगाराकरितां उठोन कर्नाटक प्रांतीं गेले, त्यास चौदा वर्षे जालीं. तिकडून आरकाटांत जाऊन राहिले, तेथें इंग्रजांची व हैदरखान यांची लढाई जाली, तेव्हां हैदरखान यांणीं या संबंदांत धरून नेऊन अटकेंत ठेविले. तेथेंही बहुत काल होते, ते सुटून प्रस्तुत वाईंत घरास आले आहेत, त्यास हे पूर्वी गांवीं होते तेव्हां यांचें आचरण अगर यांचा स्नानसंध्येचे जागां विश्वास कसा हें सर्वांस दखलच आहे. त्यात बहुत काल यवनी राज्यांत व यवनांचे अटकेंत घालविला, तेव्हां तेथें स्नानसंध्या अगर आचरण घडावयाचे काय आहे, यास्तव यांस पडल्र प्रायश्चित्त नेमून तपशीलवार यादी अलाहिदा पाठविली आहे, त्याप्रमाणें प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून पंक्तिपावन करावें ह्मणोन चिटणिसी. पत्र १.

११२८ (८०२)–वेदमूर्ति राजश्री अनंत ऋषी ब्रह्मचारी नारदसांप्रदायी पैठणकर

---

to recover from the Garava the amount that he might be unable to account for and to report the result to Govt. He was further directed to make due arrangements for the expenses in connection with the idol and to send in a list of the ornaments belonging to the idol.

(1127) Nilkanth Náik Ráste was for a long time in the Karnatik and Arcot and was afterwards taken prisoner by Haider Naik in the war between him and the English. He now returned to Wái. Having stayed for a long time under a Mahomedan Govt. and in a Mahomedan prison, it could not be expected that Nilkanth had regularly performed the religious observances enjoined on a Brahmin. Having regard to his previous religious conduct, a penance was prescribed and the Brahmins of Wái were directed to administer it and purify the man.

A.D. 1781-82.

(1128) The people of the Mánbháv sect used to make converts from the Hindu religion. They got them shaved, both men and women, and induced them to discard their

A. D. 1782-83.

सलाख समानीन मया व अलफ रजब ३

यांणीं हुजूर विदित केलें कीं, सर्व प्रांतांतील मानभाव एकमतें मिळोन सांप्रत गैररीतीनें वर्तों लागले, चौहूं वर्णांत अबुद्धिजनांस वश्य करून आपले मतांत वर्तवितात, पुरुष व स्त्री यांचीं मुंडणें करून आपले वेश धरवितात, व शिष्य होतात त्यांजकडून त्यांचीं प्राचीन कुळदैवतें त्यागऊन खापऱ्या पुजवितात, व बाकी व मिरजगांव व पंचालेश्वर वगैरे जागां कोठें कोठें शिवालयें प्राचीन आहेत तीं अवरोधून देवता उच्छेद करून आपले ओटे घातले. इत्यादिक भ्रष्टाचार करूं लागले; त्याजवरून गुदस्तां पैठणास दसनाम गोसावी व मानभाव कजीया सांगत आले. मानभावाचें बोलणें कीं, आपण षड् दर्शनांत आहों. न्यायशास्त्र व मुंडी दर्शन आमचें आहे, ऐसें कितेक पकारें अमर्याद बोलों लागले; त्याजवरून समस्त क्षेत्रस्थ ब्राह्मण व अधिकारी व जमीदार वगैरे सर्व ग्रामस्त मिळोन शास्त्रान्वयें विचार करून निर्णय केला कीं, मानभाव अतिनिंद्य, सर्व धर्म बहिष्कृत, षड्दर्शनांत नाहींत, शास्त्रविरुद्ध अविधि मुंडित, ऐसे असतां आपले मताच्या नानाप्रकारें नवीन चाली पाडून चौहूं वर्णांमध्यें अबुद्धि जनांस आपले मतांत मेळऊन भ्रष्टाचार करवितात; मानभावाचा उपदेश कोणतेही निकृष्ट जातीमध्यें देखील घेणें योग्य नाहीं; यांचे मतांत जे अनुसरले असतील त्यांस राजदंड व ज्ञातीदंडपूर्वक प्रायश्चित्त जाहल्याविना त्याचे घरीं ब्राह्मणांनीं जाऊं नये, ऐसें ठराविलें; त्याजवरून मानभाव यांणीं गोसावी यासी खोटपत्र लिहून दिल्हें कीं, याउपरी आपलें मत कोणास शिकवणार नाहीं; व आपण षड्दर्शनांत नाहीं. आपले मर्यादेनें राहूं. अतःपर अमर्यादा वर्तों तरी दिवाणचे व षड्दर्शनाचे गुन्हेगार. ऐसें लिहून दिल्यावर मानभाव औरंगाबादेस जाऊन तेथें गैरवाका समजाऊन सुभ्याचें पत्र पठणचे कमावीसदारास नेऊन खोटपत्र गोसावीयासी लेहून दिल्हें तें बलात्कारें माघारें घेतलें, आणि पुढें अमर्यादा वर्तों लागले. येविशीं त्यांस शिक्षा असावी, याजकरितां करवीरवासी श्रीशंकराचार्य स्वामी यांस व क्षेत्रोक्षेत्रींचे समस्त ब्राह्मण यांस आपण विनंती करून त्यांचीं पत्रें आणिलीं आहेत, तीं मनास आणून आज्ञा जाहाली पाहिजे. म्हणोन विदित करून शंकराचार्य स्वामींचें पत्र

---

family gods and to worship pieces of burnt clay. They also desecrated some old Shiva temples and constructed raised grounds or platforms on the sites. Dasnám Gosávi therefore laid a complaint against the Manbhávs at Paithan. The latter alleged that they were within the pale of the Hindu religion, (*lit.* were referred to in the *Shad-darshan*) and that *Nyáya shástra* (logic) and *mundi-darshan* belonged to their sect. The officers and the jamidárs of Paithan, as also the Bráhmins of the place met together and decided that the Mánbháv sect was not recognized by the Hindu religion, that its followers were detestable in every way and that it was improper on their part to convert to their faith a Hindu, even of the lowest caste. The Mánbhávs then acknow-

व क्षेत्रोक्षेत्रींचीं पत्रें आणून दाखविलीं, ऐसीयास पैठणास समस्त क्षेत्रस्त ब्राह्मण व अधिकारी वगैरे यांणीं शास्त्रान्वयें मनास आणिलें, तेथें मानभाव खोटे होऊन गोसावीयासी खोटपत्र लिहून दिल्हें असतां औरंगाबादेचे सुभ्यास गैरवाका समजाऊन त्याचें पत्र पैठणचे कमावीसदारास आणून सदरहू खोटपत्र माघारें घेतलें हे बेकैदी केली. याजकरितां शंकराचार्य स्वामींचें पत्र व क्षेत्रोक्षेत्रींचीं पत्रें आलीं त्यांत मजकूर, मानभाव अति निंद्य, सर्व धर्मबहिष्कृत, चातुर्वर्णांपासून निकृष्ट जातीपर्यंत कोणत्याही जातींत नाहींत, व षड्दर्शनांत नाहींत, अविधि मुंडित, नीलांबर, ऐसे यांचा उपदेश कोणत्याही जातीनें घेऊं नये, घेतला असेल त्यास बहिष्कार, व त्याचे घरीं ब्राह्मण लग्नमुहूर्तादिक कोणत्याही कार्यास जाईल त्यास बहिष्कार, या अन्वयें आहेत. त्याजवरून मानभावाचे उपदेशिक जे जाहाले असतील त्यांस बहिष्कार घालणें, पुढें राजदंड व ज्ञातीदंडपूर्वक प्रायश्चित्त जाहल्याविना त्यांचे घरीं ब्राह्मणांनीं जाऊं नये, येविशीं ताकीद करणें, व जागां जागां प्राचीन देवालयें उच्छिन्न करून आपले वोटे घातले असल्यास ते पाडणें, व त्यांचें पारिपत्य करून मानभाव आपले मर्यादेनें वर्तणूक करीत, फिरोन लबाडी करून कोणास उपदेश करूं न पावत, ऐसा पक्का बंदोबस्त करणें, आणि येथापूर्ववत् दैवतें स्थापून मानभावांपासून गुन्हेगारी घेणें, येविशीं पत्रें.

१९ मानभावांपासून गुन्हेगारी घेऊन सरकारहिशेबीं जमा करणें, म्हणून. पत्रें.

१ सरसुभा, निसबत सर्वोत्तम शंकर महाल बीतपशील.

१ परगणे वण दिंडोरी.
१ प्रांत बागलाण.
१ परगणे पिंपळनेर.
१ परगणे कान्हापूर.
१ परगणे कुंभारी.
१ परगणे खांडवें.
१ परगणे सिन्नर.
१ परगणे सांडस, व चोपाळें.

---

ledged their defeat and agreed in writing to abstain from propogating their creed on pain of punishment by the caste as well as by Government. They however subsequently went to Aurangábád and with the aid of the Subhá, took back their written agreement by force. Anant Rishi Brahmachári therefore procured the opinions of Shri Shankaráchárya of Karvir and of the Brahmins of holy places and referred the matter to the Peshwá. The decision of the Paithaṇ Brahmins was confirmed and fines were ordered to be levied from the Mánbhávs.

१ सरकार हांडे.
१ तालुके मुल्हेर.
१ तालुके घोडप.
१ तालुके पटा.
१ परगणे दहीवलें.
१ तालुके कावनई.
१ तर्फ देपूर.
१ परगणे वारसें उमरपाटें.

१६

१ सरसुभा प्रांत गंगथडी, निसबत नरसिंगराव बल्लाळ, महाल बी-तपशील.

१ परगणे संगमनेर.
१ तर्फ राहूरी.
१ परगणे पाटोदें.
१ परगणे आकोलें.
१ तर्फ बेलापूर.
१ परगणे धांधरफळ.
१ जागीर किल्ले माहूली.
१ परगणे बारागांव नांदूर.
१ परगणे वामोरी.
१ कसबे मुखेड.
१ कसबे राहातें.
१ परगणे मजकूर वगैरे.

१२

१ प्रांत जुन्नर, निसबत रामराव त्रिंबक.
१ प्रांत खानदेश, निसबत नारो कृष्ण.
१ तर्फ हवेली संगमनेर निसबत त्रिंबक कृष्ण, व जावजी हरी.
१ परगणे कर्डे रांजणगांव, निसबत बाबूराव माणकेश्वर.
१ तालुके नगर, निसबत विठ्ठल नारायण.
१ परगणे पारनेर, निसबत महादाजी नारायण.
१ परगणे इंदापूर, निसबत गणपतराव जिवाजी.

१ किल्ले सिंहीगड, निसबत नारो महादेव, यांस, तर्फ कर्यातमावळाविशीं.

१ बाबती प्रांत बाळाघाट, निसबत महिपतराव प्रल्हाद.

१ तालुके त्रिंबक, निसबत धोंडो महादेव.

१ परगणे नाशिक, निसबत पांडुरंग धोंडाजी.

१ प्रांत वाई, निसबत भवानीशंकर हैबतराव.

१ प्रांत कराड, निसबत श्रीनिवास शामराव.

१ कृष्णराव अनंत यांस तर्फ सातारा वगैरे येविशीं.

१ रामचंद्र नारायण यांस कीं, प्रांत पुणें व परगणे नेवासें वगैरे महाल येथील चौकशी करून पुण्याचे हिशेबीं जमा करणें म्हणोन.

२ वाकी व मिरजगांव व पंचाळेश्वर, व मढपिंपरी वगैरे जागां जागांचीं दैवतें उच्छिन्न करून आपले वोटे घातले आहेत ते काढून टाकणें येविशीं सदरहूप्रमाणें पत्रें.

१ चिंतामणराव पांडुरंग.

१ महादाजी शिंदे.

२

---

१९ (१७).

६ मानभावांपासून गुन्हेगारी घेऊन हुजूर पाठऊन देणें म्हणोन. पत्रें.

२ वाकी व मिरजगांव व पंचाळेश्वर व मढपिंपरी वगैरे जागांजागांचीं दैवतें उच्छिन्न करून आपले वोटे घातले आहेत, ते काढून टाकणें; आणि येथापूर्ववत् दैवतें स्थापणें येविशीं सदरहूप्रमाणें. पत्रें.

१ आनंदराव भिकाजी.

१ तुकोजी होळकर.

२

१ आपाजीराव पाटणकर.

१ महादाजी नीळकंठ.

१ पांडुरंग बाबूराव.

१ सगुणाबाई निंबाळकर.

६

१ अनंतरावजी ब्रह्मचारी नारदसांप्रदायी, वास्तव्य क्षेत्र पैठण, यांस कीं, जागांजागांचे संस्थानी यांस व सरदारांस व महालोमहालींचे कमावीसदारांस वगैरे यांस पत्रें देऊन मानभाव यांणीं गैररहा चालों नये, व त्यांचे मतांत जे अनुसरले असतील त्यांणीं मानभावाचा पंथ सोडून आपलाले जातींचे स्वधर्मानें वर्तावें, याप्रमाणें बंदोबस्त करविला आहे; व औरंगाबादेचे सुभ्याचें पत्र पैठणचे कमावीसदारास देविलें आहे तें तुह्मीं पैठणास नेऊन तेथें मानभावांपासून खोटपत्र पुन्हां घेऊन, त्यांचे मतांत जे अनुसरले आहेत त्यांचा बंदोबस्त शंकराचार्य स्वामींचे, व क्षेत्रोक्षेत्रींचें पत्रांअन्वयें तुह्मीं मानभावांचें पारिपत्य करून व त्यांचे शिप्यांस बहिष्कार घालून तो पंथ सोडून आपलाले जातीचे स्वधर्मानें वर्तवावें म्हणोन. पत्र.

१ समस्त मानभाव महालानिहाय यास कीं, तुह्मीं पैठणास खोटे होऊन गोसावी यांस खोटपत्र लिहून दिल्हें असतां. औरंगाबादेचे सुभ्यास गैरवाका समजाऊन खोटपत्र दसनाम गोसावी याजपासून घेतलें आहे, तें माघारें अनंत ऋषी यांचे विद्यमानें गोसावी यांस देऊन आपले पायरीनें राहणें. या उपरीं चातुर्वर्णांपासून इतर निकृष्ट जातीपर्यंत कोणासही उपदेश केल्यास पारपत्य केलें जाईल म्हणून. पत्र.

१ दलेलगिरी व उमेदपुरी व लवगपुरी व चैनपुरी व मोनी महंत व नारायणगिरी प्रमुख पैठणकर, व मुनेंद्रपुरी व निर्वाणभारथी व मनोहरगिरी व सेवागिरी व सिद्धपुरी दौलताबादकर, व कामेश्वर भारथी माहुरकर, व समस्त सातारकर, व समस्त सौंदतीकर, व देशनिवासी व संस्थानिक गोसावी यांचे नांवें पत्र कीं, मानभाव यांणी खोटपत्र तुम्हांस दिलें असतां औरंगाबादेस गैरवाका समजाऊन पत्र माघारें घेतलें आहे, तें तुमचें तुम्हांस देविलें असे; येविशीं औरंगाबादेचे सुभ्यास सरकारचें पत्र आहे, तरी खोटपत्र माघारें देवितील. या उपरीं मानभाव लबाडी करून अमर्यादा वर्तणार नाहीत. कदाचित् अमर्यादा वर्तले

तरी तुह्मीं अनंत ऋषीचे विद्यमानें सरकारांत समजावणें. पारपत्य केलें जाईल म्हणोन. पत्र.

२८

अठावीस पत्रें चिटणिसी दिल्हीं असेत.

हरी बल्लाळ यांच्या कीर्दीपैकीं.

११२९ (८४१)—श्री पांडुरंग क्षेत्र पंढरपूर येथें श्रीच्या देवालयांत मर्यादा येणेंप्रमाणें कलम. बीतपशील.

अर्बा समानीन
मया व अलफ
जमादिलावल ५

श्रीदेवाचे दर्शनास येतात त्यांणीं त्यांणीं देवास भेटों नये. पूजनें करून सिंहासनावर मस्तक ठेऊन नमस्कार मात्र करावा. कलम १.

देवापुढील तृतीय मंडपांत दक्षणेकडे द्वार आहे. परंतु यात्रेचे दाटीमुळें अंधःकार पडतो, त्यास उत्तरेकडे प्राचीन द्वार होतें तें बुजवोन, तेथें हणमंताची मुहूर्त [मूर्ति] ठेविली आहे ते काढून देवालयांत ठेऊन द्वार मोकळें करून, तेथें जाळी मातबार थोर भोकाची देवालयांत उजेड पडोन वाराही पुष्कळ येईल अशी नवी दगडाची करून लावावी. कलम १.

आषाढी कार्तिकेचे यात्रेंत दाटी बहुत माणसांची होते. एकाच द्वारानें जाण्या-

गर्भागारापुढील दुसरे मंडपाचें द्वार आहे, तेथें बाहेरचे फरसापेक्षां उंबऱ्यांतील फरस नीच आहे, त्यास यात्रेचे दाटीमुळें अंधकार पडतो, याजमुळें बाहेरून आंत येणारास हिसका बसोन माणसें पडतात. यास्तव बाहेरील फरसाबरोबर आंतील फरस उंच, हिसका माणसास न बसे असा, करावा. कलम १.

देवाचे पुढील दुसऱ्या मंडपांत अंधःकार विशेष पडतो, याजमुळें यात्रेकराची वस्तभाव उचलोन नेतात, याजकरतां मंडपाचे वरील छतास हमचौरस अदगजाचें गवाक्षें पाडून, पर्जन्यकाळीं गवाक्षानें पावसाचें पाणी आंत न पडे असा बच्याव करून उजेड मंडपांत पडे असें करावें.

FROM HARI BALLÁL'S DIARY.

(1129) Certain regulations were framed for observance by persons going to the temple of Pándurang at Pandharpur, the principal of which were:—

A. D. 1783-84.

(1) they should not embrace the idol;

(2) the northern gate which was generally closed, should be opened in or der to admit light and air;

येण्याचे दाटीमुळें माणसें दुखावतात, व मरतात. यास्तव यात्रेचे दिवसांत पूर्व द्वारानें दर्शनास जाणारानें जावें, देवदर्शन करून दक्षण द्वारानें बाहेर निघावें; पूर्व द्वारानें बाहेर जाऊं नये, दक्षण द्वारानें आंत जाऊं नये येणेंप्रमाणें. कलम १.

देवालयाचे बाहेर चोखामेळ्याचा दगड उत्तरेचे आंगें आहे, तेथें अतिशूद्र दर्शनास येतात. जागासंकोच गलीची आहे. तेथें जाणारां येणारांस स्पर्शास्पर्श होतो, हें ब्राह्मणांस विरुद्ध. यास्तव अतिशूद्रांनीं चोखामेळ्याचे दीपमाळेजवळ अथवा महार वाड्यांत स्थळ असेल तेथें पुजा करीत जावी. देवालयाजवळ अतिशूद्रांनीं येऊं नये. कोणी आला तरी पारिपत्य करावें. कलम १.

देवदर्शनास मातबर येतात त्यांजबरोबर यवन येतात ते प्राकारांत जातात, याजमुळें अनाचार होतो तो अयोग्य. याजकरितां मुसलमानानें नामदेवाचे पायरीस स्पर्श करूं नये, व दुसऱ्याही प्रकारानें मुसलमान आंत जाऊं नये. कोणी गेला तर पारिपत्य करून गुन्हेगारी घ्यावी. येणेंप्रमाणें. कलम १.

येणेंप्रमाणें सात कलमें करार करून पाठविलीं आहेत, याप्रमाणें बंदोबस्त करावयास चिंतो रामचंद्र कमावीसदार क्षेत्र मजकूर, दिंमत परशराम रामचंद्र, यांस आज्ञा केली आहे, तरी सरकारचे खास बारदार पाठविले आहेत, त्यांचे गुजारतीनें सदरहू लिहिल्याप्रमाणें बंदोबस्त करणें म्हणोन. जाबता १.

सदरहू अन्वयें कमावीसदार मजकूर यांस. सनद १.

२.

रसानगी यादी.

---

(3) at the Áshádhi and Kártiki fairs, when the crowd of pilgrims was very great, people should enter by the eastern and leave by the southern door:

(4) Mahárs should worship at the pillar erected in honor of Chokhá Meḷá or in the Mahár-wáḍá;

(5) no Musalman should enter the temple.

११३० (८५०)–तुह्मीं हुजूर विदित केलें कीं, आपला भ्रतार मृत्य पावला, आपण दोघी स्त्रिया मिळोन तीन कन्या आहेत, पुत्रसंतान नाहीं, पुढें संतान चालोन आमचा कालक्षेप चालिला पाहिजे, त्यास आपले दादल्याचे जवळचे भाऊ रामजी, व मल्हारजी, व महादजी, व महादजी लाफणे याचा मूल घ्यावा, तरी त्यासी आह्मांशीं पडत नाहीं, याजमुळें यांचा मूल घ्यावयाचा नाहीं, सबब दुसरा भाऊ सदाशिव लाफणा पाटसकर याचा लेक निंबाजी यास दत्तपुत्र घेणार, येविशीं आह्मीं दोघी राजी होऊन जिवाजीस दत्तपुत्र घ्यावयाची आज्ञा करावी ह्मणोन; ऐशास विठोजी लाफणा याच्या तुह्मीं दोघी स्त्रिया, तुमचे पोटीं पुत्रसंतान नाहीं, तुमचा कालक्षेप चालिला पाहिजे, हें जाणून दत्तपुत्र घ्यावयाची आज्ञा करून हें पत्र सादर केलें असे, तरी जिवाजीस दत्तपुत्र घेऊन त्याचे हातून दुकान व वित्तविषय अनभऊन सुखरूप राहणें ह्मणोन, अहिल्या व मुक्ती शिंपी कोम विठोजी लाफणा शिंपी, वस्ती कसबे पुणें, यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

खमस समानीन
मया व अलफ
साबान १६

दत्तपुत्र घ्यावयाची आज्ञा करून सरकारची नजर दोन हजार रुपये करार केले यास हसेबंदी. रुपये.

१००० आषाढ शुद्ध १५
१००० श्रावण शुद्ध १५

२०००

दोन हजार रुपयांचा हवाला फिरंगोजी भुतकर याचा घेऊन पत्र दिल्हें असे.

११३१ (८५१)–नारो महादेव व शिवाजी महादेव महाजन यांजकडे पूर्वीं तालुके वसई येथें श्रीविमल निर्मळ येथील देवालयाचा कारखाना होता, त्या बाबत तफावत सात हजार रुपये त्यांजकडे निघाली आहे, त्यास त्याचा शोध करितां ते मृत्य पावले, त्यांचे पुत्र कसबे नागोठणें, तालुके अवचितगड येथें राहतात, ह्मणोन हुजूर विदित जहालें; त्याजवरून त्यांचे घरीं चौकीस प्यादे हशमाकडील संभाजी केदार, व खुतुब वलद पीर महमद, दिंमत येशवंतराव वणजारे पाठविले असेत, तरी तुह्मीं त्यांचे पुत्रास धरून प्यादे यांचे हवालीं करणें. निकड करून सदरहू तफावतीचा ऐवज घेतील. तालुके मजकुरीं त्यांची असामी आहे, त्यास

खमस समानीन
मया व अलफ
सवाल १९

(1130) A man of Poona, a tailor by caste, having died without any male issue, his two widows asked permission to adopt a son to carry on his business and to succeed to his property. The permission was granted on payment of a *nazar* of Rs. 2,000.

A. D. 1784-85.

(1131) Nàro Mahádeo and Shiwáji Mahádeo were managers of the funds of the temple of Shri-Vimal Nirmaḷ in táluká Bassein. Inquiry proved that they had misappropriated

A. D. 1784-85.

सन अर्बा समानीन व सन खमस समानीन दुसाला वेतन पावलें आहे तें परिच्छिन्न मार्गे घेऊन प्याद्याचे हवालीं करणें ह्मणोन, गणेश बल्लाळ व हरी गणेश यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

पुढें वेतन न देणें ह्मणोन पत्रांत लिहिलें असे.

११३२ (८९०)—रघुनाथ जोतिषी बिन त्रिंबक जोतिषी, व कृष्ण जोतिषी बिन दामोदर जोतिषी, मामले पाल पंचमहाल यांणीं हुजूर विदित केलें कीं, तर्फ कोरबरशें उर्फ पौडखोरें येथील जोतिष, उपाध्यपण, व धर्माधिकाऱ्याची वृत्ति पुरातन आमची आह्मांकडे चालत आहे, त्यांत महारांचीं लग्नें तर्फ मजकुरीं जोतिष्यांनीं लावण्याची चाल पुरातन नाहीं; व आजपर्यंत लाविलीं नसतां सन अर्बा समानीनांत आपाजी कृष्ण कमावीसदार, तर्फ मजकूर दिंमत आनंदराव भिकाजी, यांजकडे तर्फ मजकूरचे महार फिर्याद होऊन आपलीं लग्नें जोतिषी यांणीं लावावीं ते लावीत नाहींत ह्मणोन सांगितल्यावरून, पुर्ती चौकशी न करितां, पेशजीं रखमाजी वाकडे हवालदार कोरीगडास होते त्यांचे वेळेस किल्याचे चाकरमान्या महारांचें लग्न लावण्याचें होतें, ते समयीं लग्न लावणार मेव्हा महार हा हजर नव्हता, सबब किल्ले मजकूरचे हवालदार व सबनीस यांणीं आमचा बाप भाऊ विनायक जोतिषी दहा पंधरा वर्षांचा अज्ञान होता, त्याजवर निग्रह करून महाराचें लग्न लावविलें. त्यास अजमासें पचावन वर्षे जाहलीं. तेवढ्याच दाखल्यावरून महाराचीं लग्नें जोतिषांनीं लावीत जावीं ह्मणोन कमावीसदारांनीं महारास भोगवटियास पत्र करून दिल्हें; त्याजवरून लग्न लावण्यास अतिशूद्र आह्मांजवळ ब्राह्मण मागों लागले तो न दिल्हा, याजकरितां कमावीसदारांनीं आह्मांस दहा रुपये मसाला करून महालीं नेऊन महारांचीं लग्नें करावयाविशीं निग्रह केला, त्यास अतिशूद्रांचें लग्नास आह्मीं मुहूर्त मात्र सांगत असतों, पूर्वापार लग्नें लाविलीं नसतां नवीन चाल होणार नाहीं, ऐसें आह्मीं उत्तर केलें. त्याचा कमावीसदारांनीं विषाद मानून पूर्वीं या प्रांतांत धनगर नव्हते, अलीकडे नवे वस्तीस आले आहेत त्यांचीं व इतर जात परदेशी व गुजराथी वगैरे नूतन येतील त्यांचींहीं लग्नें तुह्मीं लाऊं नयेत ह्मणोन कमावीसदारांनीं आक्षेप करून, जबरदस्ती करून आमचे वतनाची जप्ती करून, वृत्तीचे कामकाजास नवा गुमास्ता ठेविला आहे. येविशीं कमावीसदारांस ताकीद होऊन महारांस

सीत समानीन मया व अलफ साबान ६

Rs. 7,000 from the funds in their charge. They were now dead. The amount was ordered to be recovered from Nāro's son.

(1132) The Joshis of Poudkhore in Māmle Pāl Panchmahāl, objected to officiate as priests at the marriages of Mahārs. The practice of other *mahāls* was ascertained, and it was found that marriages among Mahārs were ordinarily celebrated by the chief Mahārs. This practice had in the case of Junnar *mahāl* been

A. D. 1785-86.

भोगवटियास पत्रें करून दिल्हीं आहेत, तीं माघारीं घेऊन आमच्या वृत्ती आम्हांकडे चालवावयाविशीं आज्ञा होऊन, जफ्तीमुळें वृत्तीचा ऐवज व मसाला महालीं घेतला आहे, तो माघारा देविला पाहिजे म्हणोन; त्याजवरून येविशींची चौकशी करून दाखले मनास आणतां महारांचीं लग्नें जोतिष्यांनीं लावावयाची चाल फार करून नाहीं, कोठें कोठें लावीतही असतील, परंतु कोंकण प्रांतीं महारांचीं लग्नें जोतिषी लावीत नाहीं, त्यांचे जातीमध्यें मेढे महार आहेत तेच लावितात, याप्रमाणें तळकोंकणचे जमीदार व जोतिषी हुजूर आहेत त्यांणीं विदित केलें; व वेदमूर्ति रंग जोशी जुन्नरकर यांणींही लिहून दिल्हें कीं, शहर जुन्नर बरहुकूम पेठा सुद्धां व तर्फेचे गांव पाऊणशें व शिवनेर वगैरे किल्ले पांच या ठिकाणीं जोतिषपणाची वृत्ति परंपरागत आपली आहे, परंतु आपले वृत्तींत अतिशूद्रांचीं लग्नें आम्हीं लावीत नाहीं, अतिशूद्रांचे जातींत ढेगोमेगो आहेत तेच त्यांचीं लग्नें लावीत आले असतां, पूर्वीं एक वेळ किल्याचे चाकरमाने व प्रांतांतील दोन चार हजारपर्यंत महार मिळोन गवगवा करोन जोतिष्यांनीं आपलीं लग्नें लावावीं म्हणोन, आवरंगजेब पादशाहा याजवळ फिर्याद केली, तेव्हां त्यांणीं पुरातन चाल मनास आणून, जोतिषीयांणीं महारांचीं लग्नें लाऊं नयेत असा ठराव केला, त्याप्रमाणें हा कालवर चालतें. म्हणोन याप्रमाणें दो प्रांतींचे दाखले गुजरलेल्याप्रमाणें तर्फ मजकुरींही जोतिष्यांनीं महारांचीं लग्नें लावावयाची चाल पुरातन नसतां, मागें कोरीगडचे हवालदारानें जोतिष्याचे मुलापासून बलात्कारें एक वेळ महाराचें लग्न लाविलें असल्यास तेव्हढ्याच दाखल्यावरून महारांचीं लग्नें जोतिष्यांनीं लावींत जावीं म्हणोन तुम्हीं महारांस नवीं पत्रें करून देऊन जोतिषी यांजवर लग्नें लावावयाविशीं निग्रह करून त्यांजपासून मसाला घेऊन त्यांच्या वृत्ती जप्त केल्या, हें ठीक न केलें. मागें मोगलाई अमलांत ही पुरातन चाल मोडून नवें केलें नसतां स्वराज्यांत तुम्हीं आग्रह करून नवीन चाल करणें अनुचित. यास्तव तर्फ मजकुरीं महारांचीं लग्नें पुरातन जोतिषी लावीत नाहीं, त्याप्रमाणें पुढेंही लाऊं नयेत, याप्रमाणें ठराव करून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरी तुम्हीं महारांस नूतन पत्रें करून दिल्हीं असतील तीं माघारीं घेऊन जोतिषीयांजवळ देणें, आणि जोतिषी यांचें वतन जप्त केलें आहे तें मोकळें करून जफ्तीमुळें ऐवज जमा जाहला असेल तो, व यांजपासून मसाला घेतला आहे तो माघारा देणें. अतिशूद्र खेरीज करून सर्व जातींचीं लग्नें पुरातन जोतिषी लावीत आल्याप्रमाणें लावितील. तुम्हीं नवीन आक्षेप न करणें. या पत्राची नकल घेऊन हें अस्सल पत्र दाखल्यास जोतिषी यांजवळ परतोन देणें म्हणोन, आपाजी कृष्ण कमावीसदार, तर्फ पौडखोरें दिंमत अनंदराव भिकाजी, यांचे नांवें चिटणिसी. पत्र १.

---

actually recognized by Emperor Aurangzeb on a former occasion. The objection of the Joshis was therefore held to be valid, and the Mahárs were informed accordingly.

सदरहूअन्वयें समस्त महार तर्फ कोरवारसें उर्फ पौडखोरें यांस आपाजी कृष्ण यांज-पासून पत्र करून घेतलें आहे, तें जोतिषी यांजवळ माघारां देणें. तुमचे जातीमध्यें मेढे महार लग्में लावीत आल्याप्रमाणें लावितील. याउपरी जोतिषी यांशीं खटला केल्यास मुलाहिजा होणार नाहीं ह्मणोन. पत्र १.

२.

दोन पत्रें चिटणिसी दिली असेत.

११३३ ( )—निंबाजी कुळकर्णी मौजे शहरटाकळी परगणे नेवासें याणें पैठणचे तटांतील ब्राह्मणांशीं शरीरसंबंध करूं नये असें असतां महादेव लक्ष्मण पैठणकर याशीं शरीरसंबंध केला, त्याचे सं(व)सर्ग दोषाचें प्रायश्चित्त घेत नाहीं, ह्मणोन शंकराजी राम यांणीं विदित केलें, त्याजवरून हे सनद सादर केली असे, तरी कुळकर्णी मजकूर यासी कुटुंबसुद्धां पैठणास पाठऊन राजश्री चिमाजी नाईक भाकरे यांचे विद्यमानें संवसर्ग दोषाचें प्रायश्चित्त देवणें. प्रायश्चित्त घेऊन शुद्ध न होय, तरी त्याचे मौजे मजकूर येथील कुळकर्णाचे वतनाची जफ्ती करून वतन-संबंधें उत्पन्न होईल तें सरकारहिशेबीं जमा करणें: आणि कुळकर्णी मजकूर यास हुजूर पाठऊन देणें ह्मणोन, रामचंद्र नारायण यांस. सनद १.

सीत समानीन मया व अलफ सफर २६

रसानगी यादी.

११३४ (९.१९)—जमा जामदारखाना.

सीत समानीन मया व अलफ जमादिलावल ४

कमार्वासभेट सौभाग्यवती रमाबाई यांसी. बाबत सौभाग्यवती कृष्णा-बाई रघुनाथ सदाशिव गद्रे यांचीं स्त्री सहगमन केलें ते समयीं प्रसाद पाठविला तो गुजारत केदारजी येवला खिजमतगार; सनगें एकूण किमत. रुपये.

१५ पातळ साधें १

३ चोळखण चोळी तयार १

१८

(1133) Nimbáji kulkarni of Tákli in parganá Newáse became connected by marriage with a family of an excommunicated Brahmin of Paithan. He refused to undergo any penance for what he had done. His watan was ordered to be attached, should he persist in his refusal.

A. D. 1785-86.

(1134) A present of clothes was sent to Ramábái, the Peshwá's wife, by Krishnábái, wife of Raghunáth Sadashiv Gadre, when the latter was going to be burnt on her husband's funeral pyre.

A. D. 1785-86.

११३५ (९३५)—जमा जामदारखाना.

सीत समानीन मया व अलफ रजब १५

कमावीसभेट सौभाग्यवती रमाबाई यांसी, बाबत सगुणाबाई अंताजी मल्हार वाकनीस यांची स्त्री सहगमन गेली, सबब प्रसाद पाठविला तो, गुजारत केदारजी येवला खिजमतगार. सनगें एकूण किंमत. रुपये.

५ शालू साधा १

·।।।· चोळखण $\frac{1}{2}$

५।।।

११३६ (९३६) शामाचार्य वगैरे आठ असामी, पेशजीं ब्राह्मण भ्रष्ट होऊन यवन

सबा समानीन मया व अलफ जिल्हेज १७

